१५२४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ७८८

# महाराष्ट्र–चैतन्य
## गणेश वासुदेव जोशी
उर्फ
# सार्वजनिक काका
यांचें
# चरित्र

चरित्र लेखक:—
रामचंद्र गणेश बोरवणकर

REFBK-0002484

किंमत १२ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे यास भेट
इ. ३०९

# महाराष्ट्र-चैतन्य

गणेश वासुदेव जोशी, ऊर्फ 'सार्वजनिक-काका'

इ. ३०९

यांचें

# संक्षिप्त-चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४८४

प्रस्तावना लेखक

श्री. वामन मोरेश्वर पोतदार

बी. ए. एल् एल् बी.

कार्याध्यक्ष. सार्वजनिक सभा पुणें.

REFBK-0002484

किंमत १२ आणे

मुद्रक—गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी, श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स,
४९५–४९६ शनवार पेठ, पुणें शहर.

लेखक व प्रकाशक—रामचंद्र गणेश बोरवणकर,
गणेश लॉज ठाणे.

GANESH-LODGE,
THANA.

श्री.

# नोकरींतील सहकारी.

यापेक्षां अधिक कोणत्याही तऱ्हेचा संबंध नसतां ज्यांनीं
बंधुभावानें वारंवार लेखन-व्यवसायाला प्रोत्साहन
देऊन, सर्वतोपरी स्वार्थनिरपेक्ष सहाय्य केलें,
त्या माझ्या प्रिय मित्रास ही माझी
प्रथम कृति सप्रेम
**अर्पण.**

**ग्रंथकर्ता.**

श्री.

# प्रस्तावना.

रा. रा. रामचंद्र गणेश बोरवणकर यांनीं कै. गणेश वासुदेव जोशी ऊर्फ ' सार्वजनिक काका ' यांचें अति त्रोटक असें चरित्र लिहून त्याची हस्तलिखित प्रत मला दाखविली. या गोष्टीस सुमारें दीड महिना झाला. त्यावेळीं ' काकांचें ' चरित्र लिहिण्याची त्यांची उत्कट इच्छा मला फार प्रशंसनीय वाटली. परंतु काकांचें चरित्र लिहिण्याची सामग्री त्यांस फारशी मिळाली नसल्यामुळें चरित्रग्रंथ अगदींच छोटा झाला. रा. बोरवणकर यांचा माझा पूर्व परिचय नसतां त्यांनीं हस्तलिखित प्रत मला दाखविण्याचें कारण इतकेंच दिसतें कीं, काकांचें चरित्र व त्यांची कामगिरी यासंबंधानें माझें असामान्य प्रेम असून तें मी अलीकडे पांच-सहा वर्षें ' काकांची पुण्यतिथि ' साजरी करण्याचा प्रघात पाडून व्यक्त करीत असतों व त्याप्रसंगीं काकांच्या चरित्राचें अल्प कथनही होत असतें. अर्थात् माझे कडूनही कांहीं माहिती मिळेल असेंही त्यांस वाटलें असावें. हा माझा तर्क खरा ठरला. रा. बोरवणकर यानीं मला काकां-विषयीं आणखी जास्त माहिती विचारली व मी माझेजवळ असलेलें काकांचे चरित्राचें ' त्रोटक टिपण ' त्यास दिलें व त्यांनीं त्याचा योग्य उपयोग करून त्यांतील माहिती या ' चरित्रग्रंथांत ' घातली आहे. हें सर्व ठीक झालें. परंतु काकांसारख्या सार्वजनिक पुरुषाचे चरित्रग्रंथांत प्रस्तावनाही तशाच एखाद्या प्रसिद्ध सार्वजानक पुढाऱ्याकडून लिहिली जावी हेंच उचित असतां, ग्रंथकर्त्यांनीं तें काम मला करण्याविषयीं सांगि-तलें व त्यांचा शब्द मला मोडवेना हेंच कारण ही प्रस्तावना या स्वरू-पात दिसण्याचें आहे. नाहींतर काकांसारखा चरित्रनायक व माझ्या-सारखा प्रस्तावना लेखक म्हणजे कांहींसें विपरीतच. परंतु हें दिखाऊ वैपरीत्यही थोड्याविचारांतीं निर्मूलच ठरेल. कारण एखादा मनुष्य कितीही मोठा व अलौकिक असला तरी त्याचे चहाते व भक्त हे कोण-त्याही दर्जाचे असूं शकतात. हाच न्याय येथें लागू पडतो. शिवाय ग्रंथ-

कर्त्यांची विनंती मी अमान्य केली असती तर कर्तव्यपराङ्मुखतेचा दोषही पदरीं येण्याचा संभव. या व अशा अनेक इतर कारणांकरतां मी हे प्रस्तावनेचे दोन शब्द लिहिण्याचें धाडस करीत आहें. गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत महाराष्ट्रांत जे कित्येक अलौकिक पुरुष होऊन गेले त्यांत या चरित्रनायकाची गणना प्रामुख्यानें केली पाहिजे. किंबहुना काकांचे वेळचे प्रमुख लोकांत काकांस अग्रपूजेचा मानही देण्यास फारशी हरकत नाहीं. ' फारशी ' असें म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, काकांच्या नामनिर्देशाबरोबर दुसऱ्या एका थोर विभूतीचेंही चित्र डोळ्यासमोर उभें रहातें. अर्थात् हे थोर गृहस्थ म्हणजे माधवरावजी रानडे हे होत. परंतु माधवरावजींनीं आपली अवतारसमाप्ति काकाच्या मागून सुमारें एकवीस वर्षांनीं केली असल्यामुळें त्यांची गणना कांहीं अंशीं काकांच्या समकालीन पुरुषांत व कांहीं अंशीं पुढील पिढींत होत असल्यामुळें ह्या अग्रपूजेच्या मानांत ह्या उभतांमध्यें स्पर्धेचा प्रश्न उपस्थित होतच नाहीं; व कदाचित् झालाच तर त्याचा निकालही काकांचेच तर्फे होईल. काकांचें गुणवर्णन ह्या अल्पस्वल्प प्रस्तावनेंत मी काय करणार ? तें सर्व त्यांचे चरित्रकारांनीं ह्या ग्रंथांत अतिशय रसभरीत वाणीनें केलें आहे. काका शरीरानें आपल्यातून अदृश्य झाल्यास आज ४३ वर्षें होऊन गेलीं. अर्थात् त्यांच्या अनेक गुणांची जी किंमत ठरवावयाची ती त्यावेळच्या परिस्थितीवरूनच ठरविली पाहिजे. काकांच्या सार्वजनिक जीवनक्रमास सन १८७० सालीं प्रारंभ होऊन तो सन १८८० मध्यें संपला. या दहा वर्षांतील महाराष्ट्रांतीलच काय परंतु अखिल भारतवर्षातील राजकीय, सामाजिक, औद्योगिक, धार्मिक वगैरे बाबतींत जी परिस्थिती होती तिची तुलना सांप्रतच्या परिस्थितीशीं केल्यास मनांत आनंद व उद्वेग या दोन्ही परस्पर विरोधी भावना उद्भूत होतात. आनंद इतकाच कीं देशाच्या प्रगतीविषयीं कोणासही निराश होण्याचें कारण नाहीं. ह्या गत कालांत देश सुधारणेचें पाऊल बरेंच पुढें पडलेलें दिसत आहे. व केव्हांतरी हा एका काळीं विभवाच्या धवलागिरीवर असलेला परंतु सांप्रत विपन्नावस्थेस पोंचलेला भारतवर्ष पुनरपि या विपन्न स्थितींतून निघून आपलें अग्रस्थान मिळवील. उद्वेग अशाकरितां कीं गेल्या

४०—५० वर्षांतील स्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास असें आढळेल कीं, आपल्या देशाच्या सुधारणेचें चित्र वरवर जरी कितीही रम्य दिसलें तरी हल्लींच्या स्थितींत व काकांचे वेळचे स्थितींत पडावें तसें अंतर पडलेलें नाहीं. ४ वर्षांपूर्वीं पुणें सार्वजनिक सभेच्या ‘ जुबिली ’ निमित्तानें सभेचें दप्तर चाळीत असतां सभेनें पहिले एकदोन वर्षांत केलेल्या कामाची एक यादी माझे पहाण्यांत आली. त्या यादींत नमूद केलेल्या कामांपैकीं कित्येक अगदीं साधीं कामेंही अद्याप अपुरीं राहिलेलीं दिसतात. कालाच्या ओघाबरोबर आमची सुधारणा होत आहे हें खास. परंतु तिची गति इतकी मंद आहे कीं आपलें ध्येय गांठण्यास अद्याप किती कालावधि लागेल हें समजत नाहीं. सध्या आपले जे राजकीय, औद्योगिक वगैरे अनेक प्रकारचे लढे चालले आहेत त्या सर्व बाबींत आपले सांप्रतचे राज्यकर्ते पूर्णपणें वाकब असून ते त्यांत अनेक शतकें पिढ्यानपिढ्या काम करून मुरून गेलेले आहेत. ते प्रसंगानुसार निरनिराळे डाव टाकतात. व त्यांचें इंगित आपणास कळलें तरी उमजत नाहीं. यामुळें प्रगति जोगानें होत नाहीं. ह्या मूळेंही मन अस्वस्थ होतें. तरीपण एकंदर सर्व परिस्थितीचा विचार करतां ज्या सुधारणा करण्याकरतां काकांची धडपड चालली होती त्या आतां कोठें अमलांत येण्याचा रंग दिसत आहे. ग्रामपंचायतीचा मनु आतां सुरू होणार आहे. स्वदेशी चळवळही बरीच जोरांत लागण्याचा रंग दिसत आहे. राजकीय उन्नतीहि बरीच होत आहे. ‘ फोडा व झोडा ’ या कुटिल राजनीतीला पोषक अशा कांहीं गोष्टी—उदाहरणार्थ ‘ जातवार प्रतिनिधित्वावलंब ’ जरी आमच्या मार्गांत अडथळे उत्पन्न करण्याकरतां करण्यांत येतात तरी जनतेचा हा बुद्धिभेद लौकरच सर्वांचे विदर्शनास येऊन तो अडथळाही दूर होईल. सांगावयाचें इतकेंच कीं काकांचा आत्मा आज जर स्वर्गांतून या आपल्या आवडत्या देशाकडे पाहूं लागला तर त्यास केवळ निराशेचें भेसूर चित्र न दिसतां भावी स्थिती आशाजनकच दिसेल. ह्या देशाच्या उन्नत्यर्थ काकांनी केवढा दीर्घोद्योग केला ह्याचें वर्णन ग्रंथांत आलेंच आहे. ग्रंथाची भाषा जोरदार, शुद्ध व परिणामकारक अशीच आहे. चरित्रकाराचें काम म्हणजे आपल्या चरित्रनायकाचें शक्य तितके हुबेहुब चित्र

वाचकांपुढें ठेवणें. अर्थात् गुणाबरोबर दोषदर्शनही करणें योग्य. परंतु काकांचें आंगीं कांहीं विशेष दोष असल्याचें दिसत नाहीं. ते अगदीं साधे निर्व्यसनी असे होते. त्यांच्या धार्मिक मतांसंबंधानें लिहितांना ते धाराम्र पाळीत असूनही प्रसंग विशेषीं सोवळें ओवळें अगर ब्राह्मण शूद्र विचारही पाळीत नसत वगैरे मजकूर आला आहे. तो वाचून कित्येकास कदाचित् आश्चर्य वाटेल. परंतु कार्यकर्ते पुरुष असेच असतात. साधुवर्य तुकारामबुवानीं एका अभंगात म्हटल्याप्रमाणें–जेथें देवाची तळमळ तेथें कशाचा विटाळ–या अभंग चरणांत 'देवाची' बद्दल 'देशाची' असें वाचल्यास हें सर्व सुसंगतच दिसेल. शिवाय येथें हेंही सांगणें जरूर आहें कीं, काकांच्या धार्मिक व सामाजिक मतांची या ग्रंथांत दिलेली माहिती माझे टिपणांतील आहे. व ती ज्या गृहस्थाकडून मिळाली त्यांचीं मतें सामाजिक सुधाणेस जास्त अनुकूल असलेमुळें 'मनी असें तें स्वप्नी दिसें' या न्यायानें त्यांच्या स्वतःच्या मताची छटा त्या माहितींत उमटली असण्याचाही संभव आहे. चरित्रग्रंथांत 'सार्वजनिकसभें' संबंधानें वरचेवर उल्लेख येणें साहजिकच आहे, कारण काका मरेपर्यंत त्या सभेला जणूकाय वाहिलेलेच होते. ह्या सभेनें किती उपयुक्त कामगिरी केली हें श्रुतच आहे. व सभेची राजमान्यता १८९७ सालीं गेली हेंही सर्वांस माहीत आहे. ग्रंथकर्त्यांनीं याबद्दल परिशिष्ट (१ लें) यांत उल्लेख केला आहे. राजमान्यता जाण्याचें मुख्यकारण सभेनें दिलेलें उत्तर सरळपणाचें नव्हते असें नाहीं. परंतु त्यावेळच्या परिस्थितींत तें सरकारास सरळ वाटलें नाहीं. इतकेच. परंतु या गोष्टी आतां गतार्थ झाल्या असल्यामुळें त्याविषयीं जास्त उहापोह करण्याची जरूरी नाहीं. एकंदरींत रा. बोरवणकर यानीं हें चरित्र लिहून एका अत्यंत थोर पुरुषाच्या चरित्राचा आदर्श साप्रतच्या पिढीपुढें ठेवून एक मोठीच कामगिरी केली आहे. कारण पंतानी म्हटल्याप्रमाणें–'झाले बहु होतील बहु होणारही बहु परंतु यासम हा.' काकांपेक्षां सवाई काकाही ह्या महाराष्ट्रांत निपजतील, ही भूमीच अशी आहे. ज्याप्रमाणें पाया, वरील इमारत व त्यावरील कळस असे एखाद्या मंदिराचे भाग दिसतात. परंतु पहाणारा फक्त इमारत व कळस हेच पाहून सानंदाश्चर्य दाखवितो, तरीपण हीं दोन्ही ज्या पायावर उभी असतात

तो पाया मात्र जमिनींत गढलेला असतो, तो दिसत नाहीं; तोच वरील इमारतीचा मुख्य आधार! याच न्यायानें जे पुरुष देशाच्या पडत्या-काळांत नानातऱ्हेच्या खस्ता खाऊन, दुःखें वगैरे सोसून भावी अभ्युदयाचा पाया घालतात त्यांचा विसर पुढील पिढ्यांनीं केव्हांही पडूं देतां कामा नये व ह्याच करतां दरसाल आषाढ व॥ ४ या पुण्य दिवशीं या थोर पुरुषाची आठवण महाराष्ट्रानें ठेवावी व ती ठेवण्यास रा. बोरवणकर यांनीं हें चरित्ररूपी साधन निर्माण करून ठेवल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करून ही अल्प प्रस्तावना पुरी करतों.

पुणें ता. १३।१२।२४. **वामन मोरेश्वर पोतदार.**

---

# लेखकाचे दोन शब्द !

कै. विष्णुशास्त्री चिपळणुकर, रावबाहादूर रानडे ह्यांचीं चरित्रें छापून प्रसिद्ध झालीं. लो. टिळकांच्या चरित्राचाही एक खंड प्रसिद्ध झाला. कै. प्रि. आगरकर ह्यांचें चरित्रही लिहिलें जात आहे; परंतु ह्या सर्व देशभक्तांच्या अंतःकरणांत देशसेवेची स्फूर्ती उत्पन्न करणारे, 'महाराष्ट्रीय-जागृतीचे जनक' जे कै. गणेश वासुदेव जोशी ऊर्फ 'सार्वजनिक-काका' ह्यांचें चरित्र अद्याप लिहिलें गेलें नव्हतें. महाराष्ट्र-वाङ्मयांत हें एक प्रकारचें वैगुण्य राहिलें आहे, अशा प्रकारचे विचार मनांत चालले असतानां, 'सार्वजनिक-काकांच्या' चरित्राचें एक लहानसें कविताबद्ध टिपण सहज नजरेस पडलें. ह्या टिपणाच्या आधारानें आपण जर काकांचें चरित्र संक्षेपतः लिहिलें, तर तें मुळीच नाहीं त्या पेक्षां बरें होईल, असा विचार करून मी तें लिहून माझ्या एका लेखक व्यवसायिक बंधूस दाखविलें. त्यानें तें प्रेमानें वाचून पाहिलें व त्यावर पुष्कळ उपयुक्त सूचनाही केल्या. पुण्यास जाऊन आणखी कांहीं माहिती मिळाल्यास पहावी असेंही त्यानें सुचविलें. त्याच्या सूचनेप्रमाणें मी पुण्यास गेलों. पुण्यास माझे मित्र रा. गोविंदराव बाळ ह्यांच्या सहाय्यानें मला माहिती मिळण्याचीं ठिकाणें सांपडण्यास कठीण गेलें नाहीं. त्यांनीं मला रा. विना-

यकराव भुस्कुटे ह्यांच्याकडे नेलें व त्यांनीं आपल्या जवळचीं टिपणें मला दिलीं. नंतर रा. बाळ ह्यांनीं मला रा. वामनराव पोतदार ह्याजकडे नेलें. त्यांनीं माझें पहिलें हस्तलिखित वाचवून घेतलें, व आपल्या संग्रहींची सर्व माहिती माझें स्वाधीन केली. ही सर्व माहिती मिळवून मी पुन्हां हें चरित्र रा. वामनराव ह्यांस वाचावयास दिलें, व त्यांस प्रस्तावना लिहिण्या विषयीं विनंती केली. त्यांनीं हस्तलिखित प्रत वाचून माझी विनंती मान्य केली व ह्या चरित्राला आपल्या सोज्वळ प्रस्तावनेनें भूषित केलें ! सार्वजनिक सभेच्या कार्यकारी मंडळानें हें चरित्र वाचून त्याला शंभर रुपये देण्याचा ठराव करून लेखकाचा गौरव केला आहे. तसेंच सभेचे एक सभासद रा. भावे त्यांनीं कांहीं उपयुक्त सूचना केल्या आहेत. मी त्यांतील शक्य तेवढ्यांचा स्वीकार केला आहे. कलकत्ता येथील वृत्त–पत्रकारांच्या संमेलनाची विस्तृतता माहिती द्यावयास हवी होती; परंतु ती अद्याप मला मिळाली नसल्यामुळें तिचा ह्या आवृत्तींत समावेश करतां आला नाहीं. एवंच काय कीं, चरित्र लिहिण्याला मी जरी निमित्त–मात्र झालों असलों, तरी हें सर्व वरील सद्‌गृहस्थांच्या कृपेचें फळ आहे ! त्यांचे आभार मी कितीही मानले तरी ते थोडेच होणार आहेत. वरील सद्‌गृहस्थांच्या कृपेचें हे फळ लेखकानें वाचकांच्या पुढें ठेवलें आहे. लेखकाचा ग्रंथ लेखक ह्या नात्यानें जनतेपुढें येण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. तेव्हां वाचकांकडून लेखकाचे दोषांवर पांघरुण घालण्यांत येऊन ‘ काकांचे सविस्तर चरित्र वाचावयास मिळेपर्यंत दुधाची तहान ताकांवर भागवून घ्यावयाची ’ ह्या दृष्टीनें त्या संक्षिप्त चरित्राचा आदर पूर्वक स्वीकार केला जाईल अशी उमेद आहे.

गणेश लॉज्.
ठाणें.

रामचंद्र गणेश बोरवणकर.



कै. गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका.'

नं. ३३६

श्रीगजानन प्रसन्न.

# महाराष्ट्र-चैतन्य

## गणेश वासुदेव जोशी

उर्फ

# सार्वजनिक काकांचें चरित्र.

२८

पराकारणें नित्य जे श्रांत होती।
जनांच्या सुखाला सदा वाढवीती !
जगीं जाणवीती उदार स्वभावें !
तयांला बुधें धन्य ऐसें गणावें ॥ १ ॥

ह्या जगामध्यें स्वार्थ हा जणूं काय प्रत्येकाच्या सहावीला पूजलेला आहे. शेंकडा पंचाणव लोक हे स्वार्थ-लंपट असतात. बाकीच्या पांचांतलेही बहुतेक असे असतात कीं, ते केवळ स्वार्थ अथवा केवळ परार्थ अशा टोंकांवर न रहातां, स्वार्थ साधून परार्थ करणारे असतात. स्वार्थाकडे लक्ष न ठेवतां, एवढेंच नव्हे तर क्वचित प्रसंगीं स्वार्थावर लाथ मारूनही केवळ 'पराकारणें' देह झिजविणारे, स्वत:ला सुख झालें म्हणजे झालें, दुसऱ्याचें कांहींका होईना; अशी वृत्ति न ठेवतां दुसऱ्याचें सुख तेंच आपलें सुख, मग त्याकरितां स्वत:च्या वैयक्तिक सुखावर पाणी सोडण्याचा प्रसंग आला तरी हरकत नाहीं, असें-मानणारे वंद्य पुरुष फार क्वचितच जन्मास येतात.

आणि असें आहे म्हणूनच त्यांचें महात्म्य ! अशा पुरुषांना कोणी 'धन्य' 'धन्य' म्हणून गौरवितात, कोणी त्यांना अवतारी पुरुष मानून त्यांचा आदर करितात, तर कोणी त्यांना 'विभूति' ह्या श्रेष्ठतम उपपदानें भूषवितात. असले वंद्य पुरुष समाजास मार्गदर्शक व ललामभूत होतात.

महाराष्ट्रांत इंग्रजी सुरू झाल्यावर इंग्रजांच्या तेजानें, त्यांच्या बुद्धिमत्तेनें, त्यांच्या प्रतापानें, त्यांच्या राज्यपद्धतीनें अखिल महाराष्ट्र जणूं काय दिपून गेला होता. आपण कोण आहों, कोठें आहों, आपलें पूर्व-वैभव काय होतें, सध्यां आपली स्थिति काय आहे, ह्या स्थितींत आपलें कर्तव्य काय, आपलें साध्य काय, वगैरे विचार करण्याला त्याला बहुतेक भानच राहिलें नाहीं. डोळे दिपून गेल्यामुळें त्यांच्या ज्ञानचक्षूपुढेंही किंकर्तव्यमूढतेची अंधेरी आलेली होती. अशा अंधःकारांतून आत्मप्रत्यय आणून देऊन स्वकर्तव्याचा मार्ग दाखवून देणाऱ्या ज्या कांहीं थोड्या विभूति अव्वल इंग्रजींत महाराष्ट्रांत जन्मास आल्या, त्यांत 'गणेश वासुदेव जोशी' ऊर्फ 'सार्वजनिक–काका' ह्यांनां अग्रेसरत्वाचा मान दिला पाहिजे. पुण्यास 'सार्वजनिक–सभा,' 'सार्वजनिक सभेचा दिवाणखाना' हीं 'सार्वजनिक–काकांची' पुण्य स्मारकें आहेत. 'सार्वजनिक–सभा' हें नांव ऐकल्यावर अथवा 'सार्वजनिक–सभेचा दिवाणखाना' पाहिल्यावर हें 'सार्वजनिक–काकांचें' स्मारक असें मनांत येऊन 'सार्वजनिक–काकांची' आठवण व्हावी हें साहजिकच आहे; परंतु ह्या आठवणीच्या पलीकडे 'सार्वजनिक–काका' कोण होते? त्यांनीं काय केलें? तें केव्हां होऊन गेले? वगैरे गोष्टीं संबंधानें त्यांची माहिती जिज्ञासूला मिळूं नये हें खरोखर महाराष्ट्राला लांछनास्पद आहे. आज पुण्यास जर साधारणतः कोणीही सुशिक्षित तरुणाला, तुम्हांला 'सार्वजनिक काकांची' कांहीं माहिती आहे कां? म्हणून विचारलें, तर ते 'मला

त्यांच्या नांवाखेरीज दुसरी कांहीं माहिती नाहीं असेंच उत्तर देतो.× ही गोष्ट श्रेयस्कर आहे असें कोण म्हणेल ? थोर पुरुषांचीं चरित्रें हीं पुढील पिढीला नेहमीं मार्गदर्शक असतात, त्यांच्या आठवणी पुढील पिढीला नेहमीं स्फूर्ति देत असतात; किंबहुना थोर पुरुषांचीं चरित्रें हाच राष्ट्राचा इतिहास होय आणि राष्ट्राला जर भविष्यकाळ काबीज करावयाचा असेल तर त्यानें प्रथम इतिहासाला आपलेसें करून घेतलें पाहिजे. इतिहास हा राष्ट्राचा जिवंतपणा आहे, इतिहास ही राष्ट्राची स्फूर्ति आहे; इतिहास हें राष्ट्राचें 'ओजस्' आहे. 'ज्या राष्ट्राला इतिहास नाहीं त्या राष्ट्राला भविष्यकाळही नाहीं,' अशी एक इंग्रजींत म्हण आहे. ह्याचा अर्थ असा कीं, ज्या राष्ट्राला मार्गदर्शक होतील अशीं त्याच्या थोर पुरुषांचीं चरित्रें ज्या राष्ट्रांत नाहींत त्या राष्ट्राच्या हातून भविष्यत्कालीं थोर पराक्रम होणार कसे ? म्हणून थोर पुरुषांचीं चरित्रें अवश्य लिहिलीं गेलीं पाहिजेत. 'सार्वजनिक-काका' हे अर्वाचीन थोर पुरुषांत अग्रगण्य आहेत; परंतु अद्यापि त्यांचें चरित्र कोणीही लिहिलें नाहीं. हें लांछन यथाशक्ति दूर करावें ह्या हेतूनें मिळाली ती माहिती एकत्र करून त्यांचें चरित्र यथामति देण्याचें धाडस केलें आहे.

## जन्म व बाळपण.

दाक्षिणेंत पेशव्यांचा अंमल झाल्यानंतर कोंकणांतून अनेक पुरुष रोजगारानिमित्त देशावर येत असत; त्यांतच वासुदेव शिवराम जोशी ह्या नांवाचे एक गृहस्थ अठराव्या शतकाच्या अखेरीस

---

× पुण्याच्या एका विद्वान पदवीधर तरुणाला काकांची माहिती विचारली असतां. 'We do not know anything about him, but his mene name. Of course we sometimes hear him ta lked of from the pulpit; but that is all ! ' असें त्याजकडून आम्हांस उत्तर मिळालें.

पुण्यास आले. ते मूळचे रत्नागिरी येथील वृत्त्यंशी जोशी घराण्यांतले होते. त्यांचे भाऊबंध अद्याप रत्नागिरी शहरांत पुष्कळ आहेत. वासुदेव शिवराम हे देशमुखांच्या पदरीं नोकरीस राहिले. हे देशमूख म्हणजे 'लोकहितवादी' ह्या नांवानें महाराष्ट्राला महशूर असलेल्या सरदार गोपाळराव हरी देशमूख ह्यांचे वडील असावेत. कारण हरीपंत देशमूख हे पेशव्यांचे पदरीं असून अष्टयाच्या लढाईंत ते बापू गोखल्यांबरोबर होते. व पुढें रावबाजी जेव्हां बऱ्हाणपुराकडे पळाले त्या वेळीं तें त्याच्या लष्करांत होते असा उल्लेख 'लोकहितवादी'चें चरित्रांत आहे. पेशव्यांचे पदरीं नांवारूपास आलेले 'देशमूख' ह्या नांवाचे दुसरे कोणी सरदार प्रसिद्ध नाहींत तेव्हां ह्याच देशमुखांचे पदरीं वासुदेव शिवराम असावे हा तर्कच विशेष दृढ होतो. टिपू सुलतानावर मोहीम करण्यासाठीं इंग्रजांच्या मदतीस पेशव्यांनीं जें सैन्य पाठविलें होतें त्यांत देशमुखांचें एक पथक होतें, त्यांत 'पागे' ह्या हुद्याच्या जागीं त्यांची नेमणूक झाली होती. त्यानंतर वसई तालुक्याची मामलत मक्त्यानें घेऊन त्यांनीं कांहीं वर्षें चालविलीं, आणि पेशवाईची अखेर होतांच ते पुण्यास येऊन घर करून राहिले. त्यांस प्रथम संबंधापासून एक मुलगा होता; आणि द्वितीय संबंधापासून चिंतोपंत, कृष्णाजीपंत, आणि गणपतराव असे तीन मुलगे झाले. पेशवाई नष्ट होऊन इंग्रजी सुरू झाल्यावर, 'आम्ही तुमचा मानमरातब चांगला राखूं' असें इंग्रजांनीं आश्वासन दिल्यावरून वासुदेव शिवराम हे वयाचे पंचावन्नावें वर्षीं इंग्रजी अंमलांत 'सदर अमीन' ह्या नोकरीवर दाखल झाले. ही नोकरी त्यांनीं सुमारें आठ वर्षें केली, आणि इसवी सन १८३० सालच्या सुमारास ते पुण्यास मृत्यु पावले. त्यांच्या मृत्यूनंतर इंग्रज सरकारनें त्यांच्या तिन्ही मुलांस ते वयांत येईपर्यंत दरमहा सोळा रुपये, आणि त्यांच्या पत्नीस अखेरपर्यंत साडेसदतीस रुपये पेन्शन चालू ठेवलें होतें.

चरित्र नायक गणेश वासुदेव जोशी ह्यांचा जन्म साताऱ्यास सन १८२८ सालच्या एप्रील महिन्यांत झाला. ह्यांच्या आईचें नांव सावित्रीबाई. गणेशपंतांचे वडील घरचे गरीब होते, तथापि त्या काळाला अनुसरून त्यांच्या ठिकाणीं प्रामाणिकपणा, धर्मश्रद्धाळूपणा, भाविकपणा, इत्यादि गुणांचा अभाव नव्हता. सावित्रीबाई देखील फार हुशार, धोरणी, दक्ष, आणि मायाळू अशा होत्या. वासुदेवरावांचें पुण्यास स्वतःचें घर असतांना चरित्र नायकांचा जन्म साताऱ्यास कां झाला हें समजणें कठीण आहे. कदाचित् सावित्रीबाईचें माहेर साताऱ्यास असेल, व त्यामुळें चरित्र नायकाचा जन्म साताऱ्यास झाला असेल. वासुदेवराव मरण पावल्यानंतर त्या ज्या गणपतीला घेऊन साताऱ्यास राहिल्या त्याचें कारणहीं त्यांचें माहेर साताऱ्यास असावें हें होय. असो. चरित्र नायकाचा जन्म साताऱ्यास झाला हें खरें. एवढेंच नव्हे तर गणेशपंत वर्ष दीड वर्षाचे होतात न होतात तोंच त्यांना पितृ—सुखास अंतरावें लागल्यानंतर देखील सावित्रीबाई त्यांस घेऊन साताऱ्यासच राहिल्या. वासुदेवरावांच्या मृत्यूमुळें सावित्रीबाईस अतिशय दुःख झालें, तथापि केवळ आपल्या ह्या लहानग्या गणपतीकडे पाहून त्यांनीं त्या दुःखाला एकीकडे सारलें व संसाराच्या मायापाशांत स्वतःला गुरफटवून घेतलें.

गणपतीची मुंज झाल्यावर तो साताऱ्यासच मराठी शाळेंत जाऊं लागला. गणपतीच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी सावित्रीबाईवरच पडली होती; व त्यांनींही न डगमगतां ती योग्य तऱ्हेनें पार पाडली. गणपतीला शाळेंत जाण्यांत व शाळेंतील सोबत्यांबरोबर खेळण्याबागडण्यांत मोठी मौज वाटत असे. लहानपणीं त्यांचा स्वभाव अतीशय चंचल होता. शांतपणा हा त्यांच्या जीवाला ठाऊकच नसे. मोठेपणींही हा स्वभाव नाहींसा न होतां वयाबरोबर वाढतच गेला असें म्हटलें तरी चालेल, गणपती स्वभावानें जरी चंचल असला तरी

बुद्धीनें कांहीं मंद नव्हता. त्यामुळें तो आपल्या परीक्षा भराभर सालोसाल पास होत गेला. त्यावेळीं इंग्रजी अंमल नुकताच सुरू झालेला असल्यामुळें त्यांचा जम अद्याप नीट बसलेला नव्हता. ह्या करितां राज्यकर्त्यांना इतर गोष्टींकडे लक्ष देण्यास फुरसद नव्हती. अर्थात् शिक्षणाचा फैलाव त्यावेळीं हल्लीं सारखा झालेला नव्हता. खुद्द राजधानींत म्हणजे पुणें शहरीं इंग्रजी शिक्षणाचा वर्ग सन १८४२ सालीं उघडण्यांत आला. राजधानी सारख्या शहरीं जर ही स्थिती तर साताऱ्यासारख्या दूरच्या गांवीं त्यावेळीं इंग्रजी शाळा कोठून असणार ? दुसरें, त्यावेळीं साताराची गादी खालसा झालेली नसल्यामुळें इंग्रजांचा साक्षात अंमल तेथें सुरू नव्हता; त्यामुळें इंग्रजीचा फैलाव तेथें अद्यापि झालेला नव्हता. अर्थात् गणपतीला आपल्या तुटपुंज्या मराठी शिक्षणावरच समाधान मानून घेणें भाग पडलें. मराठी शिक्षण आटोपल्यावर आईच्या गरिबीच्या संसारांत तिला मदत करण्याकरितां गणपतीला नोकरी पहाणें भाग पडलें.

## नोकरी.

सन १८४८ सालीं म्हणजे आपल्या वयाच्या विसाव्या वर्षीं, गणपतरावांनीं पुण्यास 'नाझर' कचेरींत कारकुनीची नोकरी पत्करली. ह्या नोकरीच्या निमित्तानें ते जे पुण्यास आले ते पुण्याचे झाले. साधारणपणें सात, आठ वर्षे, नोकरींत घालविल्यावर त्यांच्यावर एकाएकी एक कुभांड आलें. नाझर कचेरींत असलेल्या कारकुनावर कुभांड यावयाचें म्हणजे काय ? कांहीं लांच लुचपतीचा आरोप असावयाचा ! ह्या कुभांडानें त्यांची नोकरी सुटली. कुभांडाची चवकशी होऊन निकाल लागेपर्यंत त्यांना 'सस्पिंड' करण्यांत आलें. नोकरी सुटल्यानंतर आतां काय करावयाचें हा त्यांच्यापुढें मोठा बिकट प्रश्न येऊन पडला. त्या काळीं व्यापार हल्लीं सारखा वाढलेला नव्हता, इंग्रजी

कंपन्या जागोजाग निघालेल्या नव्हत्या; सरकारची सुद्धां राज्य व्यवस्थेची घडी नीट बसली नसल्यामुळें म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें, पब्लिक वर्क्स, शाळाखातें, वगैरे सरकार दरबारचीं अठरा खातीं हीं सर्व निर्माण झालीं नव्हतीं. पूर्व वैभवापैकीं कांहींही शिल्लक उरलेलें नव्हतें. अर्थात् नोकरी करावयाचा मार्ग म्हणजे सरकारच्या मुलकी खात्यांत अगर न्याय खात्यांत! त्या खेरीज तिसरा मार्ग नव्हता. पण जेथें सरकारचीच इतराजी झाली तेथें न्यायखातें सुटल्यानंतर मुलकी खात्यांत तरी प्रवेश कसा होणार! नोकरीचा मार्ग अशा रीतीनें अजीबात खुंटल्यावर पुढें काय करावयाचें! घरीं स्वस्थ बसावें तर घरची गरिबी स्वस्थ बसूं देईना. आणि स्वभावांत मुरलेली चंचलताही तो मार्ग स्वीकारण्यास कबूल होईना. शेवटीं नोकरीचा दरवाजा बंद करून सरकारनें न्यायखातें त्यास पारखें करण्याचा विचार केला तर त्यांनीं दुसऱ्याच मार्गानें न्याय खात्यांत आपला प्रवेश करून घेतला.

## वकिली.

नोकरी सुटल्यावर गणपतरावांनीं वकिली करण्याचें मनांत आणलें, व लगेच वकिलीच्या अभ्यासाला सुरवात केली. त्या वेळची वकिलीची परीक्षा व आतांची वकिलीची परीक्षा ह्यांत जमीन अस्मानाची तफावत आहे. सन १८६५ सालीं, म्हणजे गणपतरावांनीं वकिलीची परीक्षा दिली त्यानंतर सुमारें दहा वर्षांनीं, वकिलीच्या परीक्षा कशा घेत असत ह्यासंबंधानें देशभक्त तात्यासाहेब केळकर ह्यांनीं आपल्या लोकमान्य टिळकांच्या चरित्रांत लिहिलें आहे. ते लिहितात, “सन १८६५ सालीं पुण्यास अदालतींत वकिलांची लेखी परीक्षा झाली. ३१ उमेदवार परीक्षेस बसले होते. पुस्तकांची मदत घेऊन प्रश्नांचीं उत्तरें लिहिण्याची परवानगी होती. अडीच खणांच्या जागेंत हे सर्व उमेदवार मांडीस

मांडी लावून बसविले होते; व खुशाल एकमेकांनीं एकमेकांस विचारून उत्तरें लिहिण्याचा क्रम सुरू ठेवला होता! ×××× परीक्षेचा निकालही हातोहात झाला. मुख्य परीक्षक असिस्टंट जज्ज ह्यांना ज्या भाषेंत उमेदवारांनीं उत्तरें लिहिलीं त्या "मराठीचा गंधही नसतां, त्यांनीं एक दोघां सल्लागारांचे मदतीनें एकदोन घटकेंत कागद तपासून निकालही सांगितला." सन १८६५ सालच्या सुमारास जर ही स्थिति, तर ज्या वेळीं गणपतरावांनीं वकिलीची परीक्षा दिली त्याकालीं ती कशी असेल ह्याची सहज अटकळ होण्यासारखी आहे! त्या वेळची वकिलीची परीक्षा म्हणजे आपल्याकडे ज्याप्रमाणें खेडेगांवांतून 'मुखत्यार-वकील' म्हणून असतात व त्यांना जशी वकिलीची परीक्षा द्यावी लागते तशाच प्रकारची साधारणपणें होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. गणपतरावांची वकिली म्हणजे मराठी वकिली होती. गणपतराव अगदीं शेवटपर्यंत मराठी राहिले नाहींत. ते इंग्रजी शिकले; परंतु तें ते फार मोठेपणीं शिकले. असो. त्यांनीं वकिलीचा अभ्यास करून वकिलीच्या धंद्यांत शिरण्याचा निश्चय केला. हा निश्चय झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांच्यावर आलेल्या कुभांडाचा निकाल होऊन त्यांत ते पूर्ण निर्दोषी ठरले. त्यांच्या वरिष्ठ अंमलदारांनीं त्यांना नोकरीवर रुजू होण्यास लिहिलें; परंतु गणपतरावांना नोकरीचें सौख्य काय असतें त्याचा अनुभव एकदां मिळालेला असल्यामुळें त्यांचा स्वाभिमानी व बाणेदार स्वभाव त्यांना पुन्हां नोकरीचें जूं मानेवर घेण्यास प्रवृत्त करीना, म्हणून त्यांनीं 'सेवक-वृत्तीला' कायमचा रामराम ठोकण्याचा निश्चय करून त्याप्रमाणें सरकारला कळविलें; आणि वकिलीचा स्वतंत्र मार्ग पत्करला. त्यांची बुद्धि जात्याच तीव्र असल्यामुळें वकिलीच्या धंद्याचा त्यांचा जम बसण्यास फारसा वेळ लागला नाहीं. ह्या

आपल्या न्व्या धंद्यांतील खांचा-खोचा त्यांनीं अल्पकाळांतच आत्म-सात् करून घेतल्या.

वकिली व डॉक्टरी ह्यांच्यासारखे जे स्वतंत्र धंदे आहेत, त्यांतील उत्कर्षापकर्ष हे मेहमीं त्यांतील अगदीं प्रारंभीच्या यशापयशावर अवलंबून असतात. केवळ बुद्धिमत्ता, अगर डिग्रयांचें शेंपूट उपयोगीं पडत नाहीं. एखादा डॉक्टर अगदीं सर्व पदव्या विभूषित झालेला असतो, प्रत्येक परीक्षेंत आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यानें बराच नंबर पटकावलेला असतो, परंतु एखादेवेळीं असें होतें कीं, परीक्षा वगैरे आटोपून त्यानें आपला धंदा थाटावा व पहिलीच ‘ केस ’ अयशस्वी व्हावी ! असें झालें म्हणजे त्याची ती बुद्धिमत्ता, आणि ती डिग्रयांची माळ केवळ कवडी मोल होऊन जातात. परंतु तेंच एखाद्या साध्या डॉक्टरची देखील ह्याच्या उलट स्थिती होते. जें डॉक्टरींत, तेंच वकिलींत. अगदीं प्रथम यशाची माळ गळ्यांत पडली तर जम चांगला बसतो; पण तेथें जर का ‘ मक्षिका—पात ’ झाला म्हणजे सर्व ग्रंथच आटोपला म्हणायला हरकत नाहीं. मग तो वकील कितीही कायदे पंडित असो ! असो.

गणपतरावांनीं वकिलीला सुरवात केली. त्यांच्या सुदैवानें अगदीं प्रारंभीच त्याना दोनतीन गुंतागुंतीचे खटले चालविण्याचा प्रसंग आला, व त्यांतून ते मोठ्या यशस्वितेनें पार पडले. वकिलीच्या धंद्यांतील त्यांच्या धैर्याच्या, हुशारीच्या आणि समयसूचकतेच्या अनेक आख्यायिका मोठ्या मनोरंजक व बोधप्रद आहेत. रास्ते चिंचवडचे देव, वाईचे शेखमिरे, मलठणकर, मालेगांवकर, चिपळूणकर, इत्यादिकांच्या अनेक घोटाळ्यांच्या आणि वर्षानुवर्ष चाललेल्या खटल्यांत ते सल्लागार वकील असत. फौजदारी खटल्यांतही त्यांना चांगलें यश मिळत असे. एक दोन खटल्यांत तर त्यांनीं आपल्या बाणेदारपणाची चुणूकही लोकांच्या नजरेस आणून दिली. ह्यामुळें

त्यांचा 'उत्तम वकील' म्हणून सर्वत्र लवकरच बोलबाला सुरू झाला; व मिळकतीच्या दृष्टीनेंही धंद्याचा जम चांगला बसला. वकिलीच्या धंद्यांत त्यांनीं पुष्कळ पैसा कमविला; परंतु तो मिळविण्याकरितां त्यांनीं कधीं कोणाला नाडलें नाहीं, कधीं न्याय, नीति, धर्म ह्यांचा त्याग केला नाहीं ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. त्याचप्रमाणें वकिलीच्या धंद्यांत त्यांनीं जो पैसा कमाविला त्यांतील बराचशा भागाचा विनियोग त्यांनीं दानधर्मांत व लोकोपयोगार्थ केला. त्या काळच्या रिवाजाप्रमाणें रेशीमकांठी नागपुरी धोतरजोडे, मोठमोठीं रंगीत पागोटीं, कडकडीत छडीदार अंगरखे वगैरे शैली पोशाख करणें, आणि इर्षेनें दानधर्म करून कीर्ती मिळविणें ह्याकडे त्यांचें लक्ष असे. ज्या मातेनें त्याना शिक्षण देण्याकरितां गरिबींत समाधान व सुख मानलें, त्या आपल्या वृद्ध मातेला, आपल्याला संपन्न स्थिती आल्यावर सौख्य देण्यास ते पुत्रधर्माप्रमाणें झटत असत. ते अतीशय मातृ-भक्त होते; आपल्या मातेच्या ते नेहमीं अर्ध्या वचनांत असत. आपल्या मातेच्या सांगण्यावरून सन १८६८मध्यें त्यांनीं पुण्यास एक सुंदर 'विष्णु-मंदीर' बांधलें, व लोकांना पाणी पिण्याकरितां त्याच सालच्या मे महिन्यांत एक 'जल-मंदीर' ( हौद ) स्थापन केलें.

## सार्वजनिक कार्य.

वकिलीचा धंदा हा स्वतंत्र धंदा असल्यामुळें मनुष्य त्यांत कोणाचा बांधील रहात नाहीं, अगर त्याच्या मनावर दुसऱ्या कोणाचें दडपणही नसतें. त्याचें शरीर स्वतंत्र असतें, त्याचें मनही स्वतंत्र असतें. अर्थात् त्याला आपल्या ह्या धंद्याखेरीज इतरत्र दृष्टी वळविण्यास, मनांत आणलें तर, अवसर असतो. हल्लीं देखील सार्वजनिक कार्यांत जिकडे तिकडे आपणांस वकील लोकांचा भरणा जास्त आढळून

येतो, ह्याचें तरी कारण हेंच आहे. दुसरेंही एक कारण असें म्हणतां येईल कीं, रोज कोणाची ना कोणाची वकिली करण्याची संवय मनाला लागलेली असली, व मनामध्यें थोडा भलेपणाचा, औदार्याचा ओलावा असला म्हणजे साहजिकच त्याच्या मनाचा ओढा जनतेची वकिली करण्याकडे, अर्थात सार्वजनिक कार्य करण्याकडे वळतो.

गणपतराव बुद्धीचे चंचल होते तसेच ते अंतःकरणाचे थोर व कनवाळू होते. दुसऱ्याला दुःख झालेलें पाहून त्यांचें अंतःकरणांत तळमळ उत्पन्न होत असे; व ते लगेच त्याच्या दुःखाचें यथाशक्ति उपशमन करण्याच्या मार्गाला लागत. फुरसतीचा वेळ रिकामपणाच्या चकाट्या पिटण्यांत अगर पत्ते, गंजिफा झोडण्यांत, नाहींतर निर्वाणीचा एक मार्ग म्हणजे, 'सुखं चमे शयनं चमे' करण्यांत व्यर्थ दवडणें त्यांना बिलकूल आवडत नसे. त्यांच्यासंबंधानें एका गृहस्थानें असें लिहिलें आहे कीं, काका व्यर्थ माशा मारीत बसलेले कधींही आढळत नसत. रस्त्यानें मंद मंद पावलें टाकीत इतस्ततः रिकामें फिरण्यांत वेळ दवडणें त्यांना इष्ट वाटत नसे. त्यांची बुद्धि त्यांना स्वस्थ बसूं देत नसे. त्यांच्या बुद्धीचें चक्र नेहमीं वेगानें फिरत असे; कोणत्याही गोष्टींत त्यांचें एकदां मन गढलें म्हणजे एकसारखा तिचा विचार चालावयाचा. दुसरीकडे लक्ष लागावयाचें नाहीं. आपल्याच विचाराच्या तंद्रींत मनाशींच पुटपुटावें, माना हलवाव्या, बोटें चाळवावीं, टाळी वाजवावी असें त्यांचें नित्य चाले. भोजनास बसले असले तरीही डोक्यांत विचारांचें चक्र फिरत असावयाचें. त्यामुळें त्यांचे मातुश्रीस त्यांचें भोजन आटोपेपर्यंत त्यांच्याजवळ बसावें लागे. नाहींतर विचाराच्या तंद्रींत स्वारी मध्येंच उठून जाई. जेवण पुरतें झालें कीं नाहीं ह्याचें त्यांचें त्यांनांच भान रहात नसे. त्यांच्या बुद्धीचें चक्र जसें वेगानें फिरे

तसेंच त्यांचें चालणेंही मोठें वेगाचें असे. पुण्यास त्या वेळीं त्यांना ओळखण्याची एक खूणच पडून गेली होती. ‘ सार्वजनिक-काका ’ कोणते म्हणून कोणी विचारलें तर डोक्यांत नेहमीं विचारांचें चक्र चालू ठेवून जणूं काय एखाद्या कार्याची मनाला चिंता लागून राहिली आहे, अशा तऱ्हेची मुद्रा धारण करून रस्त्यानें मोठ्या झपाट्यानें चालत जाणारा इसम, ते ‘ सार्वजनिक–काका ’ असें खुशाल सांगून द्यावें, आणि तें सहसा खोटें ठरत नसे ! !

## परिस्थिती.

पुढील कथानकाकडे वळण्याच्या अगोदर त्या वेळची परिस्थिति कशी होती हें प्रथम सांगितलें पाहिजे.

इसवी सन १८१८ मध्यें पुण्याच्या शनवारवाड्यावर इंग्रजांचें निशाण फडकलें; तथापि साधारणपणें सन १८६० पर्यंतचा काल इंग्रजांना जम बसविण्यांत खर्ची घालावा लागला. मध्यंतरी सन १८५७ सालची बंडाची वावटळ इकडेही कांहीं धामधूम करत्यें कीं काय अशी सरकारला भीति वाटूं लागली होती; परंतु सुदैवानें तसें कांहीं झालें नाहीं. १८५७ सालच्या बंडाचा वणवा विझल्या-नंतर इंग्रज सरकारचें लक्ष प्रजेकडे वळलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कदाचित् कंपनी सरकारचें हातून राज्यसूत्रें काढून राणी सरकारनें तीं आपल्या हातीं घेतल्यामुळें असें झालें असेल. कांहींही असो. तोंपर्यंत स्वतःचें बूड कायम टिकवणें हाच केवळ हेतू डोळ्यांपुढें ठेवून त्यांचें राज्यकारभाराचें धोरण चालू होतें हें खरें. सत्तावन्न सालच्या बंडानें महाराष्ट्राचें स्वास्थ्य बिघडलें नाहीं, असें जेव्हां सरकारच्या नजरेस आलें तेव्हां त्याला वाटूं लागलें कीं, आतां लोकांवर विश्वास टाकण्यास व त्यांना आपल्या विश्वासांत घेण्यास हरकत नाहीं. आणि तेव्हांपासून पुढें त्यांनीं येथील लोकांस सुशि-

क्षण देण्यास सुरवात केली. परंतु अव्वल इंग्रजींत इंग्रजी शिक्षण घेणारे लोक फारच थोडे होते; व जे अशा रीतीनें आङ्ग्लविद्याविभूषित होत, ते इंग्रजीमय होऊन जात. त्यांना इंग्रजी तेवढें चांगलें, आपलें सर्व वाईट; इंग्रज शहाणे, आपण मूर्ख; इंग्रज पराक्रमी, आपण दुर्बळ असें वाटूं लागलें. अर्थात् जनतेला योग्य मार्गदर्शक कोणीच मिळेना. इंग्रज हे बोलून चालून परके लोक. येथें राज्य व व्यापार करण्याकरितां आलेले. शिवाय त्यांना हिंदूंच्या रीती–रिवाजांची माहिती नव्हती. आपल्यांतलेच सुशिक्षित पहावे तर तेही इंग्रजी बनलेले! बरें, जुन्या एखाद्याला शास्त्री–पंडिताला पुढारी बनवावें तर त्याला मान कोठें आहे? त्याला कोणी विचारीत नाहीं. अशी एकंदर समाजाची स्थूलमानानें स्थिती होती. एका टोंकाला सरकार व दूसऱ्या टोंकाला जनता. सरकार काय करतें आहे, व आपण काय केलें पाहिजे, तसेंच जनतेचीं दुःखें काय आहेत व तीं दूर कशीं करतां येतील हें कोणाचें कोणाला समजेना! कालाच्या अफाट दर्यांत जनता सरकारच्या लहरीच्या वाऱ्याप्रमाणें इकडून तिकडे हेलकावे खात राहिली होती. तिला योग्य मार्गदर्शक कोणीच नव्हता. गणपतरावांना जनतेची ही असहाय्य स्थिती पाहून भडभडून आलें. त्यांच्या मनाला सारखी तळमळ लागून राहिली. ह्या असहाय्य स्थितींतून जनतेला कसें सोडवावें हा एकच एक विचार रात्रंदिवस त्यांच्या डोक्यांत घोळूं लागला. आपल्या डोक्यांतील विचार त्यांनीं त्या वेळच्या आपल्या मित्रांना बोलून दाखविले; व त्यावर त्यांनाही कांहीं युक्ति सुचत असल्यास विचारलें. त्यांच्या मित्रांपैकीं कोणी कांहीं, कोणी कांहीं मार्ग त्यांना सुचविलें. कोणी त्यांच्याचप्रमाणें अगदीं नवीन असा एखादा मार्ग सांपडल्यास तो शोधून काढण्याच्या मार्गाला लागले.

## ' सार्वजनिक सभा '

ह्याच सुमारास पुण्याच्या पर्वती संस्थानच्या कारभारांत कांहीं गडबड आढळून आली. पर्वती संस्थानचा कारभार त्यावेळीं कांहीं पंचांचे हातीं होता. हे पंच आपलें काम योग्य रीतीनें बाजवीत नसत. संस्थानच्या हिशोबांत कांहीं गडबड झालेली होती. संस्थानच्या ज्या नेमणुका ठरवून दिलेल्या होत्या, त्या नेमणुकांचा पैसा योग्य रीतीनें खर्चला जात नसे; पुण्याच्या कांहीं मंडळीला ही अंदाधुंदी बंद करावयाची होती, व संस्थानच्या व्यवस्थेंत योग्य ती सुधारणा घडवून आणावयाची होती. परंतु हें घडवून आणावयाचें कसें ? अंदाधुंदी बंद करावयाची तर पंचांवर फिर्याद करावयास पाहिजे. पण पंचांवर फिर्याद करावयास अधिकार कोणाला आहे असा प्रश्न-उपस्थित झाला. अर्थात् एखादी लोकप्रतिनिधींची सभा स्थापन केली तर तिला अशावेळीं लोकांच्या वतीनें बोलतां येईल अशी त्यावर तोड निघाली; व त्याप्रमाणें लोकांनीं आपली एक खाजगी सभा बोलावली. परंतु पुढें तीच जाहीरसभा होऊन पर्वती संस्थानचें एकच एक काम न करितां दुसरीही अनेक लोकोपयोगी सार्वजनिक कामें तिच्यातर्फे करतां यावीं असें ठरून ह्या सभेला प्रातिनिधिक स्वरूप देण्यांत आलें. सभेंत श्रीमंत-गरीब दोन्ही प्रकारच्या लोकांचा समावेश असावा, व तिला राजदरबारींही मान्यता असावी म्हणून सभेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या जागेवर महाराष्ट्रांतील प्रमुख संस्थानिक, सरदार ह्यांची निवडणूक करण्यांत आली होती. हीच ' सार्वजनिक–सभा ' होय ! ही सभा तारीख २ माहे एप्रील सन १८७० रोजीं वर्ष प्रतिपदेच्या शुभ मुहूर्तावर औंधकरांचे वाड्यांत श्रीमंत श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झाली. सार्वजनिक कामें करणारी सभा म्हणून तिचें नांव ' सार्वजनिक–सभा ' असें ठरलें.

गणपतरावँ शोधीत असलेला उपाय त्यांना सांपडला. ही सभा स्थापन करण्याचें कामीं त्यांनींच मुख्यतः खटपट केली. सभेची संघटना, व नियम हेही त्यांनींच केलेले आहेत. सदर सभेच्या चिटणिसांच्या यादींत जरी फक्त एकदांच गणपतरावांचें नांव दिसून येतें तरी ते मरेपर्यंत सभेचे एक आधारस्तंभ होते. ही सभा स्थापन केल्यापासून गणपतराव सार्वजनिक कार्याकडे आपला बहुतेक काळ व लक्ष घालूं लागले म्हणून सर्वजण त्यांनांही 'सार्वजनिक—काका' ह्या टोपण नांवानेंच हांका मारूं लागले. पुढें त्यांचें तेंच नांव रूढ होऊन सर्वतोमुखीं झालें. आपणही आतां त्यांचा 'सार्वजनिक-काका' ह्याच नांवानें ह्या पुढें उल्लेख करीत जाऊं. ह्या सभेच्या अधिकारी मंडळांत मोठमोठ्या संस्थानिकांचाही समावेश झालेला होता हें वर सांगितलेंच आहे. अगदीं पहिल्या वर्षाच्या निवडणुकींत औंधकर अध्यक्ष; भोरकर, जमखिंडीकर, सांगलीकर, पुरंदरे, कुरुंदवाडकर, मेणवलीकर, उपाध्यक्ष; आणि राजमाचीकर, गंगाधर विश्वनाथ गोखले, बाबाजी कृष्ण गोखले, पांडुरंग दिनकर कर्वे व गणेश वासुदेव जोशी ऊर्फ 'सार्वजनिक—काका' हे चिटणीस होते. दुसऱ्या सन १८७३ सालच्या निवडणुकींत मिरजकर, अक्कलकोटकर, जतकर, फलटणकर, हेही संस्थानिक उपाध्यक्षांच्या यादींत समाविष्ट झालेले आढळतात. ह्या निवडणुकींत रामचंद्र आनंदराव उदास व शिवराम हरी साठे हे चिटणीस निवडले गेले. ह्या निवडणुकीं नंतर सन १८७८।७९ सालापर्यंत अधिकारी मंडळांत फरक झाला नाहीं. रा. महादेव मोरेश्वर कुंठे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, रा. कृष्णाजी रघुनाथ केळकर ह्यांच्यासारखे कांहीं सरकारी नोकरही सभेचे सभासद होते. संस्थानिक व सरकारी नोकर ह्यांचा समावेश सन १८९७ सालापर्यंत असलेला आढळतो. त्या सालापर्यंत सभेला सरकारकडूनही मान्यता मिळालेली होती. तिला जनतेच्या वतीनें

आपलें मत सरकारकडे लिहून कळविण्याचा अधिकार होता; परंतु सन १८९७ सालचे सुमारास सभेकडून कांहीं मर्यादाचा अतिक्रम झाला असें सरकारास वाटल्यामुळें सरकारची सभेवर खप्पा मर्जी झाली; आणि तेव्हांपासून एक एक संस्थानिक व सरकारी नोकर हळू हळू सभेंतून आपलें अंग काढून घेऊं लागला.

सार्वजनिक-काकांनीं ह्या सभेला "सार्वजनिक-सभा" हें अन्वर्थक नांव दिलें व अपत्य निर्विशेष तिची काळजी वाहिली. ही सभा स्थापन होऊन एक वर्ष पुरें होतें न होतें तों तिला सुसंघटित स्वरूप देऊन नांवारूपाला आणून देणारी एक थोर व्यक्ति तिच्या सुदैवानें तिला लाभली. रावबहादूर महादेव गोविंद रानडे ह्यांचें नांव कोणास ठाऊक नाहीं? रावबहादूर ह्यांची अगाध विद्वत्ता, त्यांची सार्वजनिक काम करण्याची आवड, देशोन्नतीची कळकळ, देशाभिमान, कल्पकपणा ह्या गुणांची ओळख कोणास नव्यानें करून देण्याची आवश्यकता नाहीं. रावबहादूर रानडे ह्यांची त्यावेळीं पुण्यास बदली होऊन ते तेथें आले होते. उपरिनिर्दिष्ट थोर व्यक्ति म्हणजे रावबहादूर रानडे हे होत. सार्वजनिक सभेचे काम जरी 'सार्वजनिक—काका' करीत असत, तरी माधवराव पुण्यांत आल्यावर ते तिच्याकडे विशेष लक्ष घालूं लागले, व लवकरच सभेचीं सर्व सूत्रें त्यांच्या सल्ल्यानें हलूं लागलीं. रावबहादूर हे 'सार्वजनिक-काका' पेक्षां वयानें पुष्कळ लहान होते, तथापि ते विद्वान, हुशार व देशाभिमानी आहेत अशी काकांची खात्री होती व म्हणूनच ते त्याच्या सल्ल्यानें वागण्यांत कमीपणा मानीत नसत. माधवरावांचें ह्या सभेमध्यें जरी प्रमुखत्वानें अंग होतें तरी सभेच्या सभासदांच्या पटांत मात्र त्यांचें नांव कोठेंच आढळून येत नाहीं; ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

## माधवराव रानडे.

पेशवाईचें वैभव नष्ट होऊन इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर महाराष्ट्र देश दिवसें दिवस आपलें पूर्व-तेज विसरून जाऊन 'थंडा-गोळा' बनत चालला होता. त्या थंड-गोळ्यांत नवचैतन्य उत्पन्न करण्याची कामगिरी रावबहादूर माधवराव रानडे ह्यांनीं उत्तम रीतीनें पार पाडली. माधवराव हे त्या काळचें खरोखर एक अलौकिक 'नवरत्न' होतें. त्यांची विशाल बुद्धिमत्ता, त्यांचें गांभीर्य, त्यांचें अगाध ज्ञान, त्यांची सार्वजनिक कार्य करण्याची हातोटी व कार्याची कळकळ, त्यांचा शांत व विचारी स्वभाव ह्यांचा महाराष्ट्रालाच नव्हे तर अखिल हिंदुस्थान देशाला अतीशय उपयोग झाला. ते उच्च दर्जाचे सरकारी अधिकारी असल्यामुळें त्यांना कोणत्याही सार्वजनिक चळवळीशीं उघडरीतीनें संबंध ठेवतां येत नसे; तथापि त्या वेळची महाराष्ट्रांत अशी एकही संस्था दाखवितां येणार नाहीं कीं, ज्यामध्यें माधवरावांचा कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारें संबंध पोंचत नाहीं. प्रत्येक संस्थेला त्यांनीं आपल्या बुद्धिमत्तेचा, सुविचाराचा व अनुभवाचा फायदा दिला आहे. प्रत्येक संस्थेला ह्यांनीं हातीं धरून तिला चालती बोलती करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि 'सार्वजनिक सभेचे' उद्देश व तिच्या कार्याधिकारीवर्गांतील 'सार्वजनिक-काकां' सारखीं अंगमेहनतीनें झटणारीं जिवंत कळकळीचीं माणसें पाहून 'सार्वजनिक-सभे'बद्दल त्यांना विशेष प्रेम उत्पन्न झाल्यास नवल तें कोणतें? शिवाय त्यावेळीं 'संस्था' ह्या सदराखालीं येणाऱ्या ज्या कांहीं थोड्या बहुत मंडळ्या महाराष्ट्राच्या उदयाचलावर उदीत झाल्या होत्या त्या सर्वांत 'सार्वजनिक सभा' ही विशेष तेजस्वी असल्यामुळें तिच्याकडून आपणांला हवें तसें सार्वजनिक-कार्य करवून घेतां येईल अशा महत्त्वाकांक्षेनें माधवरावांनीं

आपलें लक्ष तिच्याकडे अधिक पुरविलें असें म्हटलें तरीही चाल-ण्यासारखें आहे. ‘ सार्वजनिक—काकांनीं आपली ही कन्यका लव-करच माधवरावांचे हवालीं केली व त्यानींही तिच्याकडून बरीच कामगिरी करवून घेतली. ह्या संबंधाची सविस्तर हकिगत फाटक कृत न्या रानडे ह्यांच्या चरित्रांत विशेष विस्तारानें दिली असल्यामुळें त्याची येथें चर्चा करण्याचें प्रयोजन नाहीं. सार्वजनिक काकांचे हयातींत व त्यांच्या हस्तें ह्या सभेनें काय काय लोकोपयोगाचीं कामें केलीं एवढ्याचा इतिहास येथें दिला म्हणजे बस्स आहे !

## सार्वजनिक सभेचें काम.

पर्वती संस्थानच्या कारभारांतील गोंधळ काढून टाकून, त्याला लोकमतानुवर्ती वळण द्यावें असा जो मूळ ‘ सार्वजनिक—सभेचा ’ उद्देश त्याकरितां तिनें आपल्याकडून शक्य ते उपाय केले. एकीकडे हें प्रकरण ‘ रेव्हिन्यू—कमिशनर ’ व दुसरीकडे ‘ दिवाणी—कोर्ट ’ एथपर्यंत पोंचविलें; परंतु सभेला ह्या कामांत यावें तसें यश आलें नाहीं. तथापि एवढ्यावरच न थांबतां सार्वजनिक कार्यांच्या गोडीनें सभेनें दुसरींही कित्येक लोकोपयोगी कामें हातीं घेतलीं. सरकार हें परमुलखी व परधर्मी असल्यामुळें त्यास हिंदी प्रजेच्या चालीरीती, धर्मसमजुती वगैरे कळणें शक्य नव्हतें. त्यामुळें आपल्या प्रजेच्या खऱ्या गरजा कोणत्या आहेत, त्यांनां राज्यकारभारांत कोणत्या अड-चणी भासतात; व तीं त्यांचीं गाऱ्हाणीं दूर करण्यांत कोणते उपाय योजावेत वगैरे गोष्टींचा उहापोह करून लोकांच्या तर्फेनें लोकांची बाजू राजदरबारीं मांडणें अवश्य झालें होतें. हें कार्य पार पाडणें हा सभेचा हेतू होता. त्यावेळीं अशा प्रकारची कामगिरी करण्याच्या संस्था नव्हत्याच म्हटलें तरी चालेल. मुंबईस ‘ बांबे असोसिएशन ’ ह्या नांवाची एक संस्था होती, व तिच्यांत दादाभाई नौरोजी, नौरोजी

फर्दुंजी, जगन्नाथ शंकरशेट, डॉक्टर भाऊदाजी ह्यांच्यासारखी प्रमुख मंडळी होती, ह्याचप्रमाणें कलकत्त्यास ' ब्रिटिश इंडियन असोसिए-शन ' ह्या नांवाची एक संस्था होती, व तिच्या चालक मंडळींत बाबू क्रिस्तोदास पाल, डॉ. राजेंद्रलाल मित्र त्यांच्यासारखी बडी मंडळी होती. तथापि ' सार्वजनिक सभे'चें काम जितकें व्यवस्थित रीतीनें आणि जोमानें चाललें होतें, तितकें ह्या संस्थांचें नव्हतें. एकाद्या प्रश्नावर लोकमत काय आहे हें जरी सरकारनें वर्तमानपत्रां-तून वाचलें असलें, तरी त्याला उत्तर दिलेंच पाहिजे असें सरकारास त्यावेळीं वाटत नसे. हल्लीं कायदे कौंसिलें, वरिष्ठ कौन्सिलें, वगैरें-तून लोकनियुक्त सभासद निवडून गेलेले असल्यामुळें ते लोकांचें म्हणणें काय आहे हें सरकारच्या कानावर घालणें, व सरकारच्या म्हणण्याला कौन्सिलांतील वादविवादाच्या रूपानें वाच्यता देणें इत्यादि कामें करतात; परंतु सन १८७०।७१ सालचे सुमारास अशा प्रका-रची स्थिती नव्हती. त्यावेळीं आपलें अनुकूल प्रतिकूल मत सरका-रचे कानावर घालण्यास एकच साधन होतें, आणि तें म्हणजे ' अर्ज ' हें होय. हे अर्ज ह्या सभेच्यामार्फत गेल्यानें त्यांना सरका-रकडून कांहीं ना कांहीं उत्तर येत असे. कारण सार्वजनिक सभेनें आपल्या कर्तबगारीनें, जोमानें, व धैर्यानें चालविलेल्या आपल्या कामगिरीनें, आपले लोकांवरच नव्हे तर मोठमोठ्या परकी अंमल-दारांवरही आपली छाप बसविली होती. अर्थातच सभेचें सर्वांना मोठें महत्त्व वाटे.

' सार्वजनिक–सभे 'नें कोणत्याही एका विशिष्ट प्रकारचें काम न करतां विविध प्रकारचीं लोकोपयोगी कामें केलीं. पर्वती संस्था-नचें प्रकरण संपल्यावर तिनें पुणें शहर सुधारणेचीं कामें हातीं घेतलीं; परंतु लवकरच स्थानिक गोष्टींच्या पलीकडे तिचें लक्ष प्रांतिक व सार्वदेशिक विषयांकडे वळूं लागलें. त्या वेळीं जे कायदे

होत, त्यांचे मसुदे इंग्रजींत प्रसिद्ध होत, त्यामुळें इंग्रजी न जाणणारांस ते समजत नसत. म्हणून कायद्याचे मसुदे कायदे पास झाल्यास ते कायदे वगैरे देशी भाषेंतून प्रसिद्ध केले जावेत अशी सभेनें सरकारास विनंति केली. तेव्हांपासून आतां पर्यंत कायद्यांचीं बिलें जीं कायदेकौन्सिलांत येतात तीं सर्व देशी भाषांतून प्रसिद्ध होत असतात. मुंबई हायकोर्टांत एतद्देशीय न्यायाधीश नेमला जावा ह्या बद्दलची खटपट सभेनेंच केली; व त्याप्रमाणें गव्हर्नमेंटनें पहिले हिंदी न्यायाधीश नानाभाई हरीदास यांस नेमिलें. तसेंच फौजदारी खटल्यांत ज्यूरीचे हक्क, रेल्वेउतारूंच्या तक्रारी, म्युनिसिपालिटींत लोकनियुक्त सभासदांच्या नेमणुकी, संस्थानिक व सरकार ह्यांचे परस्पर संबंध अशा अनेक बाबतींत सरकारास वेळोवेळीं सूचना सादर करण्याचें, विनंत्या करण्याचें काम सभेनें सुरू ठेविलें. सन १८७२ सालीं हिंदुस्थानचें कैवारी 'फॉसेट' साहेब ह्यांना 'ब्रायटनच्या' मतदारांनीं निवडून दिलें ह्याबद्दल सभेनें फॉसेट साहेबांचें अभिनंदन केलें, व त्यांनां निवडून देणाऱ्या मतदारांचे आभार मानले. त्याच सालीं हिंदुस्थानच्या कारभाराची चौकशी करण्याकरितां पार्लमेंटनें एक कमिटी नेमिली होती. त्या कमिटीपुढें साक्ष देण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें कांहीं प्रतिनिधी पाठविले होते. मुंबईच्या 'बाम्बे असोसिएशन'तर्फे नौरोजी फर्दुंजी ह्या नांवाचे एक पारशी गृहस्थ विलायतेस गेले होते. पुण्याच्या 'सार्वजनिक–सभेला'ही आपला एक प्रतिनिधी पाठवावयाचा होता; परंतु अखेरपर्यंत कोणीच योग्य प्रतिनिधी न मिळाल्यामुळें वरील फर्दुंजी शेट ह्यांसच तिनें आपल्याही प्रतिनिधित्वाचा मान दिला. सन १८७२ च्या डिसेंबर महिन्यांत महाराष्ट्रांतील सर्व जिल्ह्यांची सांपत्तिक–दृष्ट्या पहाणी करण्याचा ठराव 'सार्वजनिक–सभेनें' केला, व लगेच त्याप्रमाणें कामास सुरवातही झाली. सन १८७३ सालीं सभेनें आपली पहाणी पुरी करून

तिचा रिपोर्ट पुस्तक रूपानें प्रसिद्ध केला. ह्या रिपोर्टांत अहमदनगर, सोलापूर वगैरे जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या हृदयद्रावक स्थितीचें वर्णन असून, त्यावर काय उपाय योजणें आवश्यक आहेत इत्यादि गोष्टींचा उहापोह केला आहे. सन १८७४ सालीं 'सार्वजनिक–सभेनें' विलायतेंतील पार्लमेंटला एक मोठा थोरला अर्ज पाठविला, व त्यांत हिंदुस्थान देशातर्फे कांहीं प्रतिनिधी कॉमन्ससभेमध्यें घ्यावें अशी मागणी केली. सत १८७५ सालीं बडोद्याचे महाराज मल्हारराव गायकवाड ह्यांचा बचाव करण्याकरितां 'सभेनें' चंग बांधिला. सन १८७६ सालीं महाराष्ट्रांत दुष्काळ पडला. त्यावेळीं दुष्काळाचें स्वरूप जाणून घेऊन सरकारकडे सभेनें पत्रव्यवहार सुरू केला. दुष्काळ फंड जमवून ठिकठिकाणीं दुष्काळ कमिटया नेमल्या, एवढेंच नव्हे तर विलायतेंतील लोकांचेंही इकडे लक्ष वेधावें व त्यांनीं येथील दुष्काळग्रस्तांनां मदत करावी म्हणून विलायतेंतील वर्तमानपत्रांतून जाहिराती वगैरे देऊन फंड जमविण्याची खटपट करण्यासही सभेनें कमी केलें नाहीं. अशा प्रकारची विविध स्वरूपाची कामें 'सार्वजनिक–सभेनें' सुरू केली. प्रत्येक कामांत सार्वजनिक सभेचें काका व माधवराव रानडे ह्या दोन व्यक्ति बहुशः प्रमुख असत. किंबहुना सार्वजनिक सभेचें काका हें 'धड' व माधवराव हें 'शिर' होतें असे म्हटलें तरी चालेल! असो. काकांच्या चरित्रानुरोधानें त्यांतील कांहीं गोष्टींची पुनरुक्ति होणारच आहे, तेव्हां काकांच्या चरित्रक्रमाकडे वळावें हें बरें!

## स्वदेशी.

माधवराव रानडे पुण्यास सन १८७१ च्या नवंबर महिन्यांत बदलून आलें. 'सार्वजनिक–सभा' जरी सन १८७० मध्यें स्थापन झाली असली तरी माधवराव तिच्या धोरणांत लक्ष घाली-

पर्यंत तिला योग्य वळण लागलें नव्हतें असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. माधवराव पुण्यास येऊन 'सार्वजनिक–सभेंत' लक्ष घालूं लागल्यावर एक दिवस 'काका'नीं त्यांच्यापुढें देशांतील वाढत्या दारिद्र्याचें चित्र रंगविलें व देशोन्नतिकारक कांहीं उपाय असल्यास सुचविण्याविषयीं माधवरावांना विनंती केली. पुढें बराच विचार–विनियम होऊन 'देशीला उत्तेजन देणें' हाच देशोन्नतीचा सुलभ मार्ग आहे असें ठरलें. काकांनीं लगेच एक 'देशी-व्यापारोत्तेजक मंडळ' नांवाची संस्था काढली व तिच्या मार्फत जागोजाग स्वदेशी वस्तूंचीं दुकानें उघडलीं. परंतु नुसतीं देशी वस्तूंचीं दुकानें काढून अगर कोरडीं व्याख्यानें देऊन भागावयाचें नाहीं, स्वतःच्या आचरणानें जनतेला धडा घालून दिला पाहिजे असें पटतांच काकांनीं सन १८७२च्या जानेवारीच्या बारावे तारखेस स्वतः देशी कापड वापरण्याची शपथ वाहिली, व ती अमरणांत निश्चयानें पाळली.

काकांनीं स्वदेशी वस्त्रें वापरण्याचा निश्चय केल्याबरोबर त्यांनीं आपल्या पहिल्या छानछोकीच्या पोषाखाला 'रामराम' ठोकला. पहिलीं रेशीमकांठीं धोतरें जाऊन त्याच्या जागीं खादीचीं दाभणकांठीं धोतरें आलीं, पहिलें पैठणी पागोटें जाऊन त्याच्याजागीं साधें कंदी पागोटें आलें, पहिला छडीदार उंची अंगरखा जाऊन त्याच्याजागीं जाडाभरडा खादीचा अंगरखा आला. स्वदेशीचें व्रत काकांना इतकें पटलें होतें कीं त्या दिवसापासून

**'डौली भपकेदार वस्त्र तें वाटे कीं जणुं कुचला'**

अशा प्रकारची त्यांची मनःस्थिति झाली. पहिला नीटनेटका व भपकेबाज पोषाख टाकून त्याऐवजीं जाडा भरडा खादीचा पोषाख वापरूं लागल्यामुळें काकांचा त्यावेळीं पुष्कळ जणांनीं उपहास केला. कोणी हा मार्ग शास्त्रोक्त नाहीं असें त्यांस सांगितलें. कोणी

मोठ्या शिष्टपणाचा आव आणून गंभीरपणानें त्यांना विचारूं लागले, ' अहो ! तुम्हीं जर असा जाडा भरडा कपडा वापरूं लागलांत, आणि दुसऱ्यांनांही तसा वापरण्याचा उपदेश करूं लागलांत तर देशांतील व्यापाराला उत्तेजन कसें मिळेल ? आणि व्यापार जर वाढला नाहीं तर लोकांची उपासमार झाल्याशिवाय कशी राहील?' कोणी टवाळ तर इतके पुढें गेले कीं, त्यांनीं काकांना चळ लागला आहे असें ठरविलें, व कित्येकदां त्यांचा अपमानही केला. परंतु त्या धैर्यशाली पुरुषानें त्या अपमानाला न जुमानतां, उपहासाकडे लक्ष न देतां, आपलें व्रत तसेंच नेटानें चालू ठेविलें. माधवरावांना ही गोष्ट समजली तेव्हां काकांची वागणूक वेडेपणाची नसून ते कसे बरोबर आहेत, व लोक कसे व कोठें चुकत आहेत हें लोकांना विशद करून सांगण्याकरितां त्यांनीं ' स्वदेशी ' ह्या विषयावर दोन व्याख्यानें दिलीं. पहिल्या व्याख्यानांत हिंदी लोकांचा विलायती जिन्नस घेण्याकडे कल विशेष असल्यामुळें हिंदी कलाकौशल्याचा क्षय कसा होत चालला आहे; हिंदुस्थान देशाची आयात व निर्गत हीं नेहमीं विषम प्रमाणांत कशी असतात व त्यामुळें हिंदी व्यापाराची स्थिती कशी शोचनीय झाली आहे; राजकीय पराभवापेक्षां औद्योगिक पराभवच आपणांस कसा अधो-गर्तास नेत आहे; व देशी कारागिरांस भिकेस लावून देशाची संपत्ति कशी शोषीत आहे; इत्यादि गोष्टी अर्थशास्त्रांतील प्रमेयांच्या आधारानें माधवरावांनीं लोकांना विशद करून सांगितल्या. दुसऱ्या व्याख्यानांत माधवरावांनीं हिंदी व्यापाराचें विवेचन केलें. व्यापा-रांतील प्रत्येक भाग तपशीलवार घेऊन, इंग्रजी राज्यांत ह्या देशाचा व्यापार पूर्वीपेक्षां वाढला असतांही देशांतील दारिद्र्य कमी न होतां उलट दिवसेंदिवस तें वाढतच आहे, ह्या कोडयाचा त्यांनीं उत्तम रीतीनें आपल्या श्रोत्यांना उलगडा करून सांगितला. माधवरावांच्या

ह्या व्याख्यानांचा परिणाम श्रोतृ–वृंदावर इतका झाला कीं, कित्येक लोकांनीं सभेंत उठून आम्हीं आजन्म स्वदेशी माल वापरूं, काट-कसरीनें राहूं, आणि देशी कारखाने काढून देशबांधवांच्या पोटाला मिळेल असें कांहीं तरी करून दाखवूं म्हणून शपथा वाहिल्या. असो. माधवरावांनीं हें सर्व कां केलें? तर सार्वजनिककाकांनीं जो स्वदेशीचा अंगिकार केला होता, व ज्याकरितां ते इतर लोकांच्या उपहासाला पात्र झाले होते, त्या स्वदेशीचें समर्थन करून काकांची बाजू उचलून धरण्याकरितां होय. कांहीं ग्रंथकारांच्या मतें माधवरावांच्या 'स्वदेशी' वरील पहिल्या भाषणाचा काकांच्या मनावर परिणाम होऊन त्या आवेशांत त्यांनीं स्वदेशी कापड वापरण्याची शपथ घेतली असें आहे. जनतेनें आपलें अनुकरण करावें ह्या उद्देशानें कदाचित् त्यांनीं त्या वेळीं शपथ घेतली असेल; कारण लोकांना आपलें म्हणणें पटावें म्हणून स्वतः माधवरावांनींही ह्या सभेंत स्वदेशी माल वापरण्याची शपथ घेतल्याचा उल्लेख आढळतो. कांहीं असो. स्वदेशीचाच नव्हे तर खादीचा अंगिकार करणारे पहिले महाराष्ट्रीय गृहस्थ 'सार्वजनिक काका'च होत ह्याबद्दल मत–भेद होईल असें वाटत नाहीं.× स्वदेशी चळवळ ह्यावेळीं मोठ्या आवेशानें सुरू झाली. पुण्यास आणि इतरत्रही स्वदेशी कापडाचीं दुकानें निघालीं. स्वदेशी छत्र्या, काडयाच्या पेट्या, साबण, मेणबत्त्या इत्यादि जिन्नस तयार होऊन बाजारांत येऊं लागलें. सूत काढून गंजीफ्रॉक वगैरे माल गिरण्यांत तयार होऊं लागला. खुद्द काकांनीं काडयांच्या पेटया, छत्र्या, आणि देशी–माग ह्यांचा कारखाना आपल्या घरीं काढून बरीच झीज सोसली. आतां त्यांनीं वकिली बहुतेक सोडलीच

---

× 'काका' स्वतः सूत काढून त्याचें आपल्या घरच्या हातमागावर कापड विणून तें वापरीत असत अशी माहिती मिळते.

होती. त्यांचें सारें चित्त स्वदेशी चळवळींत आणि सार्वजनिक सभेच्या उत्कर्षाकडे लागलें होतें.

काका जाडे—भरडे कपडे वापरूं लागले. त्यांत त्यांनीं भेदाभेद ठेविला नाहीं. हल्लींच्या पुढाऱ्यांकडे नीट लक्ष देऊन पाहिल्यास त्यांच्या आचरणांत भेदाभेद दृष्टीस पडल्याशिवाय रहात नाहीं. व्यास-पीठावर खादीच्या शुभ्रवस्त्रानें अलंकृत होऊन खादीचा उपदेश करणारे पुढारी, व्यासपीठावरून खालीं उतरून, कोर्टांत अगर दुसऱ्या एकाद्या बड्या प्रसंगाला जाऊं लागले म्हणजे आपला खादीचा उपदेश स्वतःच विसरून जाऊन, विदेशी कापड वापरण्यास कमी करीत नाहींत असा पुष्कळवेळां अनुभव येतो. काकांची गोष्ट मात्र तशी नव्हती. ‘चित्ते वाचि क्रियायां च महतामेकरूपता,’ ह्या न्याया-प्रमाणें आचारांत, विचारांत व उच्चारांत त्यांची नेहमीं एकवाक्यता असे. ते सार्वजनिक सभेतर्फे दिल्लीच्या बड्या दरबाराला गेले होते त्यावेळीं देखील त्यांनीं आपला जाडाभरडा पोषाख सोडला नव्हता. अलीकडल्या पुढाऱ्यांनीं ह्यापासून पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे.

## किरकोळ.

इसवी सन १८७३ सालीं सार्वजनिक सभेनें महाराष्ट्रांतील जिल्ह्यांची सांपत्तिक दृष्ट्या पहाणी करण्याचा ठराव पास केला; व त्याप्रमाणें प्रत्यक्ष कार्यालाही सुरवात केली. सर्व जिल्ह्यांची पहाणी संपल्यावर सभेनें त्या संबंधाचा आपला रिपोर्ट सरकारास व जनतेस सादर केला. सदर्हू रिपोर्टांत अहमदनगर, सोलापूर वगैरे जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची स्थिति किती निकृष्ट आहे ह्याचें वर्णन केलें असून, त्यावर सरकारच्या कृपेची अपेक्षा न धरतां स्वावलंबनाच्या मार्गानें जाऊन आपली उन्नती कशी करून घेतां येईल ह्या संबंधींचें त्यांत विवरण केलेलें आहे.

ह्याच सालामध्यें विलायतेस हिंदुस्थानांतील जमाबंदीच्या व्यवस्थे-संबंधानें विचार करण्याकरितां पार्लमेंटनें एक कमिटी नेमिली होती. ह्या कमिटीनें कांहीं हिंदी प्रतिनिधींच्याही साक्षी घेण्याचें ठरविलें होते. त्यांत पुण्याच्या 'सार्वजनिक–सभे'चाही एक प्रनिनिधी होता. ह्या प्रतिनिधीचें नांव मिस्तर नौरोजी फर्दुंजी असें होतें. वास्तवीक पहातां हे गृहस्थ मुंबईच्या 'धी बॉम्बे असोसिएशन'चे प्रतिनिधी. परंतु 'सार्वजनिक सभेला' शेवटल्या घटकेपर्यंत आपला स्वतंत्र प्रतिनिधी ह्या नात्यानें साक्ष देण्यासाठीं लायक इसम मिळेना. तेव्हां शेवटीं सभेनें आपल्याही प्रतिनिधित्वाची माळ फर्दुंजीशेट ह्यांच्या गळ्यांत घातली. ह्या कमेटीपुढें ज्या ज्या साक्षी झाल्या त्या सर्वांचा वृत्तांत इकडे सार्वजनिक–सभेमार्फत प्रसिद्ध होऊं लागला.

इसवी सन १८७४ सालीं 'सार्वजनिक–सभेनें' विलायतच्या पार्लमेंटकडे एक अर्ज पाठविला. ह्या अर्जांत सभेनें, विलायतच्या पार्ले-मेंटमध्यें हिंदुस्थान देशातर्फेचे कांहीं प्रतिनिधी असावे व हिंदुस्थान देशाच्या राज्यकारभार विषयक प्रश्न त्यांच्या सल्लामसलतीनें सोड-विण्यांत यावे अशी विनंती केली होती.

ह्या सर्व गोष्टींचा वर एकदां त्रोटक उल्लेख आलेलाच आहे. ह्या सर्व गोष्टींत माधवरावांचें अंग जरी प्रामुख्यानें होतें, तरी सार्वजनिक काकांचा त्यांत हात नव्हता असें नाहीं.

काकांच्या अंगमेहनतीनें, व माधवरावांच्या प्रेरणेनें 'सार्वजनिक-सभेनें' एवढ्याशा चार वर्षांच्या कालांतच आपली उपयुक्तता व योग्यता जनतेला इतकी पटवून दिली कीं, तिचें नांव सर्वतोमुखीं होऊन, सर्वांना सार्वजनिकसभेसंबंधानें, आदर व अभिमान वाटूं लागला. सन १८७४ सालीं इंदूरकर महाराज तुकोजीराव होळकर पुण्यास आले त्यावेळीं त्यानींही ह्या सभेचें कौतुक केलें; व तिनें एवढ्या

लहान वयांत मिळविलेल्या यशाबद्दल आनंद प्रदर्शित करून, सभेला चार हजार रुपयांचा नजराणा केला.

इसवी सन १८७५ सालीं एक मोठें प्रकरण उपस्थित झालें. सार्वजनिक काकांनीं त्या प्रसंगीं जो बाणेदारपणा, जी धडाडी, व जें औदार्य दाखविलें, तें पाहून कोणीही आश्चर्यानें तोंडांत बोटच घालील.

तें प्रकरण असें:—

## बडोदें प्रकरण.

पुण्यास सार्वजनिक सभा स्थापन झाली त्याच सालीं म्हणजे सन १८७० मध्यें बडोद्याचे राजे खंडेराव महाराज गायकवाड हे स्वर्गवासी झाले, व त्यांचे जागीं त्यांचे बंधु मल्हारराव महाराज हे राज्याधिकारी झाले. मल्हारराव महाराज हे जात्या मनाचें थोडे दुर्बलच होते. खंडेराव महाराज गादीवर असतांना ह्यांनीं आपणाला गादी मिळावी म्हणून खंडेराव महाराज ह्यांस विषप्रयोग करण्याचा प्रयत्न केला असें दिसून आल्यावरून खंडेराव महाराजांनीं त्यांना बरीच वर्षें ‘ पादरा ’ येथें कैदेंत ठेवलें होतें. खंडेराव महाराज व मल्हारराव महाराज ह्यांचें अगोदरपासूनच नीट नव्हतें; त्यांत त्यांनीं असा कट आरंभिल्याचा संशय आल्यावरून खंडेराव महाराजांनीं त्यांना प्रतिबंधांत टाकलेलें; व त्यांतच थोडी मानसिक विकलतेची भर पडलेली; अर्थातच खंडेराव महाराजांचे पश्चात् मल्हारराव महाराज जेव्हां तक्तनशीन झाले, तेव्हां त्यांनीं खंडेराव महाराजांच्या कृपेंतील मंडळीवर ह्याचा सूड उगविण्याचा निश्चय केला. गादीवर येतांच त्यांनीं खंडेराव महाराजांच्या कृपेंतील सर्व अधिकारी मंडळी बडतर्फ करून त्यांच्या जागीं आपल्या कृपेंतील मंडळींस नेमिलें. पूर्वापार चालत आलेली राज्यपद्धति बदलून, उधळेपणानें मनमानेल

तसा कारभार हांकण्यास सुरवात केली. त्यांच्या कृपेंतील मंडळी व्यवहार चतुर नसून, त्यानां राज्यकारभाराचें मुळींच ज्ञान नव्हतें. उलट सर्व मंडळी बदसल्लागार होती असें म्हटलें तरी वावगें होणार नाहीं. ह्याचा परिणाम राज्यावर संकटें कोसळून शेवटीं महाराजांस राज्यपदास मुकावें लागलें.

मल्हारराव महाराजांचे कारकिर्दीत सन १८७२ च्या जानेवारी महिन्यांत मुंबईचे गव्हर्नर सर सी. मोर, फिट्झीराल्ड ह्यांनीं बडोदे संस्थानला भेट दिली होती. त्यावेळीं राजानें गव्हर्नरास आपल्या उजव्या बाजूस बसवावयाचें, कीं, गव्हर्नरानें राजास आपल्या उजव्या बाजूस बसवावयाचें असा मानापमानाचा प्रश्न निघून इंग्रज सरकार व बडोदे सरकार ह्यांच्यामधील वितुष्टाचें बीज पेरलें गेलें. त्याच वर्षाच्या नव्हेंबर महिन्यांत हिंदुस्थानचें गव्हर्नर जनरल लॉर्ड नॉर्थब्रुक त्यांनीं मुंबईस मोठा दरबार भरविला होता. सदर दरबारास मल्हारराव महाराजांस आमंत्रण होतें; परंतु आपण दरबारास गेल्यास आपणांस तेथें गव्हर्नराचे डाव्या बाजूस बसावयास लागून आपला कदाचित् अपमान होईल, तर तो आज शंभर वर्षें आपल्या पूर्वजांना जो मान मिळत आला आहे तोच मान आपणाला मिळण्याविषयीं गव्हर्नर जनरल ह्यांजकडून कायम निकाल होऊन लिहून येईपर्यंत असले अपमानाचे प्रसंग शक्य तोंवर टाळावे असा महाराजांनीं निश्चय केला, व दरबारला न येण्याचें कारण काय शोधून काढावें ह्याचा ते विचार करूं लागले. कर्म–धर्म–संयोगानें त्याच वेळीं राणीसाहेब प्रसूत होऊन त्यांचें अपत्य गत झालें होतें. ह्या प्रसंगाचा फायदा घेऊन मल्हारराव महाराजांनीं दादाभाई नवरोजी ह्यांच्या सल्लयानें गव्हर्नर जनरल ह्यांजकडे एक खलिता पाठवून दिला व असें कळविलें कीं, राणीसाहेब अकालीं प्रसूत होऊन त्यांचें बालक मृत झालें, ह्या गोष्टीनें महाराजांचे मनास धक्का बसला असून

ते दरबारला हजर राहण्याच्या मनःस्थितींत नसल्यामुळें दरबारला आले नाहींत. दरबारचा अपमान करावा अशा प्रकारचा हेतू महाराजांच्या स्वप्नींही नाहीं. मानापमानाच्या प्रश्नासंबंधानेंही स्टेट सेक्रेटरीपर्यंत पत्रव्यवहार होऊन शेवटीं त्या प्रश्नाचा कांहींच निकाल न लागतां तो तसाच पडून राहिला. त्या नंतर मुंबईचे गव्हर्नर सर फिलिप वुड हाउस हे बडोद्यावरून अहमदाबादेस जात असतां, मल्हारराव महाराजांनीं त्यांस आपले राजधानीस उतरून आपलें आदरातिथ्य स्वीकारण्याविषयीं विनंती न करतां, आपण आदल्याच दिवशीं शिकारीच्या निमित्तानें बाहेर निघून गेले; व दिवाणांस गव्हर्नर साहेबांचें आगतस्वागत करण्यास पाठवून दिलें. परंतु गव्हर्नर साहेबांनीं मुद्दामच आपली गाडी त्या स्टेशनवर उभी केली नाहीं !

सन १८७३ सालीं कर्नल फेर ह्या नांवाच्या एका युरोपियन गृहस्थाची बडोद्याच्या रेसिडेंटाच्या जागीं नेमणूक झाली; व त्या दिवसापासूनच महाराजांच्या फेऱ्याला सुरवात झाली असें म्हटलें तरी चालेल.

कर्नल फेर साहेब बडोद्यास येण्यापूर्वीं एका संस्थानचे पोलिटिकल एजंट होते; व तेथें त्यांच्यावर कांहीं ठपका येऊन ते त्या कामाला नालायक ठरले होते. तरीपण सरकारनें त्यांची नेमणूक बडोद्याचे रेसिडेंटाचे जागीं केली.

कर्नल फेर रेसिडेंट झाल्यावर पहिले एक दोन महिने राजे साहेबांचें व त्यांचें सुरळीत चाललें होतें; परंतु पुढें लवकरच कर्नल फेर साहेब ह्यांनीं रेसिडेंटानें राजाबरोबर कसें वागावें ह्या संबंधाचें जे कांहीं नियम मुंबई सरकारनें पूर्वी घालून दिले आहेत ते सर्व पायाखालीं तुडवून राजावर शिरजोरी करण्यास सुरवात केली.

मुंबईचे गव्हरनर सर माऊंट एलफिस्टन ह्यांचें नांव कोणास ठाऊक नाहीं असें नाहीं. ह्या एलफिन्स्टन साहेबानीं व सर जॉन् मालकम साहेबानीं त्यांच्या वेळच्या बडोद्याच्या महाराजांस राज्याचा सर्वाधिकार देऊन

आपला हात काढून घेतला त्या वेळेस त्यांस व त्या वेळच्या तेथील रेसिडेंटास त्यांनीं जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांत गायकवाडचे ब्रिटिश सरकार बरोबर संबंध कशा तऱ्हेचे राहतील व ब्रिटिश सरकारच्या रेसिडेंटानें गायकवाडाशीं कोणत्या तऱ्हेनें वागावें ह्यासंबंधानें कांहीं नियम घालून दिले आहेत. त्यांत रोजच्या राज्यप्रकरणाच्या गोष्टींत ब्रिटिश रेसिडेंटानें अगर नेटिव्ह रेसिडेंटानें मुळींच ढवळाढवळ करूं नये असा स्पष्ट इशारा आहे. तसेंच प्रजेपैकीं कोणी राजाविरुद्ध रेसिडेंटकडे तक्रार अर्ज घेऊन आल्यास रेसिडेंटानें असल्या बाबतींत आपणांस हात घालण्याचा अधिकार नाहीं असें अर्जदारास स्पष्ट कळवावें असेंही सांगितलेलें आहे. असें असतांही कर्नल फेर रेसिडेंटाच्या हुद्दयावर आल्यावर त्यांनीं वरील नियमांना हरताळ फांसून जणूं काय गायकवाड सरकारच्या रयतेच्या फिर्यादी घेण्याचा आपणांस संपूर्ण अधिकार आहे, अशा प्रकारें ते वागूं लागले !

रेसिडेंट साहेब महाराजांविरुद्ध फिर्यादी ऐकतात असें लोकांस समजल्याबरोबर मल्हारराव महाराजांपासून ज्यांना ज्यांना उपद्रव झाला होता असे लोक आपल्या फिर्यादी घेऊन रेसिडेंट साहेबांकडे जाऊं लागले. एवढेंच नव्हे तर भाऊ पुणेंकरासारख्या कांहीं कज्जेदलाल मंडळींनीं, ज्यांना महाराजांकडून साक्षात् उपद्रव झाला नव्हता अशाही लोकांस रेसिडेंटाची भेट करवून देण्याचें आश्वासन देऊन, व रेसिडेंटाच्या कृपेची महती त्यांच्यापुढें गाऊन त्यांना महाराजाविरुद्ध फिर्यादी करण्यास चेतविण्यास कमी केलें नाहीं. भाऊ पुणेकराच्या ह्या असल्या वर्तनावरून त्याला बडोद्याचा ‘ बाळाजीपंत नातू ’ असेंही म्हणत असत.

मल्हारराव महाराजांचा राज्यकारभार वाईट तर होताच ! त्यांचे दिवाण व इतर सल्लागार लोक राज्यकाभार हांकण्यास नालायक होतें हेंहि खरें; पण कर्नल फेर यांच्या अयोग्य वर्तनानें त्यांत

अधिकच भर पडत चालला; आणि राज्यांत घोंटाळा उत्पन्न होऊन राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणणें जवळ जवळ अशक्यच झालें.

कर्नल फेर ह्यांच्या अयोग्य वर्तना संबंधानें एक दोन दाखले दिले असतां ते अस्थानीं होणार नाहींत. ते राजाच्या विरुद्ध प्रजेच्या फिर्यादी अधिकार नसतां ऐकत असत; इतकेंच नव्हे तर बडोदें सरकारच्या प्रजेला तसें करण्यास एक प्रकारें अप्रत्यक्ष प्रोत्साहन देत असत. महाराजांनां पाठवावयाच्या खलित्यांत कित्येक वेळां उद्दामपणाची व रानवटपणाची असभ्य भाषा ते वापरीत असत. गव्हर्नर साहेबांनीं वेळोवेळीं कसें वागावयाचें ह्या संबंधानें दिलेले हुकूम नेहमी अक्षरशः अंमलांत न आणतां जेथें तेथें आपलाच हेका चालवीत असत. एकदां तर रेसिडेन्सींतील युरोपियन डॉक्टर सीवर्ट यास महाराजांच्या स्वारानें 'तुमची गाडी बाजूला उभी करून महाराजांस मान द्या' असें सांगितल्यावरून, स्वारानें डॉक्टर साहेबांचा उपमर्द केला व त्याला आंतून महाराजांचें प्रोत्साहन होतें असा कांगावा करून स्वाराच्या ह्या उर्मटपणाबद्दल महाराजांस डॉक्टर सीवर्ड ह्यांची माफी मागावयास लावलें !

कर्नल फेरसाहेबांनीं मल्हारराव गायकवाड महाराजांच्या राज्यकारभारासंबंधीं मुंबई सरकारकडे जे वेळोवेळीं खलिते पाठविले, त्यांत तेथील राज्यकारभाराच्या अव्यवस्थेचें इतकें चऱ्हाट वळलें होतें कीं, मुंबई सरकारनें शेवटीं एक कमिशन नेमून महाराजांच्या राज्यकारभाराची चौकशी करण्याचें ठरविलें. 'सर रिचर्ड मीड'चें कमिशन ह्या नांवानें हें प्रसिद्ध आहे. ह्या कमिशनमध्यें ज्या ज्या मुद्द्यांची चौकशी करण्यांत आली त्यांतील बरेचसे स्वतः कर्नल फेरसाहेबांनीं बनावट तयार केले असल्यामुळें त्यांची महाराजांवर शाबिती होऊं शकली नाहीं, कांहीं थोडे शाबीत झाले. तथापि कमिशनच्या रिपो-

टीवरून सरकारनें कोणत्याही निर्वाणीच्या मार्गाचा अवलंब न करतां एक सौम्य ठराव करून महाराजांस आपल्या राज्यकारभारांत सुधारणा करण्यास दीड वर्षांचा अवधी दिला.

गव्हरनर जनरल ह्यांच्या ठरावाप्रमाणें दीड वर्षांत राज्यकारभारांत सुधारणा करतां यावी म्हणून महाराजांनीं दादाभाई नवरोजी ह्यांस दिवाण नेमून त्यांजकडे हें काम सोंपविलें. परंतु कर्नल फेरसाहेबांस दादाभाई हे दिवाण नको होते. त्यांनीं दादाभाईंना दिवाणगिरी न मिळण्याविषयीं पुष्कळ खटपटी केल्या; पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं.

दादाभाईंनीं मुंबईचे बाळ मंगेश वागळे, शंकर पांडुरंग पंडित, ह्यांच्यासारखे गृहस्थ आपणांस सुधारणा घडवून आणण्याच्या कामांत मदत करण्यास मिळावे म्हणून गव्हर्नर साहेबांकडे अर्ज केला; परंतु कर्नल फेर साहेबांनीं ते कागद मध्येंच दाबून टाकले. कर्नल फेर ह्यांच्या छळाला कंटाळून सरते शेवटीं १८७४सालीं महाराजांनीं खुद्द गव्हर्नर जनरलकडे एक खलिता पाठविला व त्यांत कर्नल फेर साहेबांचा एकंदर इतिहास निवेदन केला. दादाभाई देखील साहेब बहादुरांच्या त्रासाला कंटाळले व त्यांनीं आपल्या दिवाणागिरीचा राजीनामा दिला.

महाराजांनीं दादाभाई ह्यांस दिवाणगिरी दिली त्याच वेळीं कर्नल फेर साहेबांनीं महाराजांस बजाविलें होतें कीं ही गोष्ट तुम्हीं माझ्या विरुद्ध करितां आहां; पण ह्यानें तुम्हीं आपल्याच हातानें आपला नाश जवळ ओढून घेत आहां. साहेबांनीं महाराजांवर राजद्रोहाचा आरोप आणून पाहिला; पण कांहीं वळलें नाहीं. महाराजांचा खलिता गव्हरनर जनरल ह्यांस पावतांच, त्यांनीं मुंबईच्या गव्हरनरास लिहून सर्व कागदपत्र पहावयास मागितले, व त्यावरून मुंबईच्या गव्हरनरास कर्नल फेर ह्यांस त्यांच्या कसुरीबद्दल ठपका दिला. कर्नल

फेर ह्यानें चिडून गेला व त्यानें अखेर आपला डाव दुसऱ्याच एका दिशेनें साधला.

तारीख ९ माहे नवंबर सन १८७४ रोजीं कर्नल फेर ह्यांनीं मुंबई सरकारास तार करून कळविलें कीं, मला महाराजांनीं विष घालून मारण्याचा प्रयत्न केला; पण तो सफल झाला नाहीं. ह्या विष प्रयोगाच्या कटांत मल्हारराव महाराजांचें अंग होतें असा त्यांच्यावर आरोप ठेवून सरकारनें त्यांना राज्यावरून पदच्यूत केलें. त्यांची खाजगी जिनगी जप्त केली, व स्वतंत्र कमिशन नेमून त्यापुढें त्यांची चवकशी करण्याचें ठरविलें.

मल्हारराव महाराजांस पदच्युत करून कैदेंत ठेवलें; व त्यांची चवकशी व्हावयाचें ठरलें; परंतु त्यांची खाजगी जिनगी जप्त केली असल्यामुळें व राज्यावर त्यांची सत्ता नसल्यामुळें ते निष्कांचन बनले होते. ह्यामुळें त्यांनां आपला 'डिफेन्स' देण्याकरितां कायदे पंडिताची व्यवस्था करणें मुष्किल झालें होतें. महाराजांनीं इंग्रजसरकारकडे पैशाची मागणी केली पण सरकार पुरेसा पैसा देण्यास तयार होईना. शेवटीं निदान मला दोन लक्ष रुपये तरी द्या अशी महाराजांनां सरकारपुढें दीनवाणीनें याचना करावी लागली. एवढा वीस लक्ष प्रजेचा अधिपती, परंतु त्याच्यावर संकट आलें तेव्हां त्याला मदत करण्यास एक देखील प्रजाजन पुढें आला नाहीं ! सर्व गुजराथ प्रांत अगदीं स्वब्ध राहिला होता ! ! त्याला आपल्या राजा संबंधानें कांहीं वाटत नव्हतें असें नाहीं; परंतु राजाबद्दल त्यांना जितकी अनुकंपा वाटत होती त्या पेक्षां इंग्रज सरकारची कदर त्याला अधिक वाटत होती. त्यामुळें इंग्रज सरकारच्या मर्जीस न मानेल असें कृत्य करण्यास त्यांना धीर होईना !

परंतु महाराष्ट्रानें मात्र ह्या वेळीं आपलें नांव राखलें. महाराष्ट्रांतील लोकांनीं काया—वाचा—मनें करून आणि धनें करूनही मल्हाररावां-साठीं पराकाष्ठेचा प्रयत्न केला. त्यांत पुणें शहर ह्या गोष्टींत प्रमुख होतें. आणि त्यांतही सार्वजनिक काकांचे प्रयत्न तर वर लिहिल्या-प्रमाणें कोणालाही आश्चर्यचकित करून सोडणारे होते !

मल्हारराव महाराजांवरील संकटाची बातमी पुण्यास पोंचतांच सार्वजनिक काकांनीं त्या राजास एक लक्ष रुपये मदतीचें अश्वासन तारेनें पाठवून दिलें. व दुसरी तार व्हाइसरॉय साहेबांस करून त्यांत मल्हारराव महाराजांस जरूर ती कायदे पंडितांची मदत देण्यांत यावी, ह्या करितां महाराष्ट्र एक लक्ष रुपये देण्यास तयार आहे, असें कळविलें.

पुढें तारीख १८ जानेवारी सन १८७५ रोजीं सार्वजनिक सभेच्या विद्यमानें सदाशिव पेठेंतील रा. रा. नानासाहेब फडतरे ह्यांच्या वाड्यांत पुण्यांतील लोकांची जंगी जाहीर सभा भरली होती. सभेला सर्व दर्जाचे व सर्व जातींचे लोक हजर होते. सभेचें अध्यक्ष-स्थान मेहेरबान अल्लीमरदाखान ह्यांनीं मंडित केलें होतें.

सभेनें मल्हारराव महाराजांवरील आरोपांची चवकशी करण्याक-रितां गव्हर्नर जनरल ह्यांनीं एक श्रेष्ठ लोकांचें कमिशन नेमावें व त्या कमिशनवर सर्वच सभासद युरोपियन न नेमतां कांहीं मोठ्या योग्यतेचे देशी लोक नेमावें असा गव्हर्नर जनरल ह्यांस अर्ज केला. हा अर्ज माधवराव रानडे ह्यांनीं तयार केला होता, व तो सभेनें पसंत केल्यावरून पुढें व्हायसरॉय साहेबांकडे पाठविण्यांत आला. ‘ सार्वजनिक सभेच्या ’ इतिहासांत सदरहू अर्जाला महत्त्वाचें स्थान असल्यामुळें तो जशाच्या तसा पुढें परिशिष्टांत दिला आहे.

अर्ज जरी माधवरावांच्या लेखणींतून उतरला असला, व पुण्याच्या नागरिकांनीं जरी तो पसंत केला असला तरी ह्या चळवळीचे

सूत्रधार 'सार्वजनिक—काका'च होते. अर्जांत कमिशनमध्यें देशी लोक घेण्याविषयींची केलेली विनंती 'सार्वजनिक—काकांनीं'च सुचविलेली आहे.

ह्या अर्जाला सरकार दरबारीं मान मिळून त्याप्रमाणें देशी व विदेशी लोकांच्या कमिशनपुढें महाराजांची चवकशी झाली. कमिशनच्या सभासदांत बराच मतभेद झाला होता, तरी सरकारनें महाराजांवर आरोप शाबीत धरून त्यांना आमरण मद्रासेंत प्रतिबंधांत ठेविलें.

पुण्याच्या लोकांनीं महाराजांविषयीं जी विशेष कळकळ दाखविली त्यामुळें सरकारला पुणेंकरांचा भलताच संशय येऊन त्यानें त्यांच्यावर करडी नजर ठेविली होती. महाराजांस मद्रासेस नेतांना पुण्याच्या स्टेशनवर इतर ठिकाणांपेक्षां विशेष कडक बंदोबस्त करण्यांत आला होता असें म्हणतात !

## दख्खनचे दंगे.

मल्हारराव महाराजांचें प्रकरण आटोपून थोडे दिवस लोटतात न लोटतात तोंच 'सार्वजनिक—सभेला' लक्ष घालण्यासारखी दुसरी एक बाब उपस्थित झाली. सावकार व कुळें ह्यांच्यांत बेबनाव उत्पन्न होऊन त्याचें पर्यवसान दंग्यांत झालें. 'दख्खनचे दंगे' अथवा 'डेक्कन रायट्स' ह्या नांवानें ते प्रसिद्ध आहेत.

पुणें जिल्ह्यांतील सुपें ह्या गांवीं ह्या दंग्यांस सुरवात झाली. नित्याप्रमाणें तो बाजारचा दिवस होता, म्हणून तेथें अगोदरच आजूबाजूचें पुष्कळ गांवढळ लोक आले होते. तों एकदम वाण्यांच्या व मारवाड्यांच्या दुकानांत लुटालूट सुरू झाली. तेथील कापड चोपड जाळून फस्त होऊं लागलें. ही बातमी समजतांच जिल्हा मॅजिस्ट्रेट हे पुण्याहून पोलीस पायदळ व घोडेस्वार, लष्करी पलटण

घेऊन तेथें आले. त्यांच्या यत्नानें सहा सात हजार रुपयांचा माल ज्याचा त्यास परत मिळाला. शंभराहून अधिक शेतकरी पकडून ज्यांवर दंगा शेकला, त्यांस शिक्षा झाल्या सुप्याप्रमाणें इतर गांवींही दंगे झाले. त्या सर्वांचें सामान्य लक्षण हेंच कीं, ऋणमुक्त होण्याच्या हेतूनें शेतकऱ्यांनीं सावकारांजवळील कर्जरोखें, गहाण खतें, फरोक्तें, मक्तेपत्रें हीं त्यांच्या दप्तरांतून हुडकून काढून त्यांची राखरांगोळी केली; व ज्या सावकारांनीं कागदपत्र देण्यांत दिरंगाई केली, त्यांचा खरपूस समाचार घेतला. त्यांचें दस्तैवज रूपी अस्त्र ध्वस्त केलें. एवढेंच नव्हे तर त्यांचे नाक—कान कापून, त्यांच्या येथें लूट मार केलीं. पुणें जिल्हांतील दंग्यांचा प्रवेश नगर, नाशिक, खानदेश, आणि सोलापूर ह्या जिल्ह्यांतही झाला; तेव्हां अधिकाऱ्यांनीं मोठ्या प्रयत्नानें सर्व शांतता केली; सावकारांना अभयवचन दिलें व शेतकऱ्यांच्या स्थितीकडे लक्ष दिलें.

वरील हकीगतीवरून हे दंगे कां उद्भवले ह्याची सहज अटकळ बांधतां येईल. त्या वेळीं शेतकऱ्यांचें दुःख निवारण करणारा कायदा पास झाला नव्हता. शेतकरी लोक कर्ज बाजारी झालेले होते, व सावकार लोक त्यांना वाटेल तसे बुचाडीत होते, शेतकरी कर्जबाजारी होण्यास वास्तवीक कारण सरकारच होतें. सरकारनें जमिनीचा धारा वाढविला व तो पूर्वींच्या पद्धतीप्रमाणें माल उत्पन्नांतून देण्याची सवड न ठेवतां पैशाच्या रूपानें वसूल करण्याची पद्धत सुरू केली. परंतु असें असतांही सरकारनें ह्या दंग्यांचें खापर सर्वस्वीं सावकारांवर फोडलें. परंतु माधवराव रानडे ह्यांच्या पुढारीपणाखालीं सार्वजनिक काकांनीं ह्या दंग्यांची 'सार्वजनिक-सभेच्या' विद्यमानें चवकशी करून एक सविस्तर अर्ज सरकारकडे पाठविला. ह्या अर्जांत दंग्यांची मार्मिक मीमांसा करून, असल्या दंग्यांचें कारण पर्यायानें खुद्द सरकारच कसें आहे हें मोठ्या चतुरपणानें सरकारचे

निदर्शनास आणून दिलें. स्वत: काकांनीं शेतकऱ्यांची स्थिति सुधारावी म्हणून अतोनात मेहनत केली. शेतकऱ्यांस शिक्षण मिळावें, शेतकी शिक्षणाचे वर्ग जागोजाग काढून ते हायस्कुलांसही जोडावें, शेतकऱ्यांस कर्ज देण्यासाठीं पेढ्या काढाव्या, आणि रोखे कागद कसेही असले तरी शेतकऱ्यावर फिर्याद झाली असतां न्यायाधिशानें शेतकऱ्यांच्या वतीनें कसोशीनें सर्व व्यवहार पहावा आणि निकाल द्यावा; अशा प्रकारचे सवलतीचे कायदे करावे म्हणून त्यांनीं खटपट केली. काकांच्या ह्या खटपटीचा परिणाम 'दक्षिणेंतील शेतकऱ्यांचा कायदा' ह्या रूपानें झाला. ह्या कामीं त्यांना माधवराव रानडे, सर वुइलियम वेडरबर्न, डॉक्टर पोलन आणि दुसरे अनेक अधिकारी आणि बिनाधिकारी ह्यांची मदत होती. दंग्यांची चवकशी करण्याकरितां सरकारनेंही एक कमिशन नेमलें होतें. ह्या कमिशननेंही सार्वजनिक सभेमार्फत आलेल्या अर्जांतील विचारसरणीला आपली मान्यता दर्शविली; परंतु सार्वजनिक सभेनें सुचविलेला मार्ग—( सरकार देणें गल्लयाच्या रूपानें देण्याची सवड ) मात्र सरकारास पसंत पडला नाहीं.

## महाराष्ट्रांतील दुष्काळ.

सन १८७६।७७ सालीं महाराष्ट्रांत भयंकर दुष्काळ पडला. हा दुष्काळ इतका उग्र होता कीं त्याचीं वर्णनें वाचून आज देखील अंगावर शहारे येतात! मग ज्यांना प्रत्यक्ष दुष्काळाचे चटके सहन करण्याचा प्रसंग आला असेल त्यांची अवस्था काय वर्णावी बरें? त्यावेळीं सरकारचें फॅमिन—कोड अस्तित्वांत नव्हतें; त्यामुळें सरकारला देखील दुष्काळाला तोंड देणें कठीण गेलें. सर रिचर्ड टेंपल सारखे दुराग्रही अधिकारी गव्हर्नर, फॅमिन कोड अस्तित्वांत नसल्यामुळें दुष्काळाचे प्रसंगीं लोक—पोषणाची जबाबदारी सरकारवर किती आहे हें ठरलेलें नाहीं, लोकांची माहिती सरकारास नाहीं, व

सरकारची माहिती लोकांस नाहीं, इकडे पावसानें दगा दिला, लोकांजवळ खायला अन्न नाहींसें झालें, गांठचा पैसा संपून गेला, स्त्रिया आपलीं लहान लहान तान्हुलीं टाकून देऊन पोटासाठीं इकडे तिकडे सैरावैरा धावूं लागल्या, नवरा बायकोची पर्वा करीनासा झाला, बाप लेकाला विचारीनासा झाला, जो तो आपल्या विवंचनेंत; कोणाच्या शरीरांत त्राण उरला नाहीं; अन्नाविणें तडफडून मरण्यापेक्षां एकदम डोळे मिटले तर बरे, असें ज्याला त्याला वाटूं लागलें. पुष्कळ लोक देशत्याग करावयास तयार झाले. जी स्थिती मनुष्यांची झाली होती, तीच स्थिती जनावरांचीही झाली होती. त्यांना खायला गवत मिळेना. प्यायला पाणी मिळेना. बिचारी व्याकूळ होऊन तडफड तडफड करून प्राण सोडूं लागलीं.

ह्या हृदयविदारक प्रसंगीं सार्वजनिक काकांनीं अतीशय मोठी कामगिरी केली. त्यांनीं जितक्या प्रकारें लोकांस सहाय्य करतां येणें शक्य होतें तितक्या प्रकारें केलें. सार्वजनिक सभेनें आपले विश्वासू एजंट दुष्काळी भागांत जागोजाग पाठवून दिले. त्यांनीं दु:ष्काळी भागांत फिरून दुष्काळाची स्थिती प्रत्यक्ष नजरेखालीं घातली. आपल्या एजंटांकडून जशी जशी माहिती मिळत गेली त्याप्रमाणें सार्वजनिक सफेतर्फे माधवराव रानडे दुष्काळा संबंधानें लेख लिहून सरकारकडे पाठवूं लागले. ह्यांतील कांहीं लेख अर्जवजा असून त्यांत दुष्काळीं कामें, आणि त्यावरील मजुरांची स्थिती ह्या संबंधानें सरकारची कानउघाडणी करण्यांत आलेली आहे. सरकारनें सभेच्या ह्या कामगिरीबद्दल सभेचे आभार मानिले आहेत.

दुष्काळांतील लोकांचें दु:ख हलकें करण्यासाठीं सरकारनें दुष्काळीं कामें काढून लोकांस मदत करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या योगानें आपत्ति दूर न होतां संकटें मात्र वाढत गेलीं. दुष्काळीं कामावर असलेल्या लोकांना अधिकारी लोकांपासून उपद्रव होऊं

लागला, मारहाण सोसावी लागली. पाठीवरील व पोटावरील असे दोन्ही मार त्या निर्वाण लोकांना सहन होईनासे झाले. शेवटीं मरण पुरवलें पण हा त्रास नको असें त्यांस होऊन गेलें, व त्यांनीं 'संप' पुकारला. दुष्काळाचा वणवा आधींच पेटलेला, त्यांत हें संपाचें वारें शिरलेलें पाहून सरकारलाही भीती वाटली. शेवटीं ह्या प्रकरणाची चवकशी करण्याकरितां 'केर्ड' साहेबांच्या अध्यक्षतेखालीं एक कमेटी नेमण्यांत आली. सार्वजनिक काकांनीं ह्या कमिटीपुढें सार्वजनिक सभेतर्फे साक्ष दिली, व त्यांत त्यांनीं रयतेच्या दुःखाची कहाणी निर्भीडपणें कमेटीपुढें मांडिली. 'केर्ड' साहेबानीं ' नाइनटींथ सेंचरी ' मधील ' नोटस् बाय धी वे इन् इंडिया ' ह्या लेखांत सार्वजनिक सभेसंबंधानें लिहितांना, काकांचा मुद्दाम नामनिर्देश करून त्यांच्या हुशारीबद्दल व कामगिरीबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. असो. वरील कमेटी पुढें शेतकऱ्यांचें दुःख निवारण करण्या करितां तीन उपाय सुचविण्यांत आले. एक उपाय असा कीं, सरकारनें आपल्या 'पब्लिक वर्क्स'खात्या मार्फत दुष्काळ पीडितांकरितां कामें काढावीं;मात्र धान्याचा भाव दर रुपयास १४ शेर व ३२ शेर असतां जो दोन आणे मजुरीचा दर होता, तो प्रस्तुत दुष्काळांत तीन आणे करण्यांत येऊन त्यापैकीं अर्धा रोख व अर्धा ऐन जिनसा देण्यांत यावा. दुसरा उपाय असा कीं, शिजविलेलें व कोरें अन्न ह्यांचा धर्मादाय व्हावा. ह्यांत सरकारनें व लोकांनीं एक विचारानें झटलें पाहिजे. मात्र प्रत्येक तालुक्यांत असे हजारों लोक असतात कीं ज्यांना दुष्काळाच्या कामावर जाण्याचा कमीपणा वाटतो. त्यांना राजाच्या किंवा प्रजेच्या अन्नसत्रानें पोसलें पाहिजे. मात्र अशा संस्था सरकारी स्थानिक अधिकाऱ्यांच्या प्रेरणेनें निघून लोकाचार व आरोग्य ह्यांकडे लक्ष ठेवण्याकरितां त्यांतील व्यवस्था लोकांकडे असावी. जे थोडे लोक नेमस्त दरानें धान्य घेण्यासारखे असतील त्यांच्या करितां खाजगी वर्गणी,

म्युनिसिपालिटीची मदत, किंवा सरकारचा हातभार ह्यांच्या अवश्य त्या हमीवर धान्याचीं स्वस्त दुकानें काढावींत. तिसरा आणि शेवटला उपाय, म्हणजे देशावरील दुष्काळ पीडित भागांतील गुराढोरांना कोंकणपट्टींत आणून, तेथें त्यांच्या दाणावैरणीची सोय करणें. प्रत्येक कलेक्टरनें आपल्या जिल्ह्यांत दहापासून पंचवीसपर्यंत अशीं स्थळें निर्माण करावीं कीं जेथें चार पांचशें गुराढोरांच्या खाण्यापिण्याची तजवीज होईल. तसेंच वर्षारंभीं लिलावानें विकून टाकलेली कुरणें सरकारनें त्या त्या खरेदीदारापासून योग्य मोबदला देऊन परत घ्यावीं, व तीं कुरणें रयतेस खुलीं ठेवावीं. हे उपाय कितपत अंमलांत आले व त्यापासून फायदे किंवा तोटे काय झाले हें समजण्याला सुलभ मार्ग नाहीं. आणि त्यांत विशेष खोल शिरून जागा अडविणें ह्या लहानशा पुस्तकांत बरें नाहीं. स्वतः काकांनीं खटपट करून जागोजाग फंड गोळा केले, दुष्काळ कमिटया स्थापन करून स्वस्त धान्याचीं दुकानें जागोजाग उघडलीं, एवढेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील दुष्काळपीडितांचा आर्तरव तमसा नदीवरील आपल्या राजवाड्यांत रहाणाऱ्या हिंद-सम्राज्ञीच्या कानावर जावा म्हणून काकांनीं विलायतेंतील वर्तमानपत्रांतून दुष्काळाची कहाणी प्रसिद्ध करवून, तेथेंहि एक फंड जमविण्याचा प्रयत्न केला ! !

## दिल्ली दरबार.

महाराष्ट्रामध्यें दुष्काळ अशा रीतीनें आपला सैतानी धिंगाणा घालीत असतांना दिल्लीस मोठा दरबार भरविण्याची तयारी जारीनें चाललेली होती. लॉर्ड लिटन् हे त्यावेळीं हिंदुस्थानचे ' व्हायसराय' होते. इंग्लंड देशांत त्या वेळीं डिस्रायली साहेबांचे प्रधानमंडळ अधिकारारूढ होतें. सन १८७६ च्या सेशनाच्या प्रारंभीं त्यांनीं पार्लमेंटांत असें जाहीर केलें कीं, राणी हिंदुस्थानची 'बादशाहीण' हा किताब धारण करणार आहे. इंग्लंडच्या राजांच्या जुन्या पदवीस हें

फाजील जोड नांव कशाला पाहिजे असें इंग्लंडांत जो तो म्हणूं लागला. पार्लमेंट सभेंतही ह्या प्रश्नावर कडाक्याचा वादविवाद होऊन लो साहेब, व जोसेफ कॉवेनसाहेब ह्यांनीं झणझणीत प्रतिकूल भाषणें केलीं. डिस्रायली साहेबांनीं प्रत्युत्तरा दाखल भाषण करतांना असें प्रतिपादन केलें कीं, सध्यां मध्य-एशियांत रशिया पुढें पुढें सरसावत चालला आहे, टर्कीच्या अमलाखालीं ख्रिस्ती लोकांच्या वस्तीचे जे प्रांत आहेत तेथील लोकांत चळवळ सुरू झाली आहे. सर्विया प्रांत स्वतंत्र झाला आहे; शिवाय वॉलेशिया व मॉल्डेव्हिया हे प्रांत दोन निर-निराळ्या राजांच्या अधिकाराखालीं असावे असें जरी ठरलें होतें, तरी ते हळू हळू एक होऊन त्यांचें रुमानिया हे संयुक्त संस्थान बनलें आहे. अशा वेळीं आपला पूर्वेकडील देशांत दरारा कायम राखण्याकरितां, आपण हिंदुस्थानच्या राज्याची मालकीण आहोंत, ही गोष्ट शक्य तितक्या जोरानें प्रतिपादन करणें अवश्य आहे. वास्तविक पाहूं जातां डिस्रायलीसाहेबांच्या डोक्यांत ही कल्पना येण्यास एक निराळेंच कारण झालें होतें. एका शाळेंतील एका मुलीनें डिस्रायली साहेबांना पत्र पाठवून ही गोष्ट सुचविली होती ! कांहीं असो. डिस्रायली साहेबांनीं आपला हेतु तडीस नेला. फक्त इंग्लंड देशांत ही पदवी राणीस लावावयाची नाहीं, एवढी अट त्यांनीं कबूल केली !

राणी सरकारनीं हा जो बडा किताब धारण केला; तो जाहीर करण्याकरितां तारीख पहिली जानेवारी सन १८७७ रोजीं दिल्ली शहरीं मोठा दरबार भरविण्यांत आला. हिंदुस्थानांतील सर्व राजे-रजवाडे दरबारला हजर होतें. कित्येक सरकार-मान्य अशा संस्थांना-ही आमंत्रण देण्यांत आलें होतें. त्यांत पुण्याची 'सार्वजनिक-सभा' ही होती. ' सार्वजनिक-सभेंमध्यें दक्षिणेंतील राजे रजवाडे लोकां-चाही समावेश झालेला असल्यामुळें एखादा संस्थानिक गादीवर बसला, एखाद्याला मुखत्यारी मिळाली, कीं तेथें त्याला मानपत्र

देण्याकरितां आपलें ‘ शिष्ट–मंडळ ’ पाठवावयाचें, असा सार्वजनिक सभेचा एक शिरस्ताच पडून गेला होता. ह्या शिरस्त्याला अनुसरूनच सभेकडून मानपत्र घेऊन एक शिष्ट-मंडळ दिल्लीस दरबारला गेलें होतें ! ह्या शिष्ट–मंडळांत सार्वजनिक काका प्रमुख होते. अशा मोठ्या दरबारला जातांनाही काकांनीं आपलें कंदी पागोटें व खादीचा अंगरखा टाकला नाहीं. ह्या गोष्टीचा मागें एकदां उल्लेख केलाच आहे; तथापि ही गोष्ट हल्लींच्या एकंदर–विशेषतः पुढारी म्हणून मिरविणाऱ्या–मंडळीनें विशेष लक्षांत ठेवण्यासारखी असल्यामुळें द्विरुक्तीचा दोष सहन करूनही ती वाचकांच्या पुन्हां एकदां नजरेस आणावी असें वाटतें.

सार्वजनिक सभेतर्फे नेलेल्या ह्या मानपत्रामध्यें गव्हर्नर जनरल साहेबांस राज्य–शासन पद्धती संबंधानें कित्येक मार्मिक व पटतील अशा सूचना केल्या होत्या. काकांच्या ह्या सूचना ऐकून सर्व सदस्यांनीं माना डोलविल्या ! आपादशीर्ष शुभ्र वस्त्र परिधान केलेली काकांची मूर्ती पाहून व अमृतोपम मधुर असा त्यांचा उपदेश श्रवण करून तेथें जमलेल्या सर्व लोकांस काकांचें एक प्रकारचें कौतुक वाटलें व आनंद झाला.

## संस्थानिकांस सदुपदेश.

दिल्ली दरबारच्या समारंभाला शिंदे–होळकर वगैरे सर्व संस्थानिक, व दुसरेही कित्येक थोर कीर्तीचे लोक आलेले होते. काकांनीं सर्व राजेरजवाड्यांच्या भेटी घेऊन त्यांचा सार्वजनिक सभेस आश्रय मिळविला. त्याचप्रमाणें त्यांच्या ठिकाणीं राष्ट्राभ्युदयकारक सद्गुणांचा विकास व्हावा, व त्यांना स्वतःची जाणीव उत्पन्न होऊन आपलें कर्तव्य कळावें, व तें बजावण्यास त्यांनीं उद्युक्त व्हावें म्हणून मोठ्या नम्रतेनें त्यांना पुढीलप्रमाणें उपदेश केला.

'राजे, महाराजे व कीर्तिमान जनहो! मी आपणाला हात जोडून मोठ्या गौरवानें विज्ञप्ति करतों कीं, आपण ह्या सर्व हिंदुस्थानांतील प्रजेचे मायबाप आहां अशी येथील प्रजेची समजूत आहे; आणि ती समजूत प्रामाणिक आहे. ही त्यांची समजूत चूक आहे असें कोण म्हणेल? हिंदी प्रजा आजकाल अतीशय दीन झालेली आहे. तिला हात देऊन, तिच्या सुखाचा मार्ग शोधून काढणें हें आपणांपैकीं प्रत्येकाचें श्रेष्ठ कर्तव्य आहे.'

'आतां आम्हीं प्रजेला सुखी कसें करावें असा आपण मला प्रश्न टाकाल; तर त्याला माझें असें उत्तर आहे कीं, प्रथम आपण आपापसांतील कलह विसरून गेलें पाहिजे. न्यायाची कास कधींही सोडतां कामा नये. शत्रूला जिंकण्याकरितां नेहमीं तत्पर राहिलें पाहिजे. ईश्वर साक्ष ठेवून आपल्या देशाचें विमल यश वाढविण्याची नेहमीं खटपट केली पाहिजे. मतभेद टाकून दिलें पाहिजेत. ह्या मतभेदांच्या पायीं मनांत कुबुद्धि उत्पन्न होते, द्वेष वाढूं लागतो. द्वेष वाढूं लागला म्हणजे ऐश्वर्य क्षय पावूं लागतें, सुभाग्य आपला पाय काढूं लागतें, पुण्यक्षय होत जातो; तेव्हां राजे महाराजे जनहो! माझी आपणांला अशी नम्र विनंती आहे कीं, कोणाच्या मनांत कांहीं द्वेषभाव असला तर तो त्यानें ह्यापुढें तरी सोडून द्यावा.'

'आपल्या पूर्वीं जे थोर थोर राजे लोक होऊन गेले. त्यांचा कित्ता आपण सदां आपल्या डोळ्यांपुढें ठेवून त्याप्रमाणें वागावें. आपण आपल्या प्रजेची जर योग्य जोपासना केलीत तर त्यायोगें आपल्या कीर्तींत भर पडून, आपल्या सौख्याचीही वृद्धि होईल. आपल्या प्रजेच्या काळजीबरोबर आपल्या देशाचीही काळजी आपण वाहिली पाहिजे. त्याकरितां प्रथम लोभ सोडला पाहिजे. लोभ धरल्यानें पूर्वींचे राजे रजवाड्यांना शेवटीं कोणती दशा प्राप्त झाली

हें नीट मनांत वागवून, मनांत किंचित्‌ही लोभ न धरतां, ऐक्य वाढवून, राष्ट्र–हित साधणें हेंच आपलें मुख्य कर्तव्य आहे.'

अशा अर्थाचें मोठ्या कळकळीचें भाषण सार्वजनिक–काकांनीं दिल्लीस राजेरजवाडे लोकांपुढें केलें. त्यांचें भाषण ऐकून शिंदे, होळकर आदि महाराजांनीं सार्वजनिक काकांचे उपकार मानून त्यांना शाबासकी दिली.

दिल्लीहून परत फिरल्यावर 'सार्वजनिक–काका' सर्व देशभर फिरले; व जागोजाग लोकांना त्यांच्या स्थितीची जाणीव करून देऊन, योग्य उपदेशही केला. इंदुरास एखादी गिरणी काढावी असें त्यांनीं तेथील महाराजांस सुचविलें. त्यावेळचे महाराज तुकोजीराव होळकर ह्यांना सार्वजनिक काकांची अगोदरपासून माहिती होतीच. त्यामुळें त्यांनीं सार्वजनिक–काकांच्या सुचनेकडे दुर्लक्ष न करतां, ह्या कामीं हौस दाखवून 'सार्वजनिक–काकांनीं' सुचविल्यावरून ह्या संबंधांत पुण्यास माधवराव रानडे ह्यांच्याबरोबर कांहीं पत्रव्यवहार सुरू केला होता. ह्या पत्रव्यवहारांतील एक दोन पत्रें माधवरावांच्या दप्तरांत सांपडल्याचें त्यांच्या चरित्रकारांनीं लिहिलें आहे.

## लवाद कोर्टाची स्थापना.

हिंदुस्थानांत न्याय किती महाग आहे हें सर्वत्रांस महशूर आहेच. न्याय स्वस्त व जलद मिळावा ह्यासंबंधानें आज कित्येक वर्षें ओरड चालू आहे. सांप्रत चालू असलेल्या 'राष्ट्रीय चळवळींत' देखील सरकारी न्याय महाग पडतो व न्याय मिळण्यास विलंब लागतो, ह्याकरितां गांवोंगांवीं 'ग्रामपंचायती' सुरू कराव्या अशा तऱ्हेचे प्रयत्न चालू आहेत. सरकारला सुद्धां अलीकडे 'पंचायतीं'ची उपयुक्तता कळून येऊं लागली आहे. त्यामुळें कांहीं कौन्सिलांतून 'पंचायत–बिलें' पसार झालीं आहेत. तथापि पंचायतीचें महत्व

व त्याची उपयुक्तता महाराष्ट्रास फार पूर्वींच कळून चुकली होती. इंग्रजी सुरू होण्याच्या अगोदर आपल्याकडे सर्वत्र 'पंचायत' पद्धतीच सुरू होती. प्रत्येक गावांत चार प्रतिष्ठित लोक असत, त्यांना 'महाजन' असें म्हणत असत. गांवांतील 'कज्जे-कफावती' 'भांडण तंटे' वगैरे तोडण्याचें, व लोकांना उपयुक्त व शहाणपणाची सल्ला मसलत देण्याचें काम नेहमीं त्यांच्याकडे असे. इंग्रजी सुरू झाल्यावर ही पद्धत बंद पडली, एवढेंच नव्हे तर ती लोकांना अगदीं परकी झाली. जिकडे तिकडे इंग्रजी 'पिनल-कोडा'चा प्रसार झाला. इंग्रजी न्याय पद्धतींत न्यायान्याय अगदीं धारवाडी कांट्यानें तोलला जातो अशी त्यावेळीं सर्वत्र समजूत असल्यामुळें, जरी ती न्याय-पद्धती खर्चाची व दीर्घ-सूत्री होती तरी त्याविरुद्ध बोलण्याचा कोणाला धीर होत नव्हता; परंतु सार्वजनिक-काका हे एक उत्कृष्ट वकील असल्यामुळें, इंग्रजी न्यायपद्धतीनें गरीब रयतेला किती त्रास सोसावा लागतो, व ती खर्चाच्या किती गोत्यांत येते, हें त्यांच्या लक्षांत येण्यास विलंब लागला नाहीं. सन १८७६-७७सालीं महाराष्ट्रांत जो मोठा दुष्काळ पडला त्यावेळेपासून 'पंचायती' स्थापन करण्याची कल्पना ह्यांच्या डोक्यांत सारखी घोळत होती. फॅमिन कमिशनपुढें सार्वजनिक काकांनीं जी साक्ष दिली त्यांतही त्यांनीं ह्या ग्रामपंचायतींचा जोराचा पुरस्कार केला आहे. कमिशनचे अध्यक्ष केर्ड साहेब ह्या संबंधानें लिहितात. 'He strongly advocated the Native Panchayats Courts and showed that if they are substituted for Small Causes Courts five-sixth of the business of the Civil Courts would disappear. He argued that suits respecting land should go to the Civil Courts & all others to Panchayats. For such cases no longer scientific process of investigation is requested One sixth of the present litigation only would

remain for the superior courts in which alone pleaders will appear. The parties stating their own cases as a minimum of cost, in the Panchayats. The number of cases for the whole presidency appears great but when divided among the 22500 villages it would give but six or seven cases for each The Panchayet should not be however in every village, where personal interest might be evoked, but at central stations. Both Savakars and the Râyat would prefer the Panchayat which should have the power of obtaining the attendance of witness.'
अशा अर्थाची काकांची साक्ष झाली होती. काकांनीं पुरातन पद्धतीच्या लवादांचें पुनरुज्जीवन करण्याचें योजिलें; व त्याला अनुसरून सन १८७८च्या जानेवारी च्या महिन्यांत सरकारकडे एक अर्ज पाठवून त्याद्वारें इंग्रजी न्यायपद्धतींतील वैगुण्य व लवाद कोर्टांतील उपयुक्तता मोठ्या चातुर्यानें, व कुशलतेनें सरकारचे गळीं उतरविलीं. स्वतः पुणें, नगर वगैरे शहरांतून अशीं लवाद कोर्टें स्थापन करून पुष्कळ वर्षे चालविलीं व लोकांचे हजारों रुपये वाचविले. सरकारलाही त्या वेळीं काकांची ही सूचना मोठी शहाणपणाची वाटली; व त्यानें त्या सूचनेला उचलून धरलें; इतकेंच नव्हे तर अशा तऱ्हेची शहाणपणाची सूचना केल्याबद्दल काकांचे आभार मानले. शेतकी कायद्यांत Village Conciliater नेमण्याची जी योजना करण्यांत आलेली आहे ती सार्वजनिक काकांनीं आपल्या अनुभवावरून सुचविलेल्या सूचनेला धरून आहे असें म्हणतात.

## वर्तमानपत्रकारांचें कान्फरन्स.

त्याच वर्षाच्या म्हणजे सन १८७८ सालच्या जानेवारी महिन्यांत 'सार्वजनिक-काकां'नीं दुसरी एक अतीशय महत्त्वाची काम-

गिरी बजाविली. ही कामगिरी म्हणजे कलकत्ता येथें त्यांनीं भरविलेलें ‘ वर्तमानपत्रकारांचें कान्फरन्स ’ होय !

लिटनशाही कशी काय गाजली हें ऐकून तरी सर्वांस ठाऊक असेल ! लॉर्ड लिट्न साहेबांना ह्यांच्या भोंवतीं लांगूल—चालन करणाऱ्या कांहीं लोकांनीं असें चिथवून दिलें कीं, देशी वर्तमानपत्रें वाटेल तसें लिहितात, व त्यांच्या लिहिण्यानें देशांत असंतोष वाढतो, व राजद्रोहाचा पसार होतो. ह्या करितां त्याला आळा घालण्यासाठीं कांहीं तरी कायदा काढणें जरूर आहे. लॉर्ड लिटन साहेबांना हा विचार रुचला व त्यांनीं त्या प्रमाणें एक कायदा करण्याची योजना केली. ह्या योजनेची बातमी वर्तमानपत्रकर्त्यांस लागली तेव्हां त्यांना ही एक आपणांवर आपत्तीच कोसळत आहे असें वाटून, त्यांनीं ह्या योजनेचा प्रतिकार करण्याची चळवळ सुरू केली. ह्या प्रतिकार करण्याच्या भावनेलाच योग्य वळण लावलें तर त्यापासून वृत्तपत्रकारांची एक संघशक्ती निर्माण करतां येईल अशी कल्पना माधवराव रानडे व सार्वजनिक काका यांच्या डोक्यांत आली. त्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याकरितां वृत्तपत्रकारांचें एक संमेलन भरविणें अवश्य आहे असें ठरलें. परंतु हें संमेलन भरावयाचें कोठें ? ज्या ठिकाणीं मुस्कटदाबीचा कायदा जन्मास येणार आहे त्याच ठिकाणीं हें संमेलन भरविल्यास कदाचित् सरकारच्या मनावर कांहीं परिणाम झाला तर होईल तेव्हां कलकत्त्यासच हें संमेलन भरवावें असें काकांनीं सुचविलें. माधवराव रानडे ह्यांना हा युक्तिवाद पटून त्यांनीं संमेलनाची सर्व जबाबदारी काकांच्याच गळ्यांत घातली. काकांनीं कलकत्त्यास हें संमेलन पार पाडलें हें सांगावयास नकोच !

काकांच्या देखरेखीखालीं कलकत्त्यास जरी हें वृत्तपत्रकारांचे संमेलन पार पडलें, तरी सरकारावर त्याचा कोणत्याही तऱ्हेचा परिणाम झाला नाहीं. इंडियन पिनल कोडमधील आजकाल सर्वांस

ठाऊक झालेलें १२४ (अ) हें कलम सन १८७८च्या सुमारास एतद्देशीय वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करण्यास पुरेसें नाहीं असें वाटून, त्या वेळच्या लॉर्ड लिटन ह्यांच्या कौन्सिलचे सभासद ऑनरेबल सर आलेक्झांडर आरबथनाट ह्यांनीं तारीख १४ माहे मार्च सन १८७८ रोजीं एक नवीन मुस्कट-दाबीचें बिल कौन्सिलपुढें आणलें व पास करवून घेतलें. 'गॅगिंग' ॲक्ट ह्या नांवानें हें बिल प्रसिद्ध आहे. सरकारनें बिल पास केल्यानंतर त्याचा पुन्हां विचार होणें अवश्य आहे असें वाटून काकांनीं मुंबईस भरणाऱ्या 'मुंबई नेटिव्ह वर्तमानपत्रकारांचें कान्फरन्समध्यें' त्याचा विचार करण्याचें ठरविलें.

कलकत्त्याचें कान्फरन्स आटपून काका पुण्यास परत येत असतांना इंदुरास उतरले. तेथून त्यांनीं कलकत्त्याच्या कान्फरन्ससंबंधानें पत्र पुणें येथलि ज्ञानप्रकाश वर्तमानपत्रांस पाठविलें. इंदूराहून निघावयाचें तों इंदूरचे महाराज श्रीमंत तुकोजीराव होळकर ह्यांनीं त्यांस आणखी राहवून घेतलें. हद्दीचें निकालासंबंधानें जे नियम इंग्रज सरकारांतून झाले होते ते इंग्रज सरकारचे मुलखांत साधारण देण्याघेण्याच्या दिवाणी मुकदम्यांत पक्षकाराचे जितक्या सोईचे आहेत तितके देखील हे नसल्यामुळें सोयीच्या नियमांचा मसुदा तयार करून देण्यास महाराजांनीं अतिशय आग्रह केला त्यामुळें हें काकांचें आणखी राहणें भाग पडलें.

काका इंदूराहून निघाले ते मुंबईस आले. वाटेंत ते नाशिकास उतरले. तेथील पुढारी मंडळींनीं काकांचें स्वागत करून त्यांच्या कलकत्त्याच्या कामगिरीचा गौरव करण्याकरितां एक सभा केली. ह्या सभेंत काकांनीं कान्फरन्सचा उपयोग काय व तें चांगल्या रीतीनें चालण्याकरितां काय मदत केली पाहिजे; ह्या संबंधानें भाषण केलें. तेथून काका ठाण्यास उतरले. ठाण्यास देखील मोठ मोठ्या पुढा-

त्यांच्या गांठीं घेतल्या व कान्फरन्स, लवाद कोर्टें यांच्या संबंधानें त्यांनीं त्यांच्यांशीं विचार° विनिमय केला. लवाद कोर्टासंबंधानें त्यांनीं त्या वेळचे ठाण्याचे जज्ज मि. कागलन ह्यांचीहीं गांठ घेतली. ठाण्याहून 'काका' पुढें मुंबईस गेले. मुंबईस त्यांनीं तेथील नेटिव्ह वर्तमान-पत्रकर्ते यांच्या बहुतेकांच्या गांठीं घेतल्या; आणि मुंबई इलाख्यांतील वर्तमानपत्रकर्ते ह्यांची एक कमेटी नेमून तिनें कलकत्त्याच्या कान्फरन्स कमेटीशीं पत्रव्यवहार ठेवणें किती आवश्यक आहे त्याची त्यांना जाणीव करून दिली. त्याचा योग्य परिणाम होऊन मुंबईंतील हिंदू, पारशी, मुसलमान, तिन्ही जातींच्या वर्तमानपत्रकर्त्यांनीं एक मतानें मुंबई इलाख्यांतील वर्तमानपत्रकारांचें एक कान्फरन्स भरविण्याचें ठरविलें. कान्फरन्सकरितां जागा मुंबईस धोबी तलावाजवळ कावसजी फ्रामजी इन्स्टिटयूट मागून घेण्यांत आली; व कान्फरन्स मार्च २० चे पुढें व एक एप्रीलचे आंत केव्हांतरी भरविण्यांचें वरील सभेंत ठरवून टाकण्यांत आलें. नक्की तारीख ठरविण्याकरितां पुण्याच्या व इतर ठिकाणच्या वर्तमानपत्रकर्त्यांचा विचार घ्यावयाचा होता. मुंबईस कान्फरन्स भरण्याच्या अगोदर दोन तीन दिवस मी मुंबईस परत येईन असें सांगून काका पुण्यास गेले. पुण्यास परत जातांना काका ठाण्यास उतरले होते, परंतु त्यावेळीं ठाणेंकरांकडून त्यांची जी संभावना झाली त्यासंबंधानें एका बातमीदारानें 'निराशा' ह्या मथळ्याखालीं एक स्फुट प्रसिद्ध केलें आहे. त्यांत तो म्हणतो 'प्रसिद्ध पुणेंकर रा. रा. गणपतराव जोशी पुण्याकडे जातांनां थोडे दिवसांपूर्वीं येथें आले होते. त्यांचे मनांत वर्तमानपत्र कान्फरन्स संबंधानें आपली कलकत्त्याची कामगिरी ठाणें–करांचें कानांवर घालण्याचा त्यांचा विचार होता. परंतु येथील लोकांस 'नाटकी लाघव' (देशोन्नतीच्या खटपटीबद्दल औदासिन्य छपविण्याचा एक प्रयत्न.

कारण खरा लाघव ठाणेंकरांनीं कधींच पाघळला नाहीं असें बातमीदाराचें म्हणणें आहे ) आवडत नसल्याकारणानें हिरमुसलें तोंड करून त्यांस येथून 'गंच्छ' करणें भाग पडलें. गृहस्थ आपलें विचार सांगण्याकरितां फारच कळवळून वळवळला; परंतु ठाणेंकरांस त्याची नाहींच दया आली ! !

काका पुण्यास गेल्यावर सार्वजनिक सभेच्या मॅनेजिंग कमेटीची सभा तारीख १० मार्च सन १८७८ रोजीं भरली. त्या सभेंत मुंबईची नेटिव्ह प्रेस कान्फरन्स तारीख २८ मार्च रोजीं भरविण्यांत यावी, त्याकरितां सर्व वर्तमानपत्रांस निमंत्रणें पाठविण्यांत यावीं व कान्फरन्सकरितां सार्वजनिक सभेतर्फे रा. सदाशिव बल्लाळ गोवंडे व रा. रा. गणेश वासुदेव जोशी रा. रा. विनायक रामचंद्र पटवर्धन बी. ए. ह्यांना पाठविण्यांत यावें असें ठरलें. ह्याच सभेमध्यें रा. रा. गणेश वासुदेव जोशी आणि रा. ब. सदाशिव बल्लाळ गोवंडे ह्यांनीं अतीशय मेहनत घेऊन व स्वतःचा खर्च करून कलकत्त्यास जाऊन कान्फरन्स भरविण्याचें श्रम घेतलें, ह्याकरितां त्यांस बहुमानपत्र देण्याकरितां जनरल कमिटीस सूचना करावी, असाही ठराव पास करण्यांत आला.

मुंबईच्या नेटिव्ह वर्तमानपत्रांची कान्फरन्स संबंधानें काकांनीं तारीख २२ माहे मार्च सन १८७८ रोजीं स्वतःच्या सहीनें एक विनंतीपत्र काढलें. ते जसेंच्या तसें खालीं दिलें आहे.

"रा. रा. ज्ञानप्रकाश व मुंबई इलाख्यांतील सर्व वर्तमानपत्रकर्ते महाराज !

वि. वि. मुंबई येथें मुंबई इलाख्यांतील वर्तमानपत्रकर्ते ह्यांची कान्फरन्स आहे. ह्या कान्फरन्सचा विचार ठरला त्या वेळेस नेटिव्ह वर्तमानपत्रकर्त्यांच्या मोकाळिकेविरुद्ध कायदा तूर्तच होण्याचा संभव दिसत नव्हता; सबब ते वेळेस बोलावण्याचीं पत्रें पाठविलीं त्याज-

(५१)-२४८४

वरून कितीएक वर्तमानपत्रांनीं कलकत्त्याप्रमाणें आम्हांस आपले तर्फे मुंबईचे कान्फरन्समध्यें हजर होण्याविषयीं अधिकार दिला आहे. परंतु हल्लीं वर्तमानपत्रकर्ते एकत्र जमून जो कायदा झाला आहे त्याची वाटाघाट कान्फरन्समध्यें प्रथम झाली पाहिजे, व हाच विषय कान्फरन्समध्यें प्रथम निघणार आहे. करितां सर्वांनीं स्वतः अगर आपले तर्फे निरनिराळे मनुष्य त्या त्या ठिकाणचे नेमून पाठवावे. येणेंकरून या कान्फरन्सचे कामास मोठें महत्व येईल. हल्लींचे प्रसंगीं उदासीनता उपयोगी नाहीं. सबब या आमच्या विनंतीकडे सर्वांनीं लक्ष कृपाकरून दिलें पाहिजे. कळावें लोभ करावा हे विनंती. पुणें २२ मार्च १८७८."

गणेश वासुदेव जोशी.

ठरल्याप्रमाणें तारीख २९ मार्च रोजीं मुंबई वर्तमानपत्रकर्त्यांचें कान्फरन्स कावसजी फ्रामजी इन्टिटयूटमध्यें त्या वेळचे इंदु–प्रकाश वर्तमानमत्राचे एडिटर रा. जनार्दन सुंदरजी कीर्तिकर ह्यांचे अध्यक्षतेखालीं पार पडलें. त्यांत पूर्वी ठरल्याप्रमाणें एक कमिटी नेमण्यांत आली. कान्फरन्सनें रा. गोवंडे व काका यांचे जाहीर आभार मानले. ह्या नंतर त्याच वर्षाच्या आक्टोबर महिन्याचे अखेरीस, पंजाब इलाख्यांत नेटिव्ह वर्तमानपत्रांचें कान्फरन्स भरविण्यासंबंधानें खटपट करण्याकरितां आपण व रा. ब. सदाशिव बल्लाळ गोवंडे जाणार असून आणखी कोणी येणार असल्यास कळवावें असें एक पत्र काकांनीं प्रसिद्ध केलें होतें. हे कान्फरन्स झालें किंवा नाहीं हें समजत नाहीं.

वर्तमानपत्रकारांनीं दरसाल कोणत्या तरी एखाद्या प्रसिद्ध शहरीं एके ठिकाणीं मिळावें, सर्वांनीं विचारविनिमय करावा, व परस्परांमध्यें संघटनाशक्ति उत्पन्न करून वृत्तपत्रकारांमध्यें एक प्रकारची राष्ट्रीयाकांक्षा पोषक अशी भावना उद्दीप्त करावी असा काकांचा

हेतु होता. परंतु दुर्दैवाची गोष्ट आहे कीं, काकांचा हा हेतु सफल झाला नाहीं. काकांनीं स्वतः परिश्रम करून जीं हीं एकदोन संमेलनें भरविलीं, त्यानंतर तशा प्रकारचीं संमेलनें सन १९२३ सालापर्यंत मुळींच भरलीं नाहींत असें म्हटलें तरी चालेल. सन १९२३ सालीं मुंबईच्या क्रॉनिकल पत्राच्या संपादकांनीं प्रयत्न केल्यामुळें एक वृत्त-पत्र-काराचीं परिषद मुंबईस भरली होती; तथापि तिच्या चिरस्थाइत्वाविषयींही अद्याप निश्चित मत कांहींच देतां येत नाहीं. वास्तवीक सध्यांच्या राष्ट्रीय आकांक्षा, राजकीय परिस्थिती, व वर्तमानपत्रांची जबाबदारी व योग्यता ह्यांचा विचार करितां 'राष्ट्रीय-सभे'प्रमाणें 'प्रेस-कांग्रेसही' दरसाल भरविणें अवश्य आहे.

## काकांची राजदरबारीं वकिली.

सन १८७८ सालांत सार्वजनिक काकांनीं आणखी एक अलौकिक कामगिरी करून, सर्वांना आश्चर्यचकित करून सोडलें !

हिंदुस्थान देशावर इंग्रज सरकारची सत्ता जरी बरीच प्रस्थापीत झाली होती; व राणीसरकारनें जरी हिंदुस्थानची आपण मालकीण आहों हें दर्शविण्याकरितां 'हिंदुस्थानची बादशाहीण' हा किताब धारण केला होता; तरी वायव्य सरहद्दीकडून रशियाची त्याला भीती वाटत होती. रशियानेंही त्यावेळीं मध्य आशियामध्यें पुढें पाऊल टाकण्याचें धोरण स्वीकारलें होतें. रशियाला पायबंद घालण्याकरितां इंग्रज सरकारला अफगाणिस्थानशीं दोस्ती करणें अवश्य होतें; व त्याकरितां इंग्रजांचे प्रयत्नही चालू होते. सन १८७८ सालीं अफगाणिस्थानचे गादीवर दोस्त महंमदाचा मुलगा शेर-अल्ली हा होता. रशियानें आपला वकील त्याच्या दरबारीं पाठविला होता. शेर-अल्लीनें त्याला आपल्या दरबारीं ठेवून घेतलें होतें. इंग्रजांना ही बातमी समजतांच त्यांच्या छातींत थोडें 'धस्स' झालें असल्यास नवल

नाहीं. तथापि त्यांनीं रशियाच्या वकिलास हुसकून लावून आपला वकील तेथें ठेवण्याचें ठरविलें, व त्याप्रमाणें आपला वकील अफगाणिस्थानाकडे रवाना केला. परंतु त्याला आपल्या दरबारीं येऊं देण्यास शेरअल्ली कबूल होईना.

इंग्रजांचा वकील तारीख २१ सप्टंबर १८७८ रोजीं पेशावरहून निघाला; पण तो अफगाणिस्थानचे सरहद्दीवर पोंहोंचल्याबरोबर तेथील अधिकाऱ्यांनीं त्याला अमीराकडून हुकूम येईपर्यंत अटकाव केला. इंग्रजांना ह्यांत अफगाणच्या अमिरानें आपला अपमान केला असें वाटून त्यांनीं अमीरावर चढाई करून जाण्याचें ठरविलें. ह्यावेळीं निरर्थक रक्तपात होऊं नये म्हणून शत्रूच्या दरबारीं जाऊन रदबदली करण्याची जोखीम 'सार्वजनिक-काकांनीं' मोठ्या धैर्यानें अंगावर घेतली; व इंग्रज सरकारकडून आपल्या राजनिष्ठेबद्दल शाबासकी मिळविली. पुढें इंग्रजांच्या वकिलाला पुढें जाण्याचा हुकूम झाला, त्याप्रमाणें तो गेला. इंग्रजांचा वकील कडेकोट बंदोबस्तानें धिटाई करून पुढें आलेला पाहून शेरअल्ली पळून गेला; व पुढें मेला वगैरे गोष्टी इतिहासाच्या आहेत. त्यांची गरज ह्या चरित्रांत नाहीं.*

काकांच्या ह्या दरबारच्या वकिलीसंबंधानें दुसरी अशी एक माहिती मिळते कीं, काकांनीं शत्रूच्या दरबारीं जाऊन रदबदली करून येण्याकरितां इंग्रज सरकारजवळ अमीराचे दरबारीं जाण्याची परवानगी मागितली; परंतु शेरअल्लीवर चढाई करून जाण्याचाच इंग्रज सरकारचा विचार असल्यामुळें त्यांनीं काकांच्या राजनिष्ठेबद्दल व धैर्याबद्दल त्यांची तारीफ करून त्यांना इतकी तसदी घेण्याचें

---

* इंग्रज व अफगाण यांचें युद्ध सुरू झाल्यावर काकांनीं ठाण्यास परिस्थितीवर व्याख्यान देऊन इंग्रज सरकारास जय मिळावा म्हणून सार्वजनिक प्रार्थना करण्याची सूचना केली होती. त्यावरून इतरत्रही त्यांनीं व्याख्यानें दिलीं असावीं असा तर्क करण्यास जागा आहे !

कारण नाहीं असें कळविलें. कांहींही असो. काकांना प्रत्यक्ष जरी राजदरबारीं जाण्याची परवानगी मिळाली नाहीं, तथापि लढाई-सारख्या प्रसंगीं, शेरअल्लीसारख्याच्या दरबारांत शीर हातावर घेऊन काका जाण्यास तयार झाले, व त्यांनीं सरकारजवळ परवानगी मागितली ही गोष्ट देखील आश्चर्यकारक आणि कौतुकास्पद नाहीं असें कोण म्हणेल ?

## सुरतेचा बखेडा.

ह्याच सालाच्या जून जुलई महिन्यांचे सुमारास सुरतेस कांहीं एका प्रकरणावरून दंगा झाला होता. हा दंगा कदाचित् हिंदू-मुसलमानांत असावा असा तर्क आहे. परंतु ह्या दंग्याची चिथावणी वकील वर्गाकडून झालेली असावी; कारण बहुतेक चळवळींचे सूत्रधार बहुधा वकीलच असतात. असा तर्क करून सरकारनें तेथील बऱ्याच वकील लोकांस गोत्यांत आणलें. खुद्द वकिलांवर केवळ ते वकील म्हणून सरकारच्या इतराजीची संक्रांत वळलेली असल्यामुळें त्यांचें वकीलपत्र घेऊन त्यांचा मदतीस जाण्यास कोणीच पुढें येईना. वकील वर्गावर निरर्थक सरकारचा पाहूणचार खाण्याचा प्रसंग ओढवला होता; परंतु पुण्यास ‘ सार्वजनिक–काकांना ’ ही गोष्ट समजतांच, ते कोणत्याही प्रकारची द्रव्याची आशा न करितां व वेळ न गमावतां, सुरतेस तांतडीनें गेले; व मोठ्या बंधुभावानें विपद्ग्रस्तांना मदत करून त्यांची त्यांनीं कैद वांचविली.

## शेतकी–कमिशन.

ह्याच सुमारास मुंबई सरकारनें १८७८ चा अबकारी संबंधाचा पांचवा ॲक्ट पास केला; त्यामुळें उत्तर कोंकणांतील भंडारी व कनिष्ठ वर्गाच्या लोकांस अडचण भासूं लागली. ह्या ॲक्टानें सरकारनें खजुरीवर १॥ रुपायापासून ४ रुपयेपर्यंत, ताडावर ३ रुपये-

पासून १३ रुपयेपर्यंत, व माडांवर ३ रुपयांपासून १४ रुपयांपर्यंत असा जबरदस्त कर बसविला होता. ठाणें जिल्ह्यांतील कल्याण, वसई, माहीम, येथील दारूच्या कंट्राटदारांशिवाय त्या त्या झाडांच्या मालकांस वरील कर भरून देखील ताडी काढण्याची मनाई करण्यांत आली. कित्येक तालुक्यांचा एक साच जमवून घाऊक लिलांव करण्याची पद्धत सुरू केल्यामुळें, परस्थ श्रीमंतास लिलाव बोलण्यास सांपडून पूर्वीच्या किरकोळ लिलांव बोलणाऱ्या ग्रामस्थमध्यमस्थितींतील लोकांची गैरसोय होऊं लागली.

उत्तर कोंकणांत ज्याप्रमाणें हा पांचवा अबकारी ॲक्ट पास झाला, त्याप्रमाणें दक्षिण कोंकणांत ' खोती बिल ' पास होण्याकरितां मुंबई–सरकारच्या टेबलावर येऊन पडलें. ह्या बिलानें खोतांचा जमिनीवरील ' खोती–हक्क ' नष्ट करण्याचा घाट घातलेला होता. सरकारनें देशावर दंगे कां होतात ह्यांची कारण–मीमांसा करण्याकरितां,व शेतकऱ्यांची स्थिति कशी आहे; ती बिघडली असल्यास,बिघडण्याचीं कारणें कोणतीं, त्यांची सुधारणा करण्याकरितां काय केलें पाहिजे, वगैरे प्रश्नांची चवकशी करण्याकरितां एक कमिशन नेमिलें. कमिशननें चवकशी करून असें ठरविलें कीं, हल्लींचा वाढलेला ' सरकारदस्त ' शेतकऱ्यांस भरण्यास फार दोईजड जातो. धान्याला भाव येण्यापूर्वींच नुकसान सोसून, किंवा सावकाराचें कर्ज काढून, शेतकऱ्यांस सरकार सारा भरावा लागतो. त्यामुळें प्रजा अगदीं दीन-दुबळी झाली आहे. स्वतःचें कुटूंब पोसण्याइतकीही ताकद शेतकऱ्यांच्या अंगीं राहिलेली नाहीं. आपल्या पोराबाळांच्या तोंडांत दोन घास घालण्याकरितां त्यांना सावकाराचे उंबरठे झिजवावे लागतात. सावकार लोक कर्जाऊ रकमेवर अवाच्या सवा व्याज आकारतात; व कुळांस नाना प्रकारांनीं छळतात. शेवटीं लोकांना हा छळवाद, व ही स्थिति सहन होईनाशी झाली म्हणजे ते बेफाम होऊन सहा-

जिकपणें दंगे करण्यास प्रवृत्त होतात. दंगा झाला म्हणजे पकडा-पकडी होते. पकडापकडी झाली म्हणजे कांहीं काळ स्वस्थता उत्पन्न होते; परंतु पुन्हां लागलीच पूर्ववत् स्थिती येते. ह्या करितां सरकारनें प्राथमिक शिक्षणाचा फैलाव करून शेतकरी वर्गांतील अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न करावा हें सरकारास उचित आहे. सावकार ज्याप्रमाणें कर्ज देतो त्याप्रमाणें सरकारनें थोड्या व्याजाच्या दरानें शेतकऱ्यांस कर्जाऊ रकमा देण्याची व्यवस्था ठेवली पाहिजे. 'पोस्टल–सेव्हिंग–बँकांचा सर्वत्र प्रसार करून शेतकरी वर्गांतील मनुष्याला कांहीं तरी रक्कम गांठीं टाकतां येईल अशी सोय करण्यांत आली पाहिजे. अर्थातच असें करतां यावें म्हणून 'सरकार–सारा'-ही थोडा कमी केला पाहिजे.

वरील कमिशनला शेतकऱ्यांच्या स्थिती संबंधानें सर्व माहिती पुरविण्यांत व वर दिग्दर्शित केलेल्या सूचना सुचविण्याचे कामीं 'सार्वजनिक–काकांचा.' सर्वस्वी पुढाकार आहे. काकांच्या ह्या सूचनांबद्दल त्यावेळच्या मुंबई सरकारच्या पदरीं असलेल्या 'होप' साहेबांनीं 'सार्वजनिक–काकांच्या बुद्धिमत्तेची वाखाणणी केली; व त्यांच्या सूचनांतील ग्राह्य सूचनांचा अंगिकार करून एक कायदा पास केला. तो कायदा असाः—

'शेतकऱ्यांनीं सावकाराला जीं खतें लिहून द्यावयाचीं, तीं सरकार समक्ष लिहून त्यांनीं तीं नोंदवून घेतलीं पाहिजेत. उग्राणी केलेल्या रकमांच्या पावत्या सावकारानें शेतकऱ्यास दिल्या पाहिजेत. शेतकरी मागतील तेव्हां सावकारांनीं त्यांस हिशेब दाखविले पाहिजेत, त्यांच्या नकला त्यांना हव्या असल्यास त्या त्यांस करून घेऊं दिल्या पाहिजेत. शेतकऱ्यांवरील मुकदम्यांत, होतां होई तोंपर्यंत, कोर्टानें आपापसांत तंटे मिटविण्याचे उपाय केले पाहिजेत. प्रतिवादीच्या गैर हजिरीवरून, कोर्टानें एकतर्फी हुकूमनामा देऊं नये;

प्रतिवादीनें पैतृक-ऋण खुषीनें कबूल केलें पाहिजे. परंतु न केल्यास तें फेडलेंच पाहिजे असा प्रतिवादीवर निर्बंध नसावा. सावकारानें चक्रवाढ–व्याजाची आकारणी करूं नये. एक रकमी दाम दुप्पट, किंवा मुदलाहून अधिक–व्याज सावकारास कायद्यानें घेतां येऊं नये. आपण सावकाराचें कर्ज देण्यास असमर्थ आहों, असें शेतकऱ्यानें कोर्टांत येऊन सांगितल्यास कोर्टानें त्यास पकडून आणण्याची गरज नाहीं. जी जमीन कर्जाकरितां शेतकऱ्यानें सरकाराकडे गहाण ठेविली नसेल, अथवा ती तशी ठेविली असून गहाण खत नोंदविलें नसेल तर तिचा त्या कर्जाकरितां लिलांव होणार नाहीं.'

वरील आशयाचा कायदा जो पास करण्यांत आला होता, तो जनतेला पटवून देण्याच्या कामींही 'सार्वजनिक-काकांनीं' पुढाकार घेऊन बरेच श्रम केले. 'स्वदेशी' 'लवाद' इत्यादि गोष्टी लोकांना पटविण्याकरितां ज्या प्रमाणें त्यांनीं जागोजाग व्याख्यानें दिलीं, त्याप्रमाणें हा कायदाही लोक-प्रिय करण्याकरितां ते मनापासून झटले.

## वासुदेव बळवंत फडके.

'सार्वजनिक-काकांचें' वरील काम चालू असतानांच वासुदेव बळवंत फडके ह्यांचा खटला न्यायासनासमोर आला. वासुदेव बळवंत फडके हे मूळचे पनवेल तालुक्यांतील शिरढोण गांवचे रहाणारे. विद्याभ्यास पुरा झाल्यावर ह्यांनीं पुण्याच्या मिलिटरी-फायनान्स खात्यांत नोकरी धरली. परंतु त्यांचा जागता देशाभिमान त्यानां स्वस्थ बसूं देईना. नोकरी करीत असतानांच ते लष्करी शिक्षण खाजगी रीतीनें संपादन करीत होते. वासुदेव बळवंत ह्यांनीं कोर्टांत जी जबानी दिली त्यावरून त्यांच्या मनःस्थितीची कल्पना करतां येते. त्या जबानींत ते म्हणतातः–"हजारों गोष्टींचा विचार करतां माझें मन युरोपियन लोकांविरुद्ध, त्यांच्या नाशाचा विचार करूं लागलें.

ह्या विचार मी रात्रंदिवस करीत असें. रात्रींही मला झोंप येत नसे. असें करतां करतां मी वेड्यासारखा झालों !" अशा प्रकारच्या मनःस्थितींत नोकरपेशांत होणाऱ्या वरीष्ठ अंमलदारांच्या जाचाची भर पडल्यामुळें, त्यांनीं नोकरीची बेडी तोडून टाकून त्यांच्या मताप्रमाणें देशसेवेचा मार्ग पत्करला. प्रथम व्याख्यानांचे द्वारें लोकजागृति करून पहावी म्हणून त्यांनीं जागोजाग व्याख्यानें दिलीं; परंतु ह्या मार्गानें जाण्यांत निराशेचें फळ वारंवार पदरांत पडूं लागल्यामुळें, त्यांनीं तो मार्ग सोडून दिला; व शिवाजी महाराजांप्रमाणें गनिमीकाव्यानें लढून पहिल्या ब्राह्मणी राज्याचें पुनरुज्जीवन करण्याचें ठरविलें. त्यावेळीं महाराष्ट्रांत पुरंदरच्या आसपास 'होन्या' ह्या नांवाच्या एका कोळ्यानें बराच धुमाकूळ माजविला होता. वासुदेव बळवंत ह्यांनीं ह्या रामोशी लोकांबरोबर संगनमत करून आपला कार्यभाग सिद्धीला नेण्याचें ठरविलें. फडक्यांनीं इंग्रज-सरकारास बरेच दिवस खेळविलें. गनिमी-काव्यानें सरकारच्या लष्कराचा बंदोबस्त फोल करून टाकला. बडेपणाची घमेंड मारणाऱ्या सरकारी अंमलदारांना चीं, चीं करावयास लाविलें. सरकारच्या काळ्या-गोऱ्या पलटणांस बरेंच चळविलें; वासुदेव बळवंतानें कांहीं काळ पर्यंत सरकारच्या व जनतेच्या तोंडचें पाणी पळविलें होतें. एवढेंच नव्हे तर पेशव्यांची राजधानी आपल्या हातांतून जाते कीं काय अशीही सरकारला क्षणभर भीती वाटल्याशिवाय राहिली नाहीं. पुण्याचे लोक वासुदेव बळवंत यास अनुकूल आहेत असा भ्रामक समज करून घेऊन सरकारनें पुण्यास झडत्यांचे सत्र चालू ठेवलें होतें. लष्करी चौक्या जागोजाग बसविण्यांत आल्या, लष्करी अंमल सुरू होऊन जिकडे तिकडे धुमाकूळ माजून राहिला. परंतु फडक्यांचें दैव त्यांना अनुकूल नसल्यामुळें, व त्यांच्या इतर सहकारी लोकांमध्यें त्यांच्या इतक्या उदात्त भावना जागृत नसल्यामुळें फडक्यांची महत्त्वाकांक्षा सफल झाली नाहीं. शेवटीं एक

दिवस तापानें फणफणत, व दोनतीन दिवस उपाशी, अशा स्थितींत गाणगापुरच्या जंगलांतील एका देवळांत ते एकटे निजले असतांना मेझर डॅनिअल नांवाच्या एका इंग्रजी लष्करी अधिकाऱ्यानें आपल्या तुकडीसह त्यांच्यावर अचानक छापा घालून मोठ्या शौर्यानें आणि शिताफीनें त्यांना गिरफदार केलें. फडक्यांच्या खटल्याची चवकशी पुण्याच्या न्यायासनासमोर व्हावयाची होती. मल्हारराव गायकवाड ह्यांच्या विषयीं पुणेंकरांनीं जी कळकळ दाखविली त्यावेळेपासून सरकारचें मन पुणें-कराविषयीं बरेंच साशंक झालेलें होतें. पुढें विश्राम-बाग व बुधवार वाडा ह्यानां आगी लावण्याच्या कामांत रानडे ह्या नांवाच्या एका ब्राह्मणाचा संबंध असल्याचें दिसून आल्यामुळें ब्राह्म-णांविषयींचा सरकारचा संशय दुणावला होता; व आतां फडक्यांच्या बंडानें तर तो दृढावून सरकारनें पुण्याच्या ब्राह्मणांस बंडखोर ठरवून व पुण्यांत लष्करी अंमलाचा पुकारा करून सर्वत्र दडपशाहीचें धोरण स्वीकारलें होतें. ह्याचा परिणाम असा झाला कीं, फडक्यांच्या खटल्याच्या वेळीं त्यांच्या वतीनें वकिली करण्यास कोणीच पुढें येईना! परंतु सार्वजनिक-काकांना तें सहन झालें नाहीं. पुण्यासारख्या ठिकाणीं फडक्यांना वकील मिळूं नये ही गोष्ट पुणें शहराला काळिमा लावणारी आहे असें काकांना वाटलें. सरकारनें जरी फडक्यांना 'राजद्रोही' 'बंडखोर' म्हणून ठरविलें होतें, व पुणेंकरांना देखील जरी फडक्यांच्या नांवाचा दरारा वाटत होता; तरी त्या बंडखोरीच्या पलीकडे 'देशभक्ती'ची उत्कट भावना प्रदीप्त झालेली 'काकां'ना दिसत होती, व त्याबद्दल त्यांना फडक्यांविषयीं आदरच वाटत होता! म्हणून त्यांनीं वासुदेव बळवंत फडक्यांचें वकील पत्र घेण्याचें ठरविलें! त्यांच्या कित्येक मित्रांनीं त्यांना 'तुमचा ह्या धाडसाचा परिणाम ठीक होणार नाहीं,' म्हणून बजावलें; परंतु काकांनीं त्यावर त्यांना पुढील उत्तर देऊन गप्प बसविलें. ते म्हणाले, " वासुदेव

बळवंतानें जें कांहीं केलें आहे तें उत्कट देशभक्तीनें प्रेरित होऊनच केलें आहे. मग मी त्यांचें 'वकलिपत्र कां घेऊं नये ? मी त्यांचें वकलिपत्र घेतलें तर सरकार माझ्यावर रागावेल. होय ना ? पण सरकार रागावून तरी काय करणार ? फडक्याला जसा फासांवर चढवतील तसा मलाही चढवतील. ह्यापेक्षां तर जास्त कांहीं करणार नाहीं ना ? "

' सार्वजनिक—काकांनीं ' फडक्यांची वकिली केली; व त्यांच्या वकिलीमुळें फडक्यांची फांशी चुकून त्यांना काळें—पाणी मिळालें. फडक्यांना ' एडन ' येथें काळ्या पाण्यावर पाठविण्यांत आलें.

फडक्यांच्या खटल्यांत फडक्यांची रोजनिशी, व त्यांची स्वतःची जबानी ह्यांच्या वरून पुणेंकर ब्राम्हणांचा व त्यांचा कांहीं एक संबंध नव्हता हें सिद्ध झालें व सरकारकारचा पुणेंकरांवरील इतराजीचा फेरा गेला.

## पुण्यांतील आगी.

वासुदेव बळवंत ह्यांच्या बंडाची धामधूम चालू असतां एक दिवस रात्रीं पुण्याच्या बुधवार वाड्यास व विश्रामबाग वाड्यास एकाएकीं एकदम आगी लागून जिकडे तिकडे धांवपळ सुरू झाली. हे दोन्ही वाडे सरकारचे ताब्यांत असून त्यांत सरकारी बुकडेपो व सरकारी रेकॉर्ड ठेवलें होतें. दोन्ही वाड्यांना एकदम आगी लागलेल्या पाहून हें कृत्य वासुदेव बळवंताचें असावें असें प्रथमतः सर्वांस वाटलें. परंतु पुढें चौकशी अंतीं त्यांत वासुदेव बळवंताचा कांहीं संबंध नसून, केशव, व कृष्णाजी रानडे ह्या नांवाच्या इसमांनीं बुकडेपोमध्यें केलेली अफरातफर झांकण्याकरितां हें सर्व केलें असें उघडकीस आलें. वाड्यांस आगी लागल्या त्यावेळीं त्या विझविण्याकरितां काकांनीं पुष्कळ खटपट केली. वाडा जळत असतांच सकाळच्या

आंत वाडा जाळणारे बुकडेपोकीपर ह्यांस संशयावरून त्यांनीं पकडलें व त्यांच्या जवळून कबुली जबाब लिहून घेतले. पुण्याचे सुशिक्षित लोक ह्या आगींस अनुकूल होते. त्यांनीं आग विझविण्यास वगैरे मदत केली नाहीं, ते नुसती जळत्या वाड्यांची मजा पहात उभे होते, वगैरे तऱ्हेचा कांहीं खोडसाळ मजकूर मुंबईच्या गॅझिटनें प्रसिद्ध केला होता. त्याबद्दल काकांनीं त्यास तार करून चूक कळविली; परंतु गॅझिटकर्त्यानें तें मनावर घेतलें नाहीं. विश्रामबागेचा जळालेला भाग पुन्हां बांधण्यासंबंधानें फंड जमविण्याचा विचार करण्याकरितां खान बहादूर दस्तूर नसरवानजी जमशेटजी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक सभा भरविण्यांत आली होती. सभेंतील भाषणानंतर व ठरावानंतर सार्वजनिक-काकांच्या सूचनेवरून फंडाचे आंकडे देण्यास व फंड जमविण्यास सुरवात करण्यांत आली. सभेंत १२०० रुपयाचे आंकडे पडले. युरोपियन लोकांनींही ह्या फंडास मदत केली.

वाड्यांला आगी लावणाऱ्या इसमांवर आरोप शाबीत होऊन त्यांना रीतसर शिक्षाही झाल्या; परंतु वाड्यांच्या आगीची झळ नामसादृश्यावरून माधवराव रानड्यांसारख्या सात्विक मनुष्याला लागल्याशिवाय राहिली नाहीं. हायकोर्ट जज्ज नको नको म्हणत असतांना सरकारनें फॉर–पोलिटिकल–परपज्' ह्या शेऱ्याखालीं माधवरावांची पुण्याहून उचलबांगडी करून त्यांना नाशिक, धुळें अशासारख्या दूर कोपऱ्यांत नेऊन ठेवलें, इतकेंच नव्हे तर कांहीं कालपर्यंत गुप्त हेरांचाही ससेमिरा त्यांच्यामागें लावून ठेवला होता.

## किरकोळ.

'सार्वजनिक-काकांच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या गोष्टी कालक्रमानुसार वर दिल्या आहेत, तथापि त्यांशिवाय प्रत्यहीं काकांच्या

हातून कितीतरी किरकोळ स्वरूपाचीं लोकोपकाराचीं कामें होत होतीं. गांवांतील कितीतरी गरीब निराधार लोकांना 'काकांची' मदत मिळत असे. शेतकऱ्यांच्या मुलांना कलाकौशल्याचें ज्ञान व्हावें, व शिक्षण मिळावें म्हणून त्यांनीं आटोकाट प्रयत्न केले; परंतु आपल्या श्रमांचें फळ आपल्या हयातींत त्यानां पहावयास मिळालें नाहीं! राष्ट्राची राजकीय–दृष्ट्या उन्नती होण्याकरितां ज्याप्रमाणें 'सार्वजनिक–काकांनीं' आपलें सर्व आयुष्य वेंचिलें, कित्येक प्रसंगीं पुढाकार घेऊन कामें केलीं त्याप्रमाणें सामाजिक सुधारणेच्या बाबतींत त्यांनीं पुढाकार घेतलेला दिसत नाहीं; तथापि कोठें विरोधही केलेला दिसत नाहीं. काका धर्मनिष्ठ घराण्यांत जन्मास आले होते; आणि कर्मनिष्ट मातेच्या हाताखालीं वाढले होते, मातृसुखाचा लाभही त्यांनां त्यांच्या सुदैवानें शेवटपर्यंत झाला होता; कारण त्यांच्या मातुश्री त्यांच्या नंतर सुमारें आठ वर्षांनीं वारल्या. शिवाय काका हे निस्सीम मातृ–भक्त होते. एवढें वैभव, एवढी कीर्ती, एवढी मानमान्यता त्यानां प्राप्त झाली होती तरी शेवटपर्यंत ते मातेच्या अर्ध्या–वचनांत असत. मातेचा शब्द त्यांनीं कधींही मोडला नाहीं. त्यामुळें ते जून्या तऱ्हेचे स्नान–संध्या–शील होते. मातुश्रीच्या आग्रहावरून त्यांनीं श्री विष्णु पंचायतनाचें मंदिर बांधिलें, हल्लीं ते 'नव्या विष्णूचें मंदिर' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्या मंदिरांत पुराण, कथा, ब्राह्मण संतर्पण वगैरे सतत चालू असे. ते स्वतः कित्येक वर्षें 'धाराग्र' पाळीत असत; तथापि हीं सर्व कृत्यें मातुश्रीस समाधान व्हावें म्हणून ते करीत असत. त्यांची ह्या कर्म–प्रधान धर्मावर श्रद्धा होती असें दिसत नाहीं; कारण प्रवासास बाहेर निघाले, किंवा मित्रमंडळीच्या गांठी पडल्या म्हणजे जेवणाखाणांत सोंवळें ओंवळें किंवा ब्राह्मण–शुद्र हा विचार ते पाळीत नसत. तसेंच विधवा–स्त्रियांचे दुःखानें त्यांचें अंतःकरण तळमळत असे. विधवांनीं पुनर्विवाह करावा कीं करूं नये ह्या

संबंधानें जरी त्यांनीं मौन धारण केलें असलें तरी आपल्या धर्मांत आपण सुवासिनीस जो दान–धर्म करतो तो सुवासिनींपेक्षां विधवांस करणें अधिक उचित आहे, असें त्यांचें मत होतें. आणि त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या मातुश्रीकडून एकवेळ आपल्या देवळांत विधवाबायांस लुगडीं वाटलीं होतीं. सामाजिक सुधारणेच्या बाबतींत जरी त्यांचीं मतें वर दर्शविल्याप्रमाणें धर–सोडीचीं दिसत होतीं, तरी ' स्त्री–शिक्षण ' म्हणून जो सामाजिक सुधारणेचा एक–भाग आहे त्याला ते अनुकूल असावे असें वाटतें. कारण काकांच्या पत्नी व काकांचे सहकारी रा. ब. गोवंडे ह्यांच्या पत्नी ह्यांनीं स्त्री–शिक्षणाचा फैलाव करण्याकरितां ' स्त्री–विचार–वती सभा ' ह्या नांवाची एक सभा स्थापन केली होती; व त्या सभेच्या दर आठवड्यास बैठकी भरविण्यांत येत असत. स्त्री–विचारवती सभेच्या सभासदांची संख्या जरी आठांच्यावर गेली नाहीं, तरी अखिल महाराष्ट्रांतीलच नव्हे तर अखिल हिंदुस्थानांतील पहिली ' स्त्री–सभा ' ह्या दृष्टीनें तिचें महत्व अधिक आहे. ही सभा सन १८७३चे सुमारास स्थापन झाली होती.

## अंत.

' सार्वजनिक–काका ' शरिरानें उंच, सडपातळ, वर्णानें अंमळ काळे, व किंचित् पोक आलेले असे होते. लहानपणापासून त्यांची प्रकृती अंमळ अशक्त होती; तथापि त्यांस कोणतीही विकृति नव्हती. अखेरच्या वर्षांत त्यांस हृदयाचा विकार जडला होता; परंतु त्याला त्यांनीं फारसे औषधोपचार केले नाहींत. हृदयाचा विकार जडलेला असल्यामुळें तुम्हीं छातीस ऊबदार कपडा वापरला पाहिजे, ह्याकरितां फ्लानेलच्या बंड्या वापरीत जा असा डॉक्टर विश्राम ह्यांनीं त्यांस आग्रह केला होता. परंतु फ्लानेल आपल्या देशांत होत नाहीं सबब मी ती वापरणार नाहीं; धाबळीच्या बंड्या हव्यातर करीन असें त्यांनीं डॉक्टरसाहेबांस स्पष्ट सांगितलें. शेवटीं त्यांना नवज्व-

राचा विकार झाला व अवघ्या पांच सहा दिवसांच्या तापानेंच त्यांचा अंत झाला. सरकारी नोकरीची बेडी तोडून टाकून सार्व-जनिक परोपकाराच्या कार्यांत चंदनाप्रमाणें झिजविलेला आपला देह काकांनीं सन १८८०च्या जुलई महिन्याच्या पंचवीसावे तारखेस आपल्या मातेच्या अंकावर ठेविला.

## जीवन रहस्य.

'सार्वजनिक—काकांच्या' चरित्राचें रहस्य उकलण्यास जितकें कठीण आहे तितकेंच तें सोपेंही आहे. असें म्हणण्याचें कारण असें कीं, त्यांचें मूळचें नांव नाहींसें होऊन 'सार्वजनिक—काका' हें जें नांव लोकांकडून त्यांना स्वयंस्फूर्तीनें देण्यांत आलें, त्यावरूनच त्यांच्या जीवन—रहस्याचा उलगडा होतो. गणपतराव जोश्यांनीं जर आपल्या वकिलीच्या व्यवसायापलीकडे पाहिलें नसतें, किंवा हल्लींच्या देशभक्तांप्रमाणें केवळ शिळोप्याच्या वेळीं त्यांकडे थोडें लक्ष दिलें असतें, 'पराकारणें' आपला देह जर त्यांनीं चंदनासारखा झिजविला नसता, श्रीमंत असो वा गरीब असो, राजा असो वा रंक असो, किंवा बंडखोरीचा शिक्का मिळालेला कोणी दुर्दैवी देश-भक्त असो, तो 'आर्त' झाला असतां स्वयं—स्फूर्तीनें ते जर त्याच्या मदतीला धावून गेले नसते, देशाभिमानानें प्रेरित होऊन देशो-द्धाराची खटपट जर रात्रंदिवस त्यांनीं केली नसती, सारांश गणपतराव जोश्यांनीं आपलें तन—मन—धन हीं सर्व एक सार्वजनिक—ठेवा आहे, वाटेल त्यानें त्याचा उपयोग करून घ्यावा, अशी जर आपल्या वर्तनानें लोकांची समजूत करून दिली नसती; तर त्यांना 'सार्वजनिक—काका' ह्या नांवानें कोणीही संबोधिलें नसतें; किंब-हुना आज 'सार्वजनिक—सभा' व 'जोशी हॉल्' हीं जीं त्यांचीं स्मारकें पुण्यास दिसत आहेत तींही दिसतीं ना!

येथें ही पण गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, काकांनीं जी एवढी दगदग, जो एवढा त्रास सोसून लोकोपयोगार्थ आपला देह झिजविला त्यांत त्यांचा स्वार्थपर असा यत्किंचितही हेतू नव्हता. किंवा ते लोकप्रियतेच्या मानाकरितांही हापापलेले नव्हते. त्यांनीं जें कांहीं केलें तें केवळ त्यांची स्फूर्ति त्यांना स्वस्थ बसूं देईना म्हणून त्यांनीं केलें. त्यांना झालेली स्फूर्ति ही स्वयं स्फूर्ति होती, कोणाकडून उसनी आणलेली नव्हती.

आतां हें काम कठीण आहे असें म्हणण्याला दोन तीन कारणें आहेत. एक तर 'सार्वजनिक-काकांच्या' वेळची मंडळी हल्लीं हयात नाहींत. त्यामुळें जीवन-रहस्य उकलण्यास कोणाही व्यक्तीच्या चरित्राचें जितकें सूक्ष्म ज्ञान असावयास पाहिजे, तितकें मिळण्याचीं साधनें नाहींशी झालीं आहेत. दुसरें पेशवाई सन १८१८ सालीं नष्ट झाली तरी पुढें पांच पंचवीस वर्षेंपर्यंत तिचें पूर्व वैभवाचें तेज महाराष्ट्रीयांच्या डोळ्यांपुढून नाहींसें झालें नव्हतें. पेशवाईच्या भाग्यरवीच्या अस्तानंतरचा तो संधीकाल होता असें म्हटलें तरी चालेल. पेशवाई ज्याप्रमाणें चुटकी सरशी नाहींशी होऊन तिच्याजागीं आंग्लाई आली, त्याप्रमाणें पुन्हां 'आंग्लाई' नाहींशी होऊन पेशवाई सुरू होणार नाहीं म्हणून कशावरून? अशा प्रकारचे विचार त्या वेळीं पुष्कळांचें डोक्यांत घोळत असत. पुढें सन १८८० च्या सुमारास चिपळूणकर, टिळक, आगरकर, वगैरे विभूति महाराष्ट्र वैभवाकाशाच्या क्षितिजावर चमकूं लागल्या, व महाराष्ट्रांत चैतन्याचें नवें वारें संचरूं लागलें. हा भाग्यरवीच्या उदयापूर्वीचा संधिकाल होय. पेशवाईच्या भाग्यरवीच्या अस्तानंतरच्या संधिकालापासून टिळक-आगरकरांच्या अरुणोदयाच्या संधीकालाच्या दरम्यानचा काल जो गेला त्याला age of Darkness असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं.

ह्या age of Darkness मध्यें महाराष्ट्र देश हा एक 'थंडा-गोळा' बनलेला होता. सन १८८० सालापासून सन १९२० साला-पर्यंतच्या कालाला ' टिळक-काल ' म्हणावयास हरकत नाहीं. हा 'टिळक-काल' नुकताच डोळ्यांपुढून गेलेला असल्यामुळें, व टिळकांच्या ' असंख्य-विध ' कामगिरीनें तो गजबजून गेलेला असल्यामुळें महाराष्ट्रांतील जनतेची मनें सहाजिकच त्या कालाकडे जास्त वेधून राहिलीं आहेत. लोकमान्य टिळकांच्या अद्भुत कामगिरीनें महाराष्ट्रीय जनतेची दृष्टी इतकी दिपून गेलेली आहे कीं, त्या तेजापुढें ' Age of Darkness ' मध्यें चमकत राहिलेल्या ह्या एकट्या लहानशा तारका-खंडाच्या कर्तबगारीकडे कोणाचेंही लक्ष वळलें नाहीं.+ ह्या कारणामुळेंही आज मितीला खुद्द पुण्यांतील लोकांनाही ' काकांचा ' विसर पडत चालला आहे. परंतु महाराष्ट्रानेंच नव्हे तर अखिल हिंदुस्थान देशानें ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, देशाभिमानाची व देशसेवेची स्फूर्ती राष्ट्राच्या अंतःकरणांत जर कोणी उत्पन्न केली असेल तर ती सार्वजनिक-काकांनींच होय. चिपळूणकरांनीं आपल्या निर्भीड व चुरचुरीत लेखांनीं त्याला पालविलें असेल, रावबहादूर माधवराव रानडे ह्यांनीं आपल्या अगाध बुद्धिमत्तेनें त्याला विचाराचें योग्य वळण लावलें असेल, लोकमान्य टिळकांनीं आपल्या धडाडीच्या कामगिरीनें त्याच्या ज्वाला ' आसेतु-हिमाचल ' पसरविल्या असतील, तथापि मूळ ठिणगी चेतविण्याचें काम जर कोणी केलें असेल तर तें काकांनींच होय! आणि ह्या बद्दल महाराष्ट्रानेंच नव्हे तर अखिल भारतवर्षानें काकांचे सदैव ऋणींच राहिलें पाहिजे.

---

+ खरोखरच हल्लीं असें झालें आहे. टिळक-जयंति, व टिळक-पुण्यतिथी ह्यांच्या दरम्यान ' सार्वजनिक-काकांची ' पुण्यतिथी पडत असल्यामुळें, खुद्द पुण्यास टिळक-जयंतीच्या नगाऱ्यापुढें सार्वजनिक-काकांच्या पुण्यतिथीच्या टिमकीची कोणाला आठवणही होत नाहींशी झाली आहे.

सहस्रावधि मुखांनीं सागराला मिळणाऱ्या गंगेचा उगम ज्या प्रमाणें गंगोत्रीच्या एका ल्हानशा गाय-मुखांतून झालेला आहे, त्या प्रमाणें आजकाल अखिल हिंदुस्थान देशाला व्यापून टाकणारी जी विविध प्रकारची चळवळ चालू आहे तिचा उगम सार्वजनिक काकांपासूनच आहे. आणि म्हणून गंगानदीच्या संबंधांत गंगोत्रीला जें महत्व आहे तेंच महत्व सध्यांच्या जागृतीच्या संबंधांत काकांना आहे. परंतु दुर्दैवाची ही गोष्ट कीं, आजकाल महाराष्ट्राला त्यांची आठवण सुद्धां धड होईनाशी झाली आहे. मग त्यांच्या गुणांची जाणीव होणार कशी, पटणार कशी व त्यांचें जीवन-रहस्य उकलणार कसें ? सार्वजनिक काकांच्या गुणावगुणांची माहिती करून देणारा कोणी इसम अगर इतर अन्य मार्ग आज उपलब्ध नसल्याळें त्यांच्या चरित्राचें रहस्य समजण्याकरितां त्यांच्या गुणावगुणांची जी माहिती मिळणें अवश्य आहे ती वर जी संक्षेपतः त्यांची माहिती दिली आहे त्यावरूनच तर्क-पद्धतीनें काढिली पाहिजे !

काकांचें सर्व चरित्र ‘ परोपकाराच्या ’ सुगंध परिमलानें दरवळलेलें आहे. तेव्हां ‘ परोपकार ’ ह्या त्यांच्या गुणाला अग्रस्थान दिलें पाहिजे.

ही परोपकारीं देह झिजविण्याची स्फूर्ति काकांना त्यांच्या देशप्रीतिमुळें, व स्वदेशाभिमानामुळें, झाली हें उघड आहे. ह्यावरून ह्या दोन गुणांचा त्यांच्या ठिकाणीं उत्कृष्ट विकास झाला होता असें दिसून येतें. स्वदेशाभिमान तर त्यांच्या रोमरोमीं खिळून राहिला होता असें म्हटलें तरी चालेल. देशाची उन्नती व्हावी ह्या उद्देशानें स्वदेशीला उत्तेजन देण्याकरितां त्यांनीं जे अविश्रांत श्रम केले, स्वदेशीची उपयुक्तता लोकांना पटवून देण्याकरितां व्याख्यानद्वारें त्यांनीं जो कंठशोष केला, पुण्यांत स्वदेशीचीं दुकानें उघडण्याकरितां त्यांनीं

जी जोराची खटपट केली, तें सर्व त्यांच्या स्वदेश–प्रीतीचें व स्वदेशाभिमानाचें द्योतक नव्हे काय ?

काकांनीं स्वदेशीचा जो लोकांना उपदेश केला तोही कोरडा नव्हता; अंत:करणांपासून होता ' आधीं केलें मग सांगितलें ' ह्या न्यायानें ते स्वत: आधीं देशी बनले व मग त्यांनीं दुसऱ्यांस उपदेश करण्यास आपला पाय पुढें टाकला. त्यांनीं ज्यावेळीं आपली पहिलीं बहुमोल व भपकेबाज वस्त्रें टाकून त्यांच्या ऐवजीं जाडी–भरडीं खादीचीं वस्त्रें परिधान केलीं त्यावेळीं बाजूच्या लोकांनीं त्यांचा नानाप्रकारें उपहास केला; एवढेंच नव्हे तर कांहीं प्रसंगीं त्यांचा छळ करण्यासही कमी केलें नाहीं; परंतु त्या महापुरुषानें तें सर्व निमूटपणें सहन करून आपलें स्वदेशी–उत्तेजनाचें कार्य चालू ठेवलें ह्यावरून त्यांच्या सहिष्णुतेची चांगलीच ओळख पटते !

काकांच्या वकिलीच्या धंद्यासंबंधानें अनेक खाष्ट न्यायाधिशांशीं दोन हात करण्याचा प्रसंग अनेक वेळां त्यांना येत असे. परंतु त्या प्रसंगीं ते अणुमात्र कचरत नसत. एकदां तर एका बड्या संस्थानिकाचे भेटीस काका गेले असतां तेथें त्यांनीं ' मदिरा ' व ' वेश्या ' ह्यांचा प्रादुर्भाव पाहिला. तात्काळ त्यांनीं त्या संस्थानिकाचे तोंडावर ' तुम्हीं बेशरम आहां. असे ह्या थोर व पवित्र कुळांत कीटक जन्मास आलेले आहांत ' असें स्पष्टपणें सांगितलें ! आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्या संस्थानिकांचीं निशा तात्काळ उतरली आणि तो त्यांच्या पायां पडून तुम्हीं मला ' वसिष्ठ–वाल्मिकी ' भेटलांत असें म्हणूं लागला. ह्या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या कित्येक उदाहरणांवरून काकांचा ' निर्भीड–पणा ' चांगला निदर्शनास येतो.

मनुष्य प्राण्याच्या स्वभावांत निर्भीडपणा, व धारिष्ट ह्यांचें नेहमीं साहचर्य दिसून येतें. काका जसे निर्भीड होते तसे धारिष्टवानही होते. तथापि ह्या दुसऱ्या गुणाला थोडेंसें गालबोट लागलेलें होतें.

कोणत्याही संकटाचे वेळीं प्रथम कांहीं वेळ ते अत्यंत भित्रे, घाबरे, भलत्याच शंका काढणारे, असे दिसत; परंतु एकदां काय करावयाचें ह्याचा त्यांनीं निश्चय ठरविला म्हणजे ते अत्यंत धारिष्टवान आणि शूर आहेत असेंच प्रत्ययास येत असे. ह्या त्यांच्या विलक्षण स्वभावाचीं अनेक प्रत्यंतरें देतां येतील. विश्रामबाग आणि बुधवार वाडा जाळणारे डेपो कीपर ह्यांना वाडा जळत असतां सकाळच्या आंत त्यांनीं संशयावरून पकडलें आणि त्यांच्याकडून कबुली जबाब लिहून घेतला, त्याच्या आधीं ते दुःखानें आणि भीतीनें थरथर कांपत होते.

मल्हारराव महाराजांच्या कमिशनच्या वेळेला मल्हाररावांना न्याय मिळावा म्हणून खटपट करणारे 'काका', दिल्ली दरबारच्या वेळेला मानपत्र घेऊन जातात; पुन्हा शेतकऱ्यांच्या कमिशनपुढें केतकऱ्यांची बाजू कमिशनपुढें मांडण्यास पुढें येतात; मुस्कट दाबीच्या कायद्याच्या वेळीं वर्तमानपत्रांची परिषद भरवितात, वासुदेव बळवंतासारख्या बंडखोराची वकिली करण्यास पुढें येतात व तेच शेरअल्लीच्या दरबारांत शत्रूच्या हातीं आपलें शिर देऊन वकिली करावयास जाण्यास पुढें सरसावतात, व सुरतेचा दंग्यांच्या वेळीं वकिलांची वकिली करण्यास धांवून जातात; ह्या सर्व गोष्टींवरून त्यांच्या निस्पृहपणाची व अन्यायाची चीड आणणाऱ्या स्वभावाची साक्ष पटवीत नाहींत असें कोण म्हणेल ?

असो. असे अनेक गुण काकांच्या ठिकाणीं वास करीत होते. काका हे वक्ते म्हणून प्रसिद्ध नाहींत; तथापि त्यांनीं 'स्वदेशी,' 'लवाद,' 'दुष्काळी-कायदा,' 'कलकत्त्याचें वर्तमानपत्रांचें कान्फरन्स' वगैरे संबंधाची जनतेला माहिती करून देण्याकरितां पुष्कळ व्याख्यानें दिलीं आहेत. त्यांचीं व्याख्यानें जरी वक्तृत्वानें ओथंबलेलीं नसलीं, तरी खऱ्या स्फूर्तीचा जिवंतपणा त्यांत भरलेला अस-

त्यामुळें त्यांच्या व्याख्यानांतील प्रत्येक शब्द श्रोत्यांच्या हृदयाला जाऊन भिडल्याशिवाय रहात नसे. ते आपलें भाषण अलंकारादि-कांनीं अगर काव्यमय कल्पनानीं रंगवून त्याला कृत्रीम सौंदर्य आणीत नसत. जें कांहीं बोलावयाचें तें साध्या, सरळ, सोप्या भाषेंत! व्यवहारांतील दृष्टांत देऊन लोकांना पटवून देण्याची त्यांची हातोटी इतकी चांगली असे कीं त्यांच्या भाषणानें श्रोत्यांच्या चित्त-वृत्तींत जरी तात्पुरती खळबळ उडाली नाहीं, तरी त्यांच्या मनां-तील संशयांची निवृत्ती होऊन त्यांचें मन तल्लीन होऊन जात असे.

'मातृ-भक्ति' हा गुण काकांच्या अंगीं किती उत्कटत्वानें वस-लेला होता, त्याचें विवेचन चरित्र वर्णनाच्या प्रसंगानुरोधानें केलेंच आहे.

असो. यथाशक्ति काकांचें चरित्र कथन केलें, आतां

'आनंदानें तन-मन-धनें देश-सेवा करावी'

हाच सार्वजनिक काकांचा उपदेश मोठया विनम्रपणानें वाचक वर्गाला करून व

'देवो सद्‌बुद्धि आम्हां शुचितम सुपथीं जावयाला परेश ।
हस्तीं चित्तीं न होवो मलिन कुमतिचा पापकारी प्रवेश ।
अक्षीणा सौमनस्या नयपर सुमती राहवो वर्तनांत ।
गोडी लागो सतांच्या सुचरित कथनीं 'रामचंद्रा' अनंत ॥ १ ॥

अशी प्रभु-पदीं विज्ञप्ति करून रजा घेतों.

## उपसंहार.

काकांच्या निधनोत्तर काकांचें स्मारक करण्याकरितां वर्गणी गोळा करण्यांत आली. लोकांनीं काकांच्या कामागिरीची किंमत ओळखून मोठ्या उदार हस्तानें त्यांच्या स्मारकाला मदत केली. त्यांच्या स्मारकाची रक्कम सहा हजार रुपये जमली. त्यांत आणखी नऊ हजारांची भर घालून 'सार्वजनिक–सभेचा–दिवाणखाना' ह्या नांवानें हल्लीं ओळखण्यांत येत असलेली जागा खरेदी करण्यांत आली. 'सार्वजनिक–सभा,' सार्वजनिक–सभेचा–दिवाणखाना व त्या दिवाणखान्या शेजारील 'जोशीहॉल' हीं सर्व सार्वजनिक–काकांची स्मारकें होत. हीं सर्व स्मारकें आजमित्ती पावेतों जनतेला सार्वजनिक–काकांची आठवण करून देण्याचें काम निरलसपणें करीत आहेत.

---

## परिशिष्ट १ लें.

पर्वती संस्थानच्या कारभरांत सुधारणा घडवून आणण्याकरितां स्थापन झालेल्या सभेनें पुढें लोकोपयोगाचीं कामें करण्याचें ठरवून ती 'सार्वजनिक–सभा' बनली. अगदीं प्रारंभीं रा. त्र्यंबकराव नारायण राजमाचीकर, गंगाधर विश्वनाथ गोखले, बाबाजी कृष्ण गोखले, आणि सार्वजनिक–काका हे सभेचे सेक्रेटरी होते. सन १८७३ सालच्या निवडणुकींत रा. रामचंद्र आनंदराव उदास व शिवराम हरी साठे हे चिटणीस म्हणजे सेक्रेटरी निवडून आले. पुढें सन १८७८–१८७९ चे सुमारास अधिकारी मंडळांत फरक घडून आले. त्यांत रावबहादूर सदाशिव बल्लाळ गोवंडे हे ऑनररी चिटणीस व शिवराम हरी साठे हे सेक्रेटरी झाले. सन १८८० मध्यें सुप्रसिद्ध विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांचे चुलते सिताराम हरी चिप-

ळूणकर हे सभेचे ऑनररी सेक्रेटरी झाले. रा. सितारामपंत चिपळूण कर हे सन १८८८ पर्यंत ऑनररी सेक्रेटरीचे जागेवर होते. पुढें प्रोफेसर गोपाळ कृष्ण गोखले हे ऑनररी चिटणीस व केशव पांडु-रंग गोडबोले हे चिटणीस झाले सन १८९६ सालीं गोपाळराव गोखले ह्यांनीं चिटणीसाची जागा सोडली व त्यांच्या जागीं प्रोफेसर शिवराम महादेव परांजपे ह्यांची नेमणूक झाली. सन १८९५।१८९६ चे सुमारास लोकमान्य टिळकांनीं आपल्या बाजूला मताधिक्य मिळ-वून सभा काबीज केली. सन १८९६।९७ सालांपर्यंत सभेला राज-दरबारीं मानमान्यता होती. सभेकडून गेलेल्या अर्जांचा सरकार दर-बारीं सहानुभूति–पूर्वक विचार होत असे; सभेकडून गेलेल्या सूचनां-चीही सरकाराकडून हेटाळणी करण्यांत येत नसे. क्वचित प्रसंगी सरकार स्वतः होऊन सभेचें मत मागवीत असे. व उपयुक्त सूचना केल्याबद्दल सभेचे आभार मानीत असे. सभा लोकमान्य टिळकांनीं काबीज केल्यानंतर सुमारे एक दीड वर्ष पर्यंत काम सुरळींत चाललें. परंतु सन १८९६।९७ सालीं महाराष्ट्रांत पुन्हां मोठा दुष्काळ पडला. पहिल्या दुष्काळाचे वेळेप्रमाणें ह्या वेळींहीं सभेनें आपले एजंट गांवो-गांव पाठवून दुष्काळाची माहिती गोळा करण्याचें आणि सरकारचें धोरण व रयतेचें कर्तव्य जनतेला पटवून देण्याचें काम सुरू केलें. ह्यांत एकसंबेकर नांवाच्या एका प्रचारकानें सरकारला न पटणारी अशीं कांहीं विधानें करून सभेला गोत्यांत आणलें. एकसंबेकर ह्यांनीं स्वतःच्या जबाबदारीवर काढलेल्या हस्तपत्रकांतील विधानांची जबाबदारी सरकारनें सभेवर लादून सभेला त्याबद्दल जाब विचारला. सभेचे सेक्रेटरी ह्यांनीं जाब देण्यांत दिरंगाई केली; व जाब देतांना सरळपणा राखला नाहीं म्हणून सरकारनें एक ठराव करून 'सार्व-जनिक–सभेची' 'राजमान्यता' काढून घेतली. सभेच्या डोक्या-वरून राजमान्यतेचें छत्र दूर होतांच सभेच्या नवीन धोरणाचे आप-

णांस चटके बसतील कीं काय अशी राजे–रजवाडे लोकांना भीती वाटूं लागली, व॰ त्यांनीं हलके हलके सभेच्या पटावरून आपलीं नांवें काढून घेण्यास सुरुवात केली.

सार्वजनिक सभा हल्लीं केवळ ' नामधारी ' आहे असें म्हटलें तरी चालेल. तिच्या सभासदांत हल्लीं सरदार, राजे-रजवाडे वगैरे कोणीही नाहींत; व तिला सरकार दरबारीं मान्यताही नाहीं. सरकारची मान्यता निघाल्यानंतर सन १९०७ सालीं दे. भ. तात्यासाहेब केळकर हे सभेचे सेक्रेटरी झाले. पुढें सन १९१६ सालीं रा. ल. ब. भोपटकर व दा. वि. गोखले हे सेक्रेटरी झाले. हल्लीं दे. भ. शिवरामपंत परांजपे हे सभेचे अध्यक्ष, रा. वामन मोरेश्वर पोतदार हे चेअरमन व दा. वि. गोखले न . वि. गाडगिळ हे चिटणीस आहेत.

---

# परिशिष्ट २ रें.

## मल्हारराव महाराजांचे बावत सार्वजनिक सभेनें गव्हर्नर जनरलकडे पाठविलेला अर्ज.

*To*

His Excellency the Right Honourable,
Lord Northbrook. C. M. S. I.
Viceroy and Governor General of India.

The Humble memorial of the undersigned inhabitants of Poona.

Most Humbly Showeth ,

( 1 ) That your memorialists have watched with deep soncern, the series of events which have of late transpired in Baroda , and which have ended in the sad catachetrople of ttemporary suspension of His Highness

Mulharrao, from the exercise of power, and his forthcoming trial before the High Commission Court on the serious charge of abetting an attempt to poison the British Resident at his court.

(2) Your memorialists as the inhabitants of the late capital of the Peshwas are bound by the ties of interests and relationship with the outlying conquests of the once great Maratha Confederacy, represented by the States of Baroda, Indore, Gwalior, etc. They feel legitimate interest in the progress and well-being of these states which maintain in their various services and by means of their large charities, a considerable number of their fellow-contrymen who have settled in those parts. Of these states the Gaekawar's kingdom as being the oldest, richest, and nearest, has always been regarded as having the greatest claim upon the affection of the people. It is on account of this relationship that your memorialists have been moved to submit the following representation for kind consideration of your Excellency in Council. Your memorialists believe that your Excellency is aware of the fact that the stability of British rule is bound up with the stability of Native states, a proposition that was clearly established by the painful events of 1857; as Native states which have large territories to stake in case they do anything likely to be disapproved by the paramount power, take care to act in allegiance to the British rule and thus set an example of loyalty to the common people. In view of this, your memorialists in making this representation are also moved by feelings of loyalty and desire to see the stability of the British-Rule in India perpetuated.

(3) Your Excellency's Government is aware of the manners of the princes of royal blood in all countries. Power and wealth are necessarily attended with fickleness

of mind and similar weakness. But in the case of Native princes, particurarly such political circumstances have excited as make them weak-minded, men of narrow views who have much leisure and means of luxury and whose Sirdars and subjects cannot exercise legitimate check from the overawing presence of British Residents. In the case of Baroda on aggavating circumstame requires to be added. The different Residents who had preceded Colonel Phayre failed to discharge their duties by not inspiring the Baroda Princes with proper respect for the advice of British officers and by withholding advice or rather by encouraging the princes to act as they pleased, in as much as they submitted favourable reports to Government from time to time. The outcome of this conduct of British Residents is that your Excellency's Government has had the necessity of suspending a prince from the exercise of Power and of putting him on trial before a Court of Justice.

(4) Your memorialists admit with heart-felt gratitude that your Excellency's Government in all their dealings with Baroda have shown the greatest forbearance and a most liberal-minded determination adhere to the merciful spirit of the Queen's Proclamation. On previous occasions when similar interference was found necessary in respect of the chiefs and princes of Oudh, Punjab, Satara, Kolhapur, Tonk etc. the British Government laid itself open to much popular odium and misconstruction of its motives by harsh and one-sided proceedings. The Princes were deposed on the one sided reports of political agents without any independent inquiry, without receiving any explanatin they had to offer, and without showing any consideration for the temptations and weaknesses of their position. Your Excellency's Government have set a noble ex-

ample to all future times in rigidly abstaining from all acts of power, which were not justified by the result of independent, fair and impartial investigation. Even after a special commission consisting of Natives and Europeans had stablished the charge of misrule against His Highness Mulharrao, your Excellency's Government allowed him time to retrace his steps, and permitted him to employ his own men and when the British Resident of his court inter-meddled in matters beyond legitimate limit of of his office your Excellency's Government removed him from his high position. This large-minded forbearance has had a most reassuring effect in all quarters.

( 5 ) Your memorialists are glad to perceive that this policy of forbearance and loyal-adherance to the promises of the Queen's Proclamation was not departed from even when your Excellency in Council for high reasons of state determined that Mulharrao should be arrested and put on his trial, and when your Excellency's Government assumed the temporary management of his state pending the investigation of the charge brought against him. Your Excellency's Government have pledged your word that whatever may become of Mulharrao, the Baroda Raj will not be annexed, and that a native administration will be set up as soon as the trial is over. This resolution of your Eecellency's Government not to punish a whole nation for the sins of its chiefs, is consonant with the dictates of the highest justice and mercy and farseeing policy.

( 6 ) It is consonant with justice that the integrity of a Native State in alliance with the British Government is not bound up with the personal good behaviour of the ruler for the time being of that state. The state survives

a succession of rulers that live and die. So long as the subjects of a native State are not guilty of hostility towards the British Government it will not be just to punish them for the errors or vices of their chiefs for the time-being. The state ( Dawlat ) does not belong of private right to the chief; he and the Raj mandala (the men whose ancestors fought and bled with the ancestors of the chief, and independent civil and military population ) is alike interested in it. Again the late Resident's conduct towards Durbar was such that gradually some misunderstanding arose between him and the Durbar. The misunderstanding was aggravated into a sort of personal quarrel by the Resident's direct interference with the affairs of the Baroda state, on all occasions when his interference was not called for. Opposition to the high-handed advice or rather orders of Colonel Phayer cannot be construed into an act of hostility to the British rule in as much as the people and the prince of Baroda certainly never intended to throw off allegiance to the British Government; and their quiet submission on the occasion of the arrest of their prince confirms this view. Of all these accounts your memorialists submit that the resolution not to annex the Baroda territory is dictated by the highest sense of justice.

( 7 ) It is also consonant with the most benignant mercy, the highest privilege of sovereign power. British authority is now so strongly rooted in India that it is its august privilege to be mericiful in all its dealings with weakly conditioned Native states. The disparity between the strength and civilization of the paramount power and its titulary states is so great that if the parmount power were rigidly to enforce all that it expects from Native states, these latter would never be able to hold their own ground

and meet the requirements. A merciful forbearance towards the short-comings of these states is therefore a duty which the imperial Government in consequence of its strength owes to the backward and comparatively weak Native states. In the case of Baroda especially, traditions of this state have been those of uniform and uninterrupted friendship during the last hundred years, ever since British connection with western India began. His highness Mulharrao referred to this circumstance when he protested his innocence of the charge brought against him and exclaimed that no descendent of Govindrao Gaekwar would disgrace his blood by complicity in an attempt to poison Resident. Such an appeal from a prince like Mulharrao deserves hearing. His Highness Mulharrao has so many and so unscrupulous enemies, and the charge brought against him is also attended with so many apparantly suspicius circumstances, that a merciful determination to hold him innocent till he is shown to be guilty and not to involve his innocent subjects in his personal ruin, is a duty obligatory upon the peramount power, the recognition of which duty in the proclamation issued by your Excellency's Government has filled all classes of your subjects with unmixed satisfaction.

( 8 ) Lastly the determination not to annex Baroda is consonant with high policy. Her most Gracious Majesty's word has been pledged in her proclamation to maintain the integrity of native states which have proved in troubled times to be the best supports of British Power in this country. Above all, the moral influence of this act of sovereign interference in the way of meting out retributive justice to a guilty chief will be wholly destroyed if it is made the means of annexing more territory to the British dominion in India. These consi-

derations have no doubt influenced your Excellency's Government informally. Emphatically disclaiming all ideas of annexing Baroda territory both in the official proclamation and in the speech which Sir Lewis Pelly delivered at the Durbar which he held on the occasion, and in assuring the subjects of Baroda that a Native administration will be set up again as soon as the trial is over. Your memorialists have felt it their duty to express in this public manner their grateful satisfaction at this act of large-minded forbearance. More than a thousand victories on the battlefield, this demonstation of moral strength will serve to fasten the British hold of India by assuring in chiefs and the people of independent states that the policy of annexation will not be revived. Your Excellency's rule will be remembered long in this land as much for your great success in preserving human life during the great famine in Bengal, as for this noble, determination to rise above the temptation of immediate expediency in your dealings with Native States.

( 9 ) Your memorialists have one prayer to urge in conclusion which if granted will be a fitting consumation of this noble policy. Your memorialists feel assured that the spirit of strict impartialtiy and merciful indulgance to the representative of a state in long-standing alliance with the British Government which has guided your conusels hitherto in all your dealings with Baroda, will lead your Excellency in council to appoint a mixed tribunal of European and Native judges in the high Commission Court which will soon be convened in Baroda. As this trial of the chief ruler of a native state with whom the British Government has had treaty of alliance is an innovation upon the established order of things, it is necessary that your Excellency in council should surround it with all the

guarantees of constitutional security,, which the high position of the accused, and the importance of the present trial as a precedent in future peremptorily demand. Your memorialists accordingly pray that the number of Native and European commissioners should be equal, and that these Native and European commissioners should act as jury under the guidance of the president of the High Commission. The Native members of the Court may be selected from among the native judges of the High Court of Bombay and Calcutta or they may be Maratha or Mahomadan prince of the first rank, or leading statesman at their courts; such a mixed tribunal will afford to the unfortunate Maharajah the benefit of a trial by his peers; and will serve to assure the people that the British Government do not desire to pre-judge the case, and that it is their anxions wish to see that impartial justice is fairly meted out to His Highness Mulharrao. Your Excellency have already set a president this way in appointiong a native member in the first Baroda commission of inquiry. Your memorialists pray that the same benignant policy may be carried out on the present occasion.

For this act of kindness your memorialialists as in duty bound will ever pray.

Inhabitants of Poona

वा. क्र. २४८४

REFBK-0002484

समाप्त.